# प्रकरण तीन

## शिक्षण विभाग

**3.49 जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडा व विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा आयोजित करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** आकस्मिक खर्चाच्या देयकानुसार रक्कम रुपये 3,74,454/- इतकी रक्कम रोखीने खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकाही एजन्सीची रक्कम प्राप्त झाल्याची पोचपावती नस्तीत दिसत नाहीत.

2) सर्व एजन्सीची दरपत्रके सभेत मंजूर केल्याचे आदेश नमूद आहे. तरी सभा कधी झाली, हे दिसत नाही. सभा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) सामान प्राप्त वाटप नोंदवही ठेवण्यात आली नाही. उदा.शांती अवार्डस यांच्याकडून 53 नग केव्हा प्राप्त झाले व किती नग शिल्लक आहेत, याबाबत लेखापरीक्षणास खुलासा करण्यात यावा. तसेच स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांची संख्या 51 असताना 53 सन्मान चिन्ह पारितोषिक वितरीत करण्यात आली आहेत. तरी दोन जादा पारितोषिकांचा खुलासा करावा.

4) एकूण किती लोकांना प्रत्यक्षात जेवण, नाश्ता व चहा दिला, याचा अहवाल नस्तीसोबत नाही. म्हणजेच रूपये 1,72,788/- कोणत्या आधारावर अदा करण्यात आले, याचा खुलासा सादर करावा.

5) व्हिजन ग्रुप फोटोग्रोफी यांनी केलेल्या फोटोग्रोफीचा अल्बम व शुटींग लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच त्यांनी किती तास काम केले, याचा अहवालही प्राप्त झाला नाही.

**3.50 शालेय पोषण आहार योजना सन 2016-2017 व्यवस्थापन सनियंत्रण व मूल्यमापन अंतर्गत शाळांना पिण्याचे पाण्याचे ग्लास पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 25,93,754/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजना अंतर्गत व्यवस्थापन सनियंत्रण व मूल्यमापन अंतर्गत शाळांना पिण्याचे पाण्याचे ग्लास पुरविणे या योजनेकरीता जिल्हा परिषदेस निधी दिनांक 30/03/2016 ला प्राप्त झालेली होता. त्यानुसार तरतूद कोषागार प्रमाणक क्रमांक 146 दिनांक 31/03/2016 अन्वये आहारीत करण्यात आलेली आहे. मात्र प्रत्यक्षात खर्च दिनांक 31/03/2017 रोजी करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांना संपूर्ण वर्षभर योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचे प्रयोजन काय व इतक्या विलंबाने खर्च का करण्यात आला, याचा खुलासा व्हावा.

2) मुद्रांक शुल्क अधिनियम नुसार रक्कम रूपये 10 लाख पर्यंतच्या कामाकरीता रूपये 100/- चा करारनामा व त्यापुढील प्रत्येक लाख रुपयांकरीता रूपये 100/- चा अधिक मुद्रांक वापरणे आवश्यक आहे. यास्तव शिक्षण विभागाने सदर योजनेच्या करारनामा करिता एकूण रूपये 1,800/- चे मुद्रांक वापरणे आवश्यक होते. परिणामी शिक्षण विभागाने उर्वरित रूपये 1,700/- चे मुद्रांक शुल्क श्री. वैद्य इंडस्ट्रीज, नागपूर यांचेकडून वसूल करून शासन खाती भरावे.

3) नस्तीसोबत जोडलेल्या डिलिव्हरी चलनांच्या प्रतीवर चलनाचा दिनांक नमूद नाही. तसेच वस्तू स्विकारणाऱ्या मार्फत वस्तू प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे दिनांक नमूद केलेले नाहीत. मात्र पंचायत समिती, शहापूर याना पुरवठा केलेल्या डिलिव्हरी चलनाच्या प्रतीवर वस्तू प्राप्त झाल्याच्या नोंदीनुसार प्रत्यक्षात वस्तू दिनांक 26/04/2017 रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. तर कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या साठा नोंदवहीच्या झेरोक्स प्रतीनुसार प्रत्यक्षात ग्लासांचा पुरवठा दिनांक 25/04/2017 रोजी प्राप्त झाला आहे. तर पंचायत समिती, भिवंडी यांनी दिलेल्या दाखल्यानुसार ग्लासांचा पुरवठा दिनांक 19/04/2017 रोजी प्राप्त झाला आहे. म्हणजेच प्रत्यक्ष पुरवठ्याआधीच देयकाचे प्रदान झालेचे निदर्शनास येते.

पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 व 8 नुसार तसेच करारनाम्यात मंजूर केल्यानुसार श्री. वैद्य इंडस्ट्रीज, नागपूर यांचेकडून दंडाची एकूण रक्कम रुपये 18,607/- वसूल होणे आवश्यक आहे.

4) प्रत्यक्ष शाळांना ग्लासचे वाटप केले किंवा कसे, याबाबतची कोणतीही माहिती नस्तीसोबत उपलब्ध नाही. म्हणजेच प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहचला किंवा कसे, याची लेखापरीक्षणास खात्री पटविता येत नाही.

**3.51 1 ली ते 4 थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी क्षेत्र व आदीवासी क्षेत्राबाहेरील दारिद्रय रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता वाटप योजनेतील अनियमियततेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** इयत्ता 1 ली ते 4 थी मधील शाळेत जाणाऱ्या अनुसुचीत जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारीद्रय रेषेखालील विद्यार्थीनींना प्रती दिनी एक रुपया प्रमाणे उपस्थिती भत्ता वाटप करणेबाबत रक्कम रूपये 13,49,625/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 या वर्षात शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांनी आदीवासी योजनेंतर्गत रूपये 10,73,771/- व बिगर आदिवासी योजनेंतर्गत रूपये 2,75,854/- असे एकुण रूपये 13,49,625/- एवढी रक्कम तालुक्यांना वित्त प्रेषणाने वितरीत केली आहे. परंतु, अद्यापही किती लाभार्थ्यांना अनुदान वाटप करणे बाकी आहे, याची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध नाही. तसेच गट पातळीवर किती लाभार्थी सदर योजनेपासुन कोणत्या महिन्यापासुन वंचीत राहीले आहेत, याची नस्तीसोबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने अखर्चीत राहीलेल्या रक्कमांबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्रशि -1, दिनांक 10/01/1992 जोडपत्र अ व ब नुसार आदीवासी योजनेचा लाभ हा दारीद्र रेषेखालील विदयार्थ्यांना देणे आवश्यक आहे. तरी लाभ देण्यात आलेले सर्व लाभार्थी दारीद्र रेषेखालील असल्याबाबतचा अहवाल व त्याची पडताळणी तालुका स्तरावरुन पडताळणी अहवाल प्राप्त करुन अनुदान वाटप करणे आवश्यक असताना तसे अहवाल अथवा त्याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास नस्तीसोबत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

3) उपस्थिती भत्ता हा दर दोन महिन्यातुन एकदा प्रदान करावयाचा असताना तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही.

4) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांना रकमा प्राप्त झाल्याबाबत प्रत्यक्ष पालकांची रुजवात घेतलेला अहवाल शिक्षणाधिकारी यांच्या दप्तरी ठेवला किवा कसे, याचा खुलासा सादर करावा.

5) उपस्थिती भत्त्याची अमंलबजावणी शासन निर्णयानुसार होते किंवा नाही, हे पाहण्यासाठी विस्तार अधिकारी यांनी 50 टक्के, गटशिक्षणाधिकारी यांनी 25 टक्के व शिक्षणाधिकारी यांनी 10 टक्के पाहणी करावयाची आहे. मात्र तशा प्रकारचा अहवाल दप्तरी उपलब्ध केलेले नाही.

6) लाभार्थी विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता वाटप करताना शासन निर्णयानुसार 75 टक्के शाळेत संबंधीत लाभार्थीची उपस्थिती असणे आवश्यक आहे. त्याबाबतचा अहवाल मुख्याध्यापकांनी तीन महिन्यांनी सादर करावयाचा आहे. मात्र अशी कार्यवाही झाली किंवा कसे, याचा खुलासा सादर करावा.

7) संबंधीत लाभार्थीचे उपयोगीता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध झाले नाही. यावरुन सदर योजनेंतर्गत झालेला खर्च योग्य रीतीने झाला किंवा कसे, यांची पुर्तता करुन अनुपालन दाखवावे.

8) आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र क्रमांक अंदाज182/2014-15/तरतूद/3749, दिनांक 09/01/2015

नुसार यापूर्वी दिलेल्या अनुदानाचे विनियोजन पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये, असे स्पष्ट आदेश आहेत. पूर्वीच्या लेखापरीक्षण अहवालात देखील याप्रकाराचा आक्षेप आहे. याचाच अर्थ विनियोजन दाखले प्राप्त न करता शिक्षण विभागाने यावर्षीही अनुदान वाटप केले आहे. सदरची बाब गंभीर असून पुनरावृत्ती होत असल्याचे व आयुक्तांच्या आदेशाचे पालन होत नसल्याने दिसून येते.

**3.52 अतिरीक्त शिक्षक समायोजनाबाबत**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समायोजन करताना दरवर्षी 30 सप्टेंबर ही तारीख विचारात घेवुन प्रचलित नियमानुसार पट संख्या व शिक्षक संख्या निश्चित करावी. त्या अनुषंगाने 20 ऑक्टोबरपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्येतेची कार्यावाही पुर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करुनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडुन यांनी प्रस्ताव संदर्भात 25 ऑक्टोबरपर्यंत कोणताही निर्णय कळविण्यात आला नाही. तर त्यांची मान्यता गृहीत धरण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत 30 सप्टेंबरपर्यंत पटसंख्या व शिक्षक संख्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चिती करावी. तसेच जिल्हातील समायोजनाचे काम 31 ऑक्टोबरपर्यंत पुर्ण करावे. असे असताना शिक्षण विभाग यांचेकडील आदेश क्रमांक पाजिप/शिक्षण/प्राथ/आस्था/वशी/584, दिनांक 30/03/2017 अन्वये समायोजन करण्यात आलेले आहे. तरी महाराष्ट्र शासन. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपस/511/प्र.क्र.54/आ.14, दिनांक 18/05/2011 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) नोव्हेंबर 2016 ते मार्च 2017 पर्यंत अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनावर झालेल्या खर्चाची जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करावी.

**3.53 मोठया प्रमाणावर अखर्चित निधीबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद पालघर अंतर्गत शिक्षण विभागास विविध योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने जिल्हा निधी अंतर्गत रुपये 2,43,50,000/- एवढा निधी उपलब्ध करुन दिलेला असताना योजनानिहाय खर्च करणे अपेक्षित असताना त्याप्रमाणे खर्च करण्यात आलेले नाहीत.

उपरोक्त योजना राबविण्यासाठी सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली असताना सदर योजना का राबविण्यात आले नाहीत, यांचा खुलासा करावा. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक zpa2008/ प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सुचना नुसार योजना राबविण्यासाठी शिक्षण विभागाकडे पुरेपुर वेळ असताना विभाग प्रमुखानी सदरच्या योजना राबविलेल्या दिसुन येत नाहीत.

2) सन 2015 - 2016 मध्येही 3 टक्के अपंग कल्याण साठी शिक्षण विभागाकडे 15,00,000/- तरतुद करण्यात आलेली असताना ही सदरच्या वित्तीय वर्षात सदरचा निधी खर्च केलेला नाही. तसेच सन 2016 - 2017 मध्ये तरतुद करण्यात आलेला रूपये 6,00,000/- निधी खर्च करण्यासाठी विभाग प्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ज्ञापन जा.क्र.पाजिप/अर्थ /वशी/91/2017, दिनांक 30/03/2017 व विभाग प्रमुख श्रीमती संगीता भागवत यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक अ.शा.पत्र.क्र. /पाजिप/अर्थ/वशी/81/2016, दिनांक 30/03/2017 अन्वये अखर्चित निधी खर्च करण्यासाठी अर्धशासकीय पत्रान्वये विभाग प्रमुखाना आदेशित केलेले असताना सुध्दा विभाग प्रमुखानी पुर्ण वित्तीय वर्षात सदरचा निधी खर्च न केल्यामुळे त्यांची यावरुन अकार्यक्षमता दिसुन येते.

3) पालघर जिल्हा अदिवासी बहुल असलेला जिल्हा असुन अदिवासी जिल्हातील अदिवासींची मुले ही शिक्षणापासून व विज्ञानापासून वंचित आहेत. ती शिक्षणाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी पालघर जिल्हा परिषदने (1) 5 वी च्या विद्यार्थांना दप्तर पुरविणे तरतुद रूपये 49,00,000/- (2) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना संगणक पुरवठा करणे व देखभाल दुरुस्ती तरतुद रूपये 17,00,000/- (3) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील अनाथ विद्यार्थींना शैक्षणिक साहित्य पुरविणे तरतुद रूपये 2,00,000/- (4) जिल्हा परिषद शाळांमध्ये E लर्निंग उपक्रम राबविणे तरतुद रूपये 1,30,00,000/- अशा विविध योजना आखुन सदर योजना अंमलात आणण्यासाठी प्रशासकीय मंजुरी दिलेली असताना सदरच्या योजना विभाग प्रमुखांनी जाणीवपुर्वक अमंलात आणल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे अदिवाशी बहुल असलेल्या जिल्हातील अदिवासी मुलाना संबधित लाभापासून हेतुपुरस्कर वंचित ठेवल्याचे

दिसुन येते. त्यामुळे आदिवासी मुलांचे शैक्षणिक नुकसान झालेले आहे. याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.54 जिल्हा परिषद सेस निधीतून इंग्रजी माध्यमाचे नर्सरी वर्ग चालविणेसाठी नियमबाह्य खर्च केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद, पालघर, शिक्षण विभाग यांच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात जिल्हा परिषद सेस निधीतून इंग्रजी माध्यमाचे नर्सरी वर्ग चालविणे या बाबीवर जिल्हा अर्थसंकल्पात एकूण रूपये 9,00,000/- तरतूद केली असून वर्षाअखेर रूपये 4,30,153/- रक्कम खर्च केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 नुसार या अधिनियमातील पहिल्या अनुसूचीमध्ये दिलेल्या विषयामध्ये इंग्रजी माध्यमाचे नर्सरी वर्ग चालविणे या योजनेचा अंतर्भाव होत नसताना जिल्हा परिषद सेस निधी अंतर्गत या विषयावर रूपये 9,00,000/- इतकी तरतूद करण्यात आली आहे.

2) अर्धसमास पत्र क्रमांक 3 दिनांक 21/09/2017 अन्वये मागणी करूनही याबाबतचे शासन मान्यता आदेश लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत. याबाबत शासनाची कोणतीही मंजुरी नसताना वित्तीय वर्ष 2016-2017 मध्ये या याबाबीवर रूपये 4,30,153/- इतका नियमबाह्य खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

3) या योजनेअंतर्गत समाविष्ट तुकड्यासंबधी अभ्यासक्रमाबाबत संचालक (प्राथमिक) यांच्यामार्फत कोणतेही विस्तृत आदेश निर्गमित करण्यात आल्याबाबतचे लेखे तसेच यांच्या तांत्रिक मंजुरीसंबधी कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या जा.क्र.पाजीप/शिक्षण/प्राथ/इंग्रजी वर्ग/7262 दिनांक 26/10/2016 अन्वये शैक्षणिक वर्ष 2016-2017 साठी 7 तालुक्याअंतर्गत एकूण 17 कार्यकर्त्यांची करारपद्धतीने नियमबाह्यरित्या नेमणूक करण्यात आलेली आहे.

**3.55 पालघर जिल्हा वार्षीक आदिवासी उपयोजना सन 2015-2016 अंतर्गत मागासवर्गीय कल्याण या शिर्षाखाली नावीन्यपुर्ण योजने अंतर्गत विशेष गरजा असणा-या बालकांसाठी शाळा पुर्व कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी डे केअर सेंटर सुरु करणे (डाहाणू व तलासरीकरीता)**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पालघर जिल्हा वार्षीक आदिवासी उपयोजना सन 2015-2016 अंतर्गत मागासवर्गीय कल्याण या शिर्षाखाली नावीन्यपुर्ण योजने अंतर्गत विशेष गरजा असणा-या बालकांसाठी शाळा पुर्व कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी डे केअर सेंटर सुरु करणे (डाहाणू व तलासरीकरीता) रक्कम रुपये 8,81,000/- अनुदान वाटप करण्यात आलेले असुन त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निधी वितरण आदेश क्रमांक अन्वये दोन गटाना उपरोक्त आदेशा अन्वये निधी वर्ग करण्यात आलेले असुन सदरची योजना ही नोव्हेंबर 2016, डिसेंबर 2016 व जानेवारी 2017 या तीन माहिन्यांच्या कालावधीत राबवयाची असताना त्यानुसार राबविण्यात आलेली नाही.

2) फलश्रृती अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

3) डाहाणूतील 18 तलासारी गटातुन 18 विद्यार्थीची निवड करण्यात आलेली आहे. परंतू, सदर योजनेचा किती विद्यार्थीनी यांनी लाभ घेतला, त्याबाबत शाळेचा अहवाल सदर नस्तीत आढळुन आलेला नाही.

4) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र जा.क्र.मप्राशिप/सिशअ/आयई/2013-2014/4581, दिनांक 14/11/2013 पत्रातील अनुक्रमांक 6 उपक्रमाचे गांभिर्य जी बालके सर्व सामान्य वर्गात लगेच दाखल होऊ शकत नाही किंवा सर्व सामान्य विद्यार्थ्यांसोबत समावेश होण्यास थोडा वेळ लागण्याची शक्यता आहे. अशा बालकांना पुर्व कौशल्य प्रशिक्षण देवुन मुख्य प्रवाहात आणण्याचा मानस आहे. त्या दुष्टीने सदर उपक्रमाचे महत्व लक्षात घेवुन सदर उपक्रम जिल्हा व महानगरपालिका कार्यक्षेत्रात कशा पध्दतीने सुरु आहेत, त्यांची पहाणी करण्यासाठी तज्ञ मंडळी इतर जिल्हातील विषय तज्ञ शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण धोरण समिती इत्यादी भेटी अपेक्षित आहेत.

त्यांचा निरीक्षणाच्या विश्लेषणावरुन सदर उपक्रमच्या संसाधन व अभ्यासाकरीता निश्चित उपयोग होईल. त्या दुष्टीने उपक्रमाच्या नोंदी छायाचित्रासह सादर केलेले नाहीत.

5) विद्यार्थीना शाळेत दाखल केल्यानंतर वर्गातील अध्ययन, अध्यापन, प्रक्रियेमध्ये समायोजन प्रकिया सुरू असताना त्या कालावधीत सनियंत्रणाची जबाबदारी केंद्र प्रमुख, समन्वक, संशोधक सहाय्यक गटशिक्षण अधिकारी या क्रमानुसार असतांना संबंधितांनी त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अहवाल सदर नस्तीस जोडण्यात आलेले नाही.

6) निवड करण्यात आलेल्या शाळेतील शिक्षकांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आल्याचे सदर नस्तीत आढळुन आलेले नाही.

**3.56 प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांसाठी दृकश्राव्य प्रणाली राबविणे योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रुपये 10,00,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग सन 2016-2017 अंतर्गत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दृकश्राव्य प्रणाली राबविणेबाबतची नस्ती तपासली असता सदर योजनेबाबत काही अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 11, दिनांक 29/09/2017 अन्वये कळविले होते. तथापि, विभागाकडील खुलासा अप्राप्त आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 02/09/1993 नुसार लाभार्थींची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार प्रदानाबाबत खात्री करता आलेली नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक झेडपी-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 13/01/2013 अन्वये टिप क्रमांक 2 अन्वये जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागांनी या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या आगामी सर्वसाधारण सभेत सादर करण्यात यावी, अशी तरतूद आहे. याबाबत अहवाल सर्वसाधारण सभेत सादर केलेचे अभिलेखे सादर केलेले नाहीत.

3) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी जावक क्रमांक राजीप/शिक्षण/लेखा-2/8471/2016, दिनांक 02/12/2016 अन्वये सेल्फगुरु एज्युकेशन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांना 22 नग रक्कम रुपये 45,500/- प्रमाणे एकूण रुपये 10,01,000/- एवढ्या रक्कमेचे Audio Visul पुरवठा करणेचे आदेश दिलेले आहेत. तथापि, संबंधित ठेकेदाराचे सन 2015 पर्यंतचे नोंदणी प्रमाणपत्र सादर केले असल्याचे अभिलेखावरून आढळून आले आहे. वास्तविक नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरण केलेले नसताना कशाच्या आधारे संबंधितास सदर सन 2016-2017 या कालावधीत नमूद कामाचे कंत्राट देण्यात आले. याबाबत सादर खुलासा विभागाने केलेला नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 च्या शासन निर्णय मुद्दा क्रमांक 3 नुसार बाजारभाव घेतल्याचे आढळून येत नाही. तसेच सन 2015-2016 या आर्थिक वर्षात संचाचा दर रुपये 39,000/- एवढा होता. तथापि, सन 2016-2017 या आर्थिक वर्षात 17 टक्के वाढ म्हणजेच प्रती नग रुपये 45,500/- रक्कम (Audio Visul) दृकश्राव्य योजनेपोटी बाजारभाव विचारात न घेता प्रदान केल्याचे दिसते. संबधित ठेकेदारास वाटाघाटी करणेस देखील विभागाने बोलविले नसल्याचे अभिलेख्यावरून दिसून येत नाही. याबाबत सादर खुलासा विभागाने केलेला नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक परांस- 2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थ्यांची यादी मंजूर केल्याचे अभिलेखे विभागाने सादर केलेले नाहीत.

6) प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 4 नुसार सदर योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेची जबाबदारी विभागाची आहे. तरी उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करून देऊन अनुपालन विभागाने सादर केलेले नाही.

7) म्हसळा तालुक्यातील आंबेत व संदेरी उर्दू व रोहा तालुक्यातील वणी या तिन्ही शाळेचे प्रस्ताव नसताना कशाच्या आधारे सदर शाळांना (Audio Visual) योजनेच्या लाभ देण्यात आला, याबाबत विभागाने साधार खुलासा केलेला नाही.

8) सदर योजनेचा लाभ हा मर्यादित फक्त पेण, उरण, म्हसळा, रोहा व सुधागड या मर्यादित दिल्याचे दिसते. उर्वरित तालुक्याना सदर योजनेपासून वंचित ठेवणेची कारणे खुलाशासह सादर केलेली नाहीत.

**3.57 जिल्हा परिषद शाळांना शतकोत्तर महोत्सव साजरा करणेसाठी अनुदान उपलब्ध करून देणेच्या योजनेतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत रक्कम रुपये 3,25,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग सन 2016-2017 अंतर्गत जिल्हा परिषद शाळांना शतकोत्तर महोत्सव साजरा करणेसाठी अनुदान उपलब्ध करून देणेची नस्ती तपासली असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद शाळांना शतकोत्तर मोहोत्सव साजरा करण्यासाठी प्रती शाळा रुपये 30,000/- प्रमाणे पहिल्या टप्प्यात रुपये 1,20,000/- अनुदान खर्चासाठी दिले. तथापि, म्हसळा तालुक्यात आंबेत मराठी व आंबेत उर्दू या दोन शाळा एकाच गावातील आहेत. सार्वभौमत्व एकत्रीकरण व सामाजिक एकता टिकविण्यासाठी सदर शतकोत्तर कार्यक्रम करणे गरजेचे होते. त्यामुळे खर्चात बचत होऊन अनुदान सदर निधी इतर ठिकाणी वापर करता आला असता.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थ्यांची यादी निश्चित करावी व त्यास मान्यता घ्यावी, अशी तरतूद आहे. याबाबत विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिलेली नाहीत.

3) जिल्हा परिषद रायगड अंतर्गत दुसऱ्या टप्प्यात एकूण (13 x 15,769 = 2,05,000) प्रत्यक्षात 2,05,000/- एवढे अनुदान शतकोत्तर मोहोत्सव साजरा करणेसाठी अनुदान वितरीत केले आहे. तथापि, श्रीवर्धन तालुक्यात बोर्ली पंचतन मराठी व बोर्ली पंचतन उर्दू या दोन शाळा एकाच गावातील आहेत. सार्वभौमत्व एकत्रीकरण टिकविण्यासाठी व सामाजिक एकता टिकविण्यासाठी शतकोत्तर कार्यक्रम एकत्र करणे गरजेचे होते. त्यामुळे खर्चात बचत होऊन सदर निधी इतर ठिकाणी वापरता आला असता.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी-2012/प्र.क्र.680/वित्त-1, दिनांक 31/03/2013 अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेसाठी प्राधिकारी शासनाने प्राधिकृत केले आहे. तथापि, सदर नस्तीची तपासणी केली असता दुसऱ्या टप्प्यातील एकूण रुपये 2,05,000/- एवढ्या रक्कमेस शिक्षण विभागाने प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेतली नसल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले आहे. याबाबत अभिलेखे सादर करणे विषयी विभागास वरील अर्धसमास क्रमांक 11, दिनांक 29/09/2017 अन्वये कळविले होते. तथापि, याबाबत विभागाने सदर अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत.

5) शिक्षण विभागाने सन 2016-2017 मध्ये शतकोत्तर कार्यक्रम राबविण्यासाठी प्रत्यक्षात कोणकोणत्या बाबीवर खर्च करावा, याबाबत खर्चाचा आराखडा तयार न करताच निधी 17 शाळांना वितरीत केलेला आहे. त्यामुळे शाळांनी केलेला खर्च व सदर शतकोत्तर कार्यक्रमासाठी खर्च करणे आवश्यक (खर्च आराखड्यानुसार) ताळमेळ लेखापरीक्षणास घेता आला नाही. सदर विसंगतीबाबत विभागाने खातर जमा केलेली नाही.

6) सदर शतकोत्तर योजनेचा लाभ दिलेल्या 17 शाळांनी केलेल्या खर्चाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र मागणी करून उपलब्ध करून दिलेले नाही.

**3.58 सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेत आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत रक्कम रुपये 32,48,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग सन 2016-2017 अंतर्गत सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेची तपासणी केली असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जावक क्रमांक सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती/का-1(14) 2016/03/1261, दिनांक 18/03/2016 अन्वये 3,86,99,000/- एवढी रक्कम प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, पेण रायगड यांनी मंजूर केले आहेत. त्यानुसार प्राथमिक विभागासाठी रुपये 3,38,64,500/- व माध्यमिक विभागास रुपये 48,34,500/- रक्कम वितरीत केलेली आहे. तथापि, लेखापरीक्षण कालावधी अखेर पर्यंत प्राथमिक विभागाकडील 297 विदयार्थी एकूण रुपये 25,94,000/- व माध्यमिक विभागाकडील 327 विदयार्थी एकूण रक्कम रूपये 6,54,000/- अशी मिळून एकूण रक्कम 32,48,000/- अद्याप विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत केलेली नाही. तरी सदरील एकूण 32,48,000/- रक्कम त्वरीत वितरीत करून अहवाल सादर करावा.

2) तालुका निहाय विदयार्थ्यांना किती रक्कम वितरीत करणे शिल्लक आहे. याबाबत गटस्तरांवर ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांची नावे दुबार आहेत, नावे जुळत नाहीत, दिलेला खाते क्रमांक आढळ होत नाही व खाते क्रमांकच अस्तित्वात नाही, अशा प्रकरणात गट शिक्षणाधिकारी यांनी ताळमेळ घेऊन वितरण उचित कार्यवाही करावी.

**3.59 प्राथमिक शाळागृह देखभाल व दुरुस्ती.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद सेसमधून प्राथमिक शाळाग्रह देखभाल व दुरुस्तीवर रक्कम रुपये 1,45,63,000/- इतका खर्च केलेला आहे. सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा शिक्षण विभागाने वरील योजना राबविण्यापूर्वी गटांकडून मागणी / प्रस्ताव घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी / प्रस्ताव गटांकडून प्राप्त झाली किंवा कसे, याची माहिती नस्तीसोबत उपलब्ध न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास 2012/प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये गटाकडून प्राप्त झालेली मागणी / प्रस्ताव निश्चित करावी व त्यास मान्यता घ्यावी, असे शासनाचे आदेश असताना शिक्षण विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) प्राथमिक शाळागृह देखभाल व दुरुस्तीबाबत रक्कम ज्या गटांना दिली आहे, त्या गटांकडून महिन्याच्या 5 तारखेपर्यंत गट विकास अधिकारी यांनी मासिक खर्चाचा कामनिहाय प्रगती अहवाल व पूर्ण झालेल्या कामांचे कामनिहाय दाखले सादर करणे आवश्यक आहे. परंतु, तसे अहवाल नस्तीसोबत नाहीत.

4) ज्या गटांना ज्या कामासाठी निधी दिला आहे, तो निधी त्याच कामासाठी विनियोग करणे अनिवार्य आहे. परंतु, नस्तीसोबत विनियोग दाखले नसल्यामुळे व उपलब्ध न केल्यामुळे सदर निधी त्याच कामासाठी खर्च केला किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

5) ज्या गटांना ज्या कामासाठी रक्कम दिली आहे, त्यांनी सदर रक्कम कोणकोणत्या बाबींवर खर्च केला आहे, त्या खर्चाचा अहवाल नस्तीसोबत उपलब्ध न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

6) शिक्षण विभागाने जिल्हा परिषद सेस योजनेतून ज्या तालुक्यातील ज्या प्राथमिक शाळागृह देखभाल व दुरुस्तीसाठी निवड केली, त्यातील कोणत्या कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी घेतली व कोणत्या कामांवर किती खर्च केला, त्यातील किती कामे सन 2016-2017 या वित्तीय वर्षात पूर्ण झाली व किती अपूर्ण राहिली, याबाबतची कोणतीही सविस्तर माहिती नस्तीसोबत नाही.

7) गटशिक्षण अधिकारी किंवा गटविकास अधिकारी यांनी सदर योजनेतून जी दुरुस्तीची कामे चालू आहेत, त्या कामांवर प्रत्यक्ष भेट देऊन वेळोवेळी आढावा घेणेचा आहे व साप्ताहिक अहवाल जिल्हा शिक्षण विभागाला देणे आवश्यक होते. परंतु, सदर योजनेचा साप्ताहिक अहवाल नस्तीसोबत उपलब्ध नाही.

8) प्राथमिक शाळागृह देखभाल व दुरुस्तीबाबत रक्कम ज्या गटांना दिली आहे, त्या गटांतील गट विकास अधिकारी यांनी पूर्ण झालेल्या कामांचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थिती दर्शविणारे छायाचित्र कामनिहाय सादर करणे आवश्यक आहे. परंतु, तसे छायाचित्र नस्तीसोबत नाहीत.

**3.60 शालेय पोषण आहाराच्या (धान्यादी माल पुरवठा) योजनेत आढळून आलेल्या अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत रक्कम रुपये 96,32,947/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार, महसूल व वन विभाग अधिसूचना दिनांक 23/04/2006 अन्वये करारनामा करताना मुद्रांक शुल्क वसूल करणे आवश्यक आहे. तथापि, नस्तीसोबत करारनामा फक्त 500/- रुपये रक्कमेचे केल्याचे दस्तऐवज जोडलेले आहेत. दहा लाखासाठी रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखासाठी रुपये 100/- मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक आहे. संबधीत ठेकेदाराकडून एकूण रक्कम रुपये 78,700/- मुद्रांक शुल्क रक्कम वसूल केलेले नाहीत.

2) संबधित विभागास ठेकेदाराने माल पुरवठा विलंबाने केल्यानंतर दंड वसुली नोंदवही मागणी केली असता, सदर नोंदवही अप्राप्त असलेने दंड वसुलीबाबत खातरजमा करता आली नाही. तसेच माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2016 या कालावधीसाठी विभागाने जावक क्रमांक रजिप/शिक्षण/शापोआ/6905/2015, दिनांक 10/10/2016 अन्वये मालाचा पुरवठा आदेश दिलेले आहेत. तथापि, ठेकेदाराने माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2016 या कालावधीचा पुरवठा करारनाम्यातील अट क्रमांक 18 नुसार 20 दिवसात करणे आवश्यक असताना विहित मुदतीत संबधित शाळांना धान्यादि मालाचा पुरवठा केला नाही. करारनाम्यातील अट क्रमांक 20 अन्वये विहित मुदतीत पुरवठा न केल्यास मालाच्या किंमतीवर प्रती आठवडा 0.5 टक्के दंड आकारला जाईल, अशी तरतूद नमूद आहे. विलंबाचा कालावधी प्रगणीत करुन वसुली करण्यात यावी.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 3 (अ) अन्वये तालुक्याची शाळानिहाय मागणी केंद्रप्रमुख अधिक्षक (शापूआ) व अधिक्षक यांचेकडे सदर मागणी पुरवठादारांकडे नोंदवहीतील व त्याची प्रत शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, रायगड यांना देणे गरजेचे आहे. माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2016 या दोन महिन्यातील मागणीपत्रक (जुने व सुधारीत बदलानंतर) पनवेल, म्हसळा, श्रीवर्धन, सुधागड, तळा, पेण, महाड व कर्जत इत्यादी तालुक्याचे अप्राप्त आहेत. सदर गटातील मागणीपत्रक उपलब्ध होताच लेखापरिक्षणास सादर करणेत येईल, असा खुलासा विभागाने केलेला आहे. मागणीपत्रक गटाकडील अप्राप्त असताना ठेकेदाराने सादर केलेल्या देयकाचे प्रदान कशाच्या आधारे केले, याबाबत साधार खुलासा विभागाने केलेला नाही.

4) शहरी भागातील इयत्ता 6 वी ते 8 वी या इयत्तांना नगरपालिका क्षेत्रात पुरवठा केलेल्या धान्यादी मालापोटी केंद्र हिस्सा रुपये 2,09,52,136/- व राज्य हिस्सा रुपये 1,39,68,090/- असे मिळून एकूण रुपये 3,49,20,226/- एवढ्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करून दिलेले नाही. सदर गटातील उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध होताच लेखापरिक्षणास सादर करणेत येईल, असा खुलासा विभागाने केलेला आहे.

5) करारनाम्यातील अट क्रमांक 23 अन्वये पुरवठादराने मालाच्या पुरवठ्याचा अहवाल दरमहा 5 तारखेला पुरवठा आदेशानुसार पत्यक्ष शाळांना किती पुरवठा केला, याचा तालुकानिहाय अहवाल शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना पाठविणे आवश्यक आहे. सन 2016-2017 या कालावधीत तालुकानिहाय धान्यादी मालाचा पुरवठा केलेबाबतचे अहवाल उपलब्ध करून दिलेले नाहीत. सदर गटातील अहवाल उपलब्ध होताच लेखापरिक्षणास सादर करणेत येईल, असा खुलासा विभागाने केलेला आहे. मासिक अहवाल अप्राप्त असल्याने माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2016 या कालावधीतील देयकाच्या प्रदानबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. करारनाम्यातील अटीचे उल्लघन होत असल्याची गंभीर बाब दिसून येते.

**3.61 इयत्ता पाचवी ते सातवीच्या विध्यार्थिनींना कराटे प्रशिक्षण देणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** जिल्हा परिषद शिक्षण विभागाने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद सेसमधून इयत्ता पाचवी ते सातवीच्या विध्यार्थिनींना कराटे प्रशिक्षण देणे यासाठी रक्कम रुपये 3,30,280/- इतका खर्च केलेला आहे, सदर खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा शिक्षण विभागाने वरील योजना राबविण्यापूर्वी गटांकडून मागणी / प्रस्ताव घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी / प्रस्ताव गटांकडून प्राप्त झाली किंवा कसे, याची माहिति नस्तीसोबत उपलब्ध न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास 2012/प्र.क्र.104/ वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार जिल्हा परिषदेने योजना राबविताना विषय समितीच्या सभेमध्ये गटाकडून प्राप्त झालेली मागणी / प्रस्ताव निश्चित करावी व त्यास मान्यता घ्यावी, असे शासनाचे आदेश असताना शिक्षण विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) आलेल्या प्रस्तावांतून कोणत्या शाळांना मंजुरी देण्यात आली, त्याची मंजूर यादी नस्तीसोबत नाही.

4) प्रस्ताव गटांकडून येण्यापुर्वीच कोणत्या नियमाच्या आधारे ई-निविदा प्रक्रिया राबविण्यांत आली, याचा खुलासा केलेला नाही.

5) तुलनात्मक तक्ता नस्तीसोबत नाही.

6) कार्यादेशामध्ये प्रशिक्षणाचा कालावधी नमूद नाही.

7) प्रशिक्षणाचे फोटो नस्तीसोबत नाहीत.

8) गट विकास अधिकारी यांचे प्रशिक्षण पार पडल्याबाबत विद्यार्थीनींचा अभिप्राय स्वाक्षरीसह नस्तीसोबत नाही.

9) तालुकानिहाय हजेरीपत्रकावर कराटे प्रशिक्षण कोणत्या दिवशी, कोणत्या ठिकाणी व प्रशिक्षकाचे नाव, नमुद नाही. हजेरीपत्रकावर मुख्याधापक, प्रशिक्षक व विद्यार्थीनींच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

10) नस्तीतील टिपणी पान क्रमांक 11 वर वित्त विभागाने दिनांक 02/03/2017 व दिनांक 31/03/2017 रोजी ई-निविदा प्रक्रिया अवलंबून झाल्यानंतर साधारण डिसेंबरपर्यंत कार्यादेश देणे गरजेचे आहे, असे अभिप्राय दिलेले आहेत. सदर विसंगतीबाबत खातरजमा करावी.

11) विभागाने निविदा मंजुरीसाठी आणि कार्यादेश देण्यासाठी नस्ती सादर केली आहे. आर्थिक वर्ष संपत आले असताना सदर कार्यादेश देणे योग्य वाटत नाही, असे वित्त विभागाच्या लेखाधिकारी यांचे मत होते व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदरबाबत विभागाचे अभिप्राय घ्यावेत, असे नमुद असतांना संबधीतांनी नियमबाह्यपणे कार्यादेश दिला आहे. सदर नस्ती वित्त विभागाला दिनांक 22/03/2017 रोजी मंजुरीसाठी पाठविला असता दिनांक 14/03/2017 रोजी कोणत्या नियमाच्या आधारे कार्यादेश दिला, याचा खुलासा केलेला नाही.

**3.62 कृतीयुक्त अध्ययन पध्दती कार्यक्रम योजना.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त पुरवठा आदेश क्रमांक 1 अन्वये रत्नागिरी जिल्हातील एकूण 90 शाळांना कृतीयुक्त अध्ययन कार्यक्रमाअंतर्गत कृतीयुक्त अध्ययन/अध्यापन प्रणाली साहित्य पुरविण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्या अनुषंगाने संबधित मक्तेदाराने दिनांक 19/01/2017 पर्यंत साहित्य पुरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही. संबधित मक्तेदाराने साहित्य विहित कालावधीत पोहोच न केल्यामुळे दंडात्मक कारवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) में.कल्याणी कार्पोरेशन, पुणे यांचे दिनांक 19/12/2016 च्या पत्रान्वये कृतीयुक्त अध्ययन कार्यक्रमाअंतर्गत अध्ययन, अध्यापनासाठी व प्रशिक्षण साहित्य, हॉल भाडे, ध्वनीक्षेपण व केटरिंगची व्यवस्था यासाठी किमान 100 ते 125 प्रशिक्षणार्थी यांना 4 दिवसांसाठी एकूण रक्कम रुपये 2,35,000/- चे कोटेशन सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने संबधीतासोबत चर्चा करून रक्कम रुपये 2,27,550/- रक्कमेवर सदरचे प्रशिक्षण कार्यक्रम कायम करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत चिपळूण विभागातील 44 शाळा व रत्नागिरी विभागातील 46 शाळा अशा एकूण 90 शाळा असून प्रती विभाग प्रत्येकी 2 शिक्षक प्रमाणे अनुक्रमे 88 व 92 एवढेच प्रशिक्षार्थी असल्याने दरपत्रकाप्रमाणे 4 दिवसाच्या प्रशिक्षणासाठी प्रति प्रशिक्षणार्थी रक्कम रूपये 1880/- होतात. परंतु विभागाने दोनच दिवसाचे प्रशिक्षण घेतल्याने चार दिवसाच्या दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थी संख्या 90 होत असल्याने

कोटेशन दराप्रमाणे 1880 x 90 एकूण रक्कम रुपये 1,69,200/- एवढीच रक्कम खर्च होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 58,350/- शासनाचे नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

**3.63 शालेय पोंषण आहार धान्यादी मालाच्या मागणीपेक्षा जास्त धान्याचा पुरवठा व खराब तांदुळ पुरवठयाबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहारांतर्गत धान्यादी मालाची देयके व कार्यनस्ती तपासली असता सदर कार्यनस्तीमध्ये शाळांची मागणी व पुरवठा यांची पडताळणी केली असता पंचायत समिति वैभववाडीकडील पत्र क्रमांक कास-2/672/16 दिनांक 16/07/2016 ने पुरवठादाराकडे वजन काटा नसल्याची तक्रार केली असल्याचे आढळले आहे. करारनाम्यातील अटीशर्तीनुसार पुरवठेदाराने आपल्याजवळ वजन काटा ठेवून वितरणाच्या ठिकाणी धान्यादी माल वजन करुन देणे आवश्यक आहे. वरील पत्राचा संदर्भ पाहता पुरवठेदाराकडे वजन काटा नसल्याचे दिसते. परिणामी पुरवठा केलेले धान्य व त्या संदर्भात पुरवठा केलेल्या मालाची किंमत योग्य प्रमाणात पुरवठेदारास दिल्याची खात्री होत नाही.

2) वरील संदर्भिय पत्रात विद्यामंदीर लोरे शाळा नंबर 1 येथे 100 किलो तुरडाळ उतरली. परंतु, सदर शाळेची मागणी 11 किलो होती. असे असताना त्या ठिकाणी 99 किलो तुरडाळ जास्त उतरल्याची दिसून येते. जादा पुरवठा केलेल्या साहित्याची वसूली करावी.

3) सावंतवाडी शाळा क्रमांक 4 ला 600 किलो खराब तांदूळ पुरविल्यासंदर्भात दिनांक 06/03/2017 ने कळविले आहे. तर दोडामार्ग तालुक्यातील आयी शाळा यांना खराब धान्य पुरविल्याचे दिनांक 18/03/2017 चे पत्र आहे. यावरुन पुरवठेदार शाळांना खराब धान्य पुरवित असल्याचे लेखापरीक्षणात दिसून येते आहे. याबाबत शासन स्तरावर कोणती दंडात्मक कार्यवाही केली, याबाबत अहवाल आढळून आलेला नाही. तसेच अशा वेळी करारनामा अट क्रमांक 24 नुसार जिल्हा स्तरावरील देयके मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतर मालाच्या किंमतीच्या 90 टक्के रक्कम पुरवठेदारास अदा करावयाची आहे व नंतर उर्वरित 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करावयाची आहे. या अनुषंगाने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) खराब धान्य पुरविल्याने मुलांच्या जिवितास हानी पोचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील. या दृष्टीने यापुढे योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

**3.64 स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरातील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबिराकरिता रक्कम रूपये 1,80,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागदर्शन शिबिरासाठी उपस्थित राहाणा-या विद्यार्थ्यांना दुपारचे - जेवण चहासाठी दिनांक 23/12/2016 रोजी क्रमांक सिंजिप/शिक्षण/माध्य/177//2016 ने जाहीरात प्रसिध्द केलेली होती. दरपत्रके स्विकारण्याची तारीख 30/12/2016 दुपारी. 14.00 वाजेपर्यंत होती. सदर दरपत्रके दिनांक 30/12/2016 रोजी प्राप्त झाल्या आहेत. लखोटयावर तारीख नमुद आहे. परंतु, वेळ नमुद नसल्याने विहीत वेळेत पुरवठादाराची आवेदन पत्रे प्राप्त झाल्याची खात्री करता येत नाही.

2) जिल्हा परिषद स्व: उत्पन्नातुन स्पधा परीक्षा मार्गदर्शन शिबीर, सावंतवाडी, दोडामार्ग, वेंगुर्ले व कुडाळ या चार तालुक्यातील विघार्थ्यांसाठी सावंतवाडी येथे दिनांक 03/01/2017 रोजी नगरपालिका हॉलमध्ये घेण्यात आले. उर्वरीत 4 तालुक्यांतील विघार्थी सदर मार्गदर्शन शिबीरासाठी वंचीत राहीले. खुलासा करावा.

3) मार्गदर्शन शिबीरासाठी एकूण 847 विद्यार्थी उपस्थित असल्याने उपस्थिती पत्रकावरुन दिसुन आले. तज्ञ मागदर्शक व इतर मिळुन आणखी 30 पाहुणे कार्यक्रमासाठी उपस्थित असल्याचे गृहीत धरुन एकुण 877 लोकांची उपस्थिती असल्याचे आढळुन आले. कार्यनस्तीत बिलांची पडताळणी केली असता 1100 विद्यार्थ्यांना अल्पोपहारासाठी खर्च केलेला आहे. उपस्थिती व इतर पाहुणे वगळुन 223 जादा जेवण अल्पोपहार व चहावर खर्च

झालेला आहे. त्यामुळे रूपये 12,011/- लेखापरिक्षणात कायम अमान्य करणेत येत असुन सदरची रक्कम सबंधीतांकडुन वसुल करुन जिल्हा परिषद निधीत भरणा करावी.

**3.65 तालुका स्तरावर शालेय क्रिडा स्पर्धा सन 2016-2017 साठी वितरीत केलेल्या अनुदानाबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त प्रेषण आदेश - 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्गयांचे आदेश
जा.क्र/सिंजिप/शिक्षण/ प्राथ/ नियो./ 3524/ 2016, दिनांक 08/11/2016,
2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्गयांचे आदेश
जा.क्र/सिंजिप/शिक्षण/प्राथ/योज-2/क्रिडा स्प/2017/6139, दिनांक 27/02/2017

उपरोक्त आदेशान्वये 8 तालुक्यांना एकूण रक्कम रुपये 14,34,500/- वितरित केले आहेत.

उपरोक्त वितरित केलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र व विनियोग दाखले लेखापरिक्षणास आढळून आले नाहीत.

**3.66 आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थीना ईको फ्रेंडली डयुलेक्स बेंचेस पुरविणेबाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,99,98,675/- खर्च करण्यात आला आहे. शिक्षण विभाग, प्राथमिक जिल्हा परीषद, नाशिक अंतर्गत आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेतील विघ्यार्थीना ईको फ्रेंडली डयुलेक्स बेंचेस पुरवठा करण्यासाठी रूपये 1,99,98,675/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट् जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83.3 नुसार साहित्य तांत्रिक दृष्टया योग्य व आयएसआय मार्क चे असलेबाबतचे प्रमाण पत्र उपलब्ध झाल नाही.

2) जंगम मालमता रजिस्टरवर अधिकृत नोंद घेवुन वाटप केल्याची पुर्तता करावी.

3) निविदाकाराने निविदा सादर करतांना त्यांनी त्यांच्या बयाणा रक्कम व अनामत रक्कम भरल्याचे चलन डि.डि. पावत्या नस्तीसोबत आढळुन आलेले नाहीत.

4) प्राथमिक शाळा गट, पंचायत समिती, कळवण, पंचायत समिती, सुरगाणा व पंचायत समिती, बागलाण यांचे वस्तूसंदर्भातील चाचणी अहवाल लेखापरीक्षणासाठी उपल्बध झालेल नाहीत. ते चाचणी आहवाल लेखापरीक्षणासाठी सादर करण्यात यावे. सदर चाचणी आहवाल सादर न करताच संबंधित पुरवठादारास रक्कम रूपये 1,99,98,675/- कसे अदा केले याबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करण्यात यावा.

5) सदर निविदा धारकाकडे उत्पादन निविदेतील निविदेत दर्शविल्या प्रमाणे पॉलिमट बैठक व्यवस्था उत्पादन क्षमता असल्याबाबत चार्टड इंजिनिअर यांचे प्रमाणपत्र नस्तीसोबत प्राप्त झाले नाही.

सदर पुरवठादाराचे उत्पादन क्षमता असल्याबाबत चार्टड इंजिनिअर यांचे प्रमाणपत्र नसतांना सदर पुरवठादार यांना सदर वस्तु पुरवठा करण्यासंदर्भात आदेश कसे निर्गमित करण्यात आले, याबाबत खुलासा सादर करावा.

6) पुरवठादारास पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर सदर पुरवठा 60 दिवसांत पुरवठा करावा, असे आदेश दिनांक 30/12/2016 मध्ये नमुद असतांना सदर मालाचा पुरवठा शाळास्तरावर कधी प्राप्त झाला? याची नोंद व पोहच पावत्या दिसुन आलेल्या नाहीत. पोहच पावत्या लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा.

7) सदर साहीत्याचा पुरवठा झाल्यानंतर गटस्तरावरील गट विकास अधिकारी पंचायत समिती यांच्या सुव्यवस्थित माल प्राप्त झाल्याचा पोहच पावत्या, प्रमाणपत्र, दिनांकीत स्वाक्षरी व साठा नोंदवहया लेखापरीक्षणात तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

**3.67 30 सप्टेंबर च्या पट संख्येवर शिक्षक पदे निश्चित करणे व मंजूर पदापेक्षा कमी - अधिक शिक्षकांचे समायोजन करणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पीआरई 1078/2382/7, दिनांक 28/08/1980 व शासन निर्णय क्रमांक पीआरई /1092/221/प्रशि/1, दिनांक 30/01/1996 आणि शासन परिपत्रक क्रमांक जिप/908/प्र.क्र.36/आस्था-14, दिनांक 06/10/2008 अन्वये दिनांक 30 सप्टेंबर च्या पट संख्येवर व उपस्थितीनुसार शाळानिहाय शिक्षक संख्या निश्चित करणे आवश्यक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 18/05/2011 च्या शासन निर्णयानुसार शिक्षक समायोजन हे दिनांक 30/10/2016 पर्यंत होणे आवश्यक होते. सदर समायोजन 04/03/2017 पर्यंत झालेले नाही. अतिरिक्त ठरलेल्या 25 शिक्षकांचे समायोजन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेश क्रमांक 128, 129 व 130, दिनांक 04/03/2017 अन्वये करण्यात आलेले आहे. सदर समायोजनाची कार्यवाही ऑक्टोबर 2016 पर्यंत न झाल्याने शिक्षकांना माहे ऑक्टोबर 2016 ते मार्च 2017 पर्यंत 6 महिने कामाशिवाय वेतन व भत्ते अदा झाल्याचे दिसून येत आहे. तसेच समायोजित शिक्षक नमुद केलेल्या शाळेवर हजर झाले किंवा कसे, याबाबत तालुकानिहाय अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही**.** त्यामुळे समायोजनाचे आदेशाचे पालन गट स्तरांवरुन होवुन त्यात कोणताही फेरबदल झाला किंवा कसे, याची अचुकता करता येत नाही**.**

2) दिनांक 18/05/2011 या शासन निर्णयानुसार दिनांक 30 सप्टेंबर च्या पटसंख्येवर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन 31 ऑक्टोंबर पर्यंत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत सन 2014-2015 च्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 4, सन 2015-2016 च्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्रमांक 7 शिक्षक समायोजनाबाबत नोंदविण्यात आलेला असून देखील सन 2016-2017 या वर्षात जिल्हा परिषदेने गांभीर्याने प्रशासकीय कार्यवाही केलेली नाही व उपाययोजना केलेली नाही. सदर अनियमिततेमुळे शासनाचा मुळ उदिष्टांचे उल्लंघन झाले आहे. सबब शिक्षण विभागाने समायोजनाची प्रक्रिया विहित कालावधीत न राबविल्यामुळे शिक्षक शाळेवर अतिरिक्त असतांना वेतन व भत्ते अदा करण्यात आलेले आहे. तरी याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

**3.68 राज्यातील अनुसुचित जमातीच्या इयत्ता 01 ते 10 वी मध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यामिक शिष्यवृती योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद, नंदुरबार, शिक्षण विभागाचे सन-2016-2017 या वित्तीय वर्षाच्या कालावधीचे लेखापरीक्षणात खर्चाचे प्रमाणंकाचे तपासणी केली असता राज्यातील अनुसुचित जमातीच्या इयत्ता 01 ते 10 वी मध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यामिक शिष्यवृती योजनांर्तगत सन 2015-2016 या कालावधीचे अनुदानातून शिष्यवृत्ती प्रदानावर रक्कम रुपये 23,54,07,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आदिशि-2009/प्र.क्र.20/का.12, दिनांक 31/05/2010 अन्वये इयत्ता 1ली ते 10 वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसुचित जमातीच्या विदयार्थीचे विहित नमुन्यातील परिशिष्ट अ मध्ये अर्ज भरण्याची जबाबदारी संबधित शाळेची संस्थेची आहे. तसेच अर्जाची छाननी करुन मुख्याध्यापकांनी जातीचे प्रमाणपत्रासहित एकात्मिक आदिवासी प्रकल्प यांचेकडे प्रवेश अर्ज अंतिम झाल्यापासून 1 महिन्यात किंवा जुलै महिना अखेर सादर करावी. सदरची शिष्यवृत्ती तीन हप्त्यात सप्टेंबर ते 30 सप्टेंबर, 15 डिसेंबर ते 31 डिसेंबर व 15 मार्च ते 31 मार्च अखेर वाटप करण्याबाबत आदेश असतांना संबंधित विद्यार्थांना माहे-मार्च अखेर बँक खाते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आलेली नाही. ब-याच विदयार्थांना बँकेत संगणकीय प्रणालीदवारे लेखापरीक्षणाअखेर जमा झालेले दिसून येत नाही. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या रकमा बँकेत पडून आहेत.

2) सदरची योजना सन 2010-2011 पासून अंमलात आलेली असतांना सन 2015-2016 या शैक्षणिक कालावधीची शिष्यवृत्ती प्रदानासाठी आदेशित असतांना मुख्याध्यपकांनी विहित मुदतीत विदयार्थ्यांचे अर्ज सादर केली किंवा कसे, तसेच संगणकीय प्रणाली तसेच राष्ट्रीयकृत बँकेकडून पाहिजे तसे सहकार्य वेळीच प्राप्त न करता सदरचा निधी लेखापरीक्षणापावेतो विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. निधीचा विनावापर पडून आहे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1002/प्र.क्र.128/आर्थोपाय दिनांक 06/06/2008 नुसार ज्या वर्षात अनुदान प्राप्त झाले आहे, त्या वर्षाच्या पुढील वर्षात खर्च करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. अन्यथा सदरचे अनुदान पुढील वर्षात माहे-जून अखेर शासन सदरी भरणा करण्याबाबत आदेश निर्गमित आहे. असे असतांना विभागाने नियमोचित कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### 3.69 शालेय पोषण आहाराची धान्यादी योजनेच्या खर्चाच्या रकमेबाबत

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचेकडील शालेय पोषण आहारापोटी प्राप्त अनुदान व खर्चाची तपासणी केली असता खालील नमूद केलेप्रमाणे अनुदान प्राप्त झालेले असून 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 3,32,69,906/- खर्च केलेबाबत पडताळणी केली असता अनियमितता आढळून आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 मधिल कलम 194(क) व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा प्र-5, दिनांक 22/02/2008 नुसार पुरवठाधारकांना अदा करण्यात येणा-या देयकातून 2 टक्के आयकर रक्कम रुपये 6,85,360/- कपात करण्यात आलेला नाही. सदर मालाचा पुरवठा शाळास्तरावर असल्याने देयकातून वाहतूक खर्चाचा समावेश करण्यांत आलेला आहे. सबब आयकर कपात करणे अनुज्ञेय आहे. पोट ठेकेदार यांचेशी केलेल्या करार अट क्रमांक 29 नुसार TDS कपात करणे आवश्यक आहे.

2) जिल्हा परिषदेकडे अनुदान उपलब्ध असून देखील जुलै 2016 अखेरची देयके अदा केलेली आहेत. त्यामुळे अनुदान पुर्ण खर्च झालेले नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात अनुदान शिल्लक आहे. शालेय पोषण आहार योजनांचा खर्च त्याच वर्षात होणे आवश्यक आहे. खर्च न करण्याचे प्रयोजन विशद करावे.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 नुसार विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र देयकांवर नोंदविण्यात आलेला नाही. तरी देयके पारीत करण्याचा अधिकारी सदर प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक आहे. तसेच देयकासोबत पिवळया रंगाची पावती जोडण्यात आलेली नाही.

4) अन्न धान्यादी मालाचा पुरवठाचे Food Analyst, Public Health Lab. Nasik Analysis report No. DhL/Food/G-138-1325/4193, दिनांक 04/09/2016 नुसार जोडण्यात आलेला आहे. सदर Analysis report मध्ये मालाचा डिलीव्हरी चलन, बॅच नंबर त्यामुळे कोणत्या डिलीव्हरी चलनाने व बँचचा आहे? याची पडताळणी करता आली नाही. याची चाचणी केलेली आहे. देयकासोबत चाचणी अहवाल, डिलीव्हरी चलन जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे पुरविण्यत आलेला माल व देयकानुसार पुरवविण्यात आलेल्या मालाची पडताळणी करता आली नाही.

5) चाचणी अहवालासाठी सॅम्पाल पाठविण्यात आलेला आहे. परंतु, त्याचा पत्रव्यावहार नस्तीसोबत जोडलेला नाही. त्यामुळे सॅम्पल विहित दिनांकापासून अहवाल प्राप्त केलेला आहे. या बाबींची पडताळणी करता आलेली नाही. चाचणी अहवालासाठी रुपये 2,000/- शासन लेख्यात समाविष्ट केलेला नाही. चाचणी अहवाल शिक्षण विभागाने करुन देण्यात यावे किंवा पुरवठाधारकाने दयावेत, याबाबत स्थिती विशद करावी.

### 3.70 परिभाषित अंशदान वर्गणीबाबत

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-1005/सेवा-4, दिनांक 31/10/2005 रोजी किंवा त्यानंतर राज्यशासन / जिल्हा परिषद सेवेत नियुक्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारीसाठी नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अंमलात आणली आहे व ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-1007/

प्रक्र.181/ आस्था-11, दिनांक 21/05/2010 अन्वये जिल्हा परीषद कर्मचा-यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे नियम व अंमलबजावणी कार्यपध्दती देण्यांत आली आहे. दिनांक 31/10/2005 रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत रुजु होणा-या कर्मचा-यांसाठी शासनाने परिभाषित अंशदायी योजना सुरु केलेली आहे. सदरच्या योजनेनूसार कर्मचारी यांचे वेतनातून (वेतन+ग्रेडपे+महा.भत्ता)10 टक्के रकमेची दरमहा कपात करावयाची असून शासन त्यास तेवढयाच रकमेचे अंशदान देणार आहे. त्यातंर्गत शिक्षण विभागाकडील प्राप्त परिभाषित अंशदायी योजनेच्या शासनाकडील थकबाकीच्या (अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्टानूसार) तपशिलानूसार सन 2008-2009 ते सन 2016-2017 अखेर शिक्षकांचे अंशदान रुपये 11,78,12,239/- जमा असून शासनाचे अंशदान रुपये 11,78,12,239/- व त्यावरील व्याजाची रक्कम रुपये 4,34,85,511/- असे एकूण रुपये 16,12,97,750/- येणे बाकी आहे. सदर बाब गंभीर स्वरुपाची असून सदरबाबत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे. शासनाकडून येणे बाकी असून रक्कम प्राप्त होण्याच्या अनुषंगाने केलेले कार्यवाहीचे अभिलेख अनुपालनासह सादर करण्यात यावे तसेच दरमहा अंशदान वसुलीचे ताळमेळ कोषगार अधिकारी यांचेकडून करुन घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आलेले नाही. तरी सदरबाबत पूर्तता अनुपालन दर्शवावे

**3.71 शालेय पोषण आहारातील अनियमितता**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, जळगावंकडील शालेय पोषण आहार सन 2016-2017 च्या नस्तीची पडताळणी केली असता आर्थिक वर्षामध्ये तालुकास्तर व जिल्हास्तरावर इयत्ता पहिली ते पाचवी व इयत्ता सहावी ते आठवी साठी केंद्र हिस्सा रुपये 29,04,53,800/- व राज्य हिस्सा रुपये 21,17,90,000/- अनुदान प्राप्त झालेले आहे. सदर एकूण रक्कम रुपये 50,22,43,800/- मधून एकूण रूपये 49,52,88,110/- खर्च करण्यात आलेला आहे. वार्षिक लेख्यातील आकडेवारीनूसार सन 2015-2016 ची शालेय पोषण आहाराची अखर्चित रक्कम रुपये 18,21,51,229/- असून सन 2016-2017 या वर्षात रुपये 18,91,06,919/- अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जळगावं जिल्हयाकरिता मागविण्यात आलेल्या जाहिर ई- निविदेमधून जळगावं जिल्हातील धान्यादी मालाचा पुरवठा करणेस्तव श्री साई मार्केटींग आणि ट्रेडींग कंपनी, जळगावं या निविदाधारकाची न्यूनतम दराचा निविदाधारक म्हणून निवड झालेली आहे. सदर निविदा धारकाची पुरवठेदार म्हणून जळगावं जिल्हयाकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे. उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्रक्र/82/भाग-III/ उदयोग-4, दिनांक 30/10/2015 व दिनांक 01/12/2016 नूसार पूरवठादाराचे धान्यादी मालाचे दर व प्रत्यक्ष बाजार भाव याबाबत खात्री केल्याचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

2) दिनांक 26/02/2010 च्या परिपत्रकातील क-2 नूसार गटशिक्षण अधिकारी/अधिक्षक ध्यान्यादी मालाचे पुरवठा आदेश संबधित पुरवठादारास देतील व तत्पूर्वी शिक्षणधिकारी (प्राथमिक)यांची पूर्वपरवानगी घेतील. तसेच सदर पुरवठा आदेशाची प्रत शिक्षणधिकारी (प्राथमिक) यांना देण्यात येईल. याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. कारण संबधित नस्तीसोबत गटशिक्षण अधिकारी / अधिक्षक ध्यान्यादी मालाचे पुरवठा आदेश आढळून आले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्रक्र383/प्राशि-04, दिनांक 26/02/2010 मधील अट क्रमांक (क-4) नुसार पुरवठा आदेशानंतर पुरवठा धारकाने 15 दिवसांच्या आत मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेत करणे आवश्यक आहे. परंतु, पुरवठा आदेश अप्राप्त असल्याने माल वेळेत पोहोचला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आलेली नाही. तसेच पोहोच पावत्यावरं मालाचा वजन, दर्जा व सुस्थितीत प्राप्त झाल्याची पोहच मुख्याध्यापक देतील. परंतु, पोहोच पावतीवर फक्त मुख्याध्यापकांची स्वाक्षरी असल्याने माल योग्य व सुस्थितीत प्राप्त झाला. तसेच मालाचे वजन योग्य असलेबाबत पडताळणी करता आलेली नाही.

4) उपरोक्त नमूद नमूद शासन परिपत्रकानूसार सर्व क्षेत्रिय अधिकारी जिल्हा भरारी पथके, राज्यस्तरावरील दक्षता पथके यांचेमार्फत आहाराचा दर्जा तपासण्यात येईल. परंतु, नस्तीसोबत याबाबतचा अहवाल आढळून आला नाही. तसेच तांदूळ व इतर धान्यादी मालाच्या पुरवठयासंदर्भात सर्व यंत्रणामध्ये समन्वय राखण्यासाठी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दरमहा जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक(वर्ग-2) शालेय पोषण आहार संदर्भात माल योग्य व नियमित पुरवठा होतो याबाबत खात्री केल्याचे आढळून आलेले नाही.

5) तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक(वर्ग-2) यांनी शाळेला भेटी देऊन पटसंख्या योग्य असलेबाबत तसेच मागणी केलेल्या धान्यादी मालाचे प्रमाण योग्य असलेबाबत खात्री करणे आवश्यक आहे. याबाबतचा तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आलेला नाही.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 22 ब नूसार पुरवठादाराने ग्रामीण भागात पुरवठा केलेल्या मालाची तपासणी जिल्हास्तरीय / तालुकास्तरीय अधिका-यांकडून करण्यात येवून तसेच तपासणी करीता सदरचा माल धान्यादी मालाच्या तपासणीची सुविधा असणा-या शासकिय प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्यात येईल व या व्यतिरिक्त संचालनालयामार्फत नियुक्त प्रयोगशाळा प्रतिनिधीकडून निर्धारित तपशिलानूसार धान्याची गुणवत्ता तपासणीकरीता याद्दच्छीक नमुने (random samples) तपासणीकरीता घेतले जातील. याप्रमाणे संचालनालयामार्फत नियुक्त प्रयोगशाळा प्रतिनिधीकडून घेण्यात आलेल्या नमुने तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आलेला नाही.

7) सन 2016-2017 मधील उक्त सर्व शाळामधील लाभार्थी (विद्यार्थी) संख्या विचारात घेऊन खात्री करुन अनुज्ञेय ठरणा-या स्वयंपाकी / मदतनीस यांना विदयार्थी संख्यानुसारच प्रदान झाले अगर कसे, याची खात्री करुन व जादा प्रदान झाले नसल्याचे प्रमाणित करून अनुपालन सादर करावे.

### 3.72 शालेय विदर्यांथ्यांसाठी डेस्कबेंच खरेदी (आदिवासी क्षेत्रासाठी-टीएसपी)

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** शिक्षण विभागाने सन 2016-2017 मध्ये प्र.क्र.86 दिनांक 10/01/2017 नूसार रुपये 8,10,000/- डेस्कबेंच खरेदीवर खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांनी चोपडा तालुक्यातील 6 शाळांसाठी बँच खरेदीसाठी पत्र क्रमांक नियोजन/जिवाआऊओ/टिएसपी/प्रमा/2015-16/का7(1)1741, दिनांक 18/03/2016 नूसार यादी दिलेली आहे. त्यानूसार व तांत्रिक मान्यता आदेशानूसार 135 नग डेस्कबेंच खरेदी करावयाचे आदेश आहेत. परंतु, प्रत्यक्ष खरेदी 162 नगांची झालेली आहे. एकूण 27 नग जादा खरेदी करण्यात आलेले आहे. तरी सदरबाबत कार्योत्तर मंजूरीही घेण्यात आलेली नाही. उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्रक्र/82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 व दिनांक 01/12/2016 नूसार प्राप्त दर व प्रत्यक्ष बाजार दर याबाबत खात्री केल्याचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

2) उपरोक्त खरेदीसाठी आदिवासी विकास प्रकल्प यावल यांचेकडून निधीची मागणी करणेसाठी दिनांक 08/03/2016 रोजी शिक्षणधिकारी (प्राथमिक) यांना पत्र देण्यात आलेले आहे व दिनांक 09/03/2016 रोजी शिक्षण विभागाकडून सदर खरेदीसाठी निधी मागणी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. तसेच दिनांक 11/03/2016 रोजी रुपये 6,00,000/- चा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सदर योजना आदिवासी क्षेत्रातील शालेय विदर्यांथ्यांसाठी असून नस्तीसोबत आदिवासी क्षेत्रातील शाळेचे डेस्कबेंच मागणी पत्र आढळून आलेले नाही याअर्थी कुठल्याही प्रकारची चौकशी किंवा आढावा न घेता आदिवासी विकास प्रकल्पधिकारी यावल यांचेकडे निधीची मागणी करण्यात आली व प्राप्त निधी खर्ची घालण्यात आला.

3) पुरवठा दाराने सर्वात कमी दर रुपये 5,000/- प्रती नग दिलेले असून शिक्षण विभागाने निविदेत दिलेल्या तांत्रिक specification प्रमाणे बेंचेस आहेत काय? तसेच दिलेल्या specification चे बेंचेसचे बाजारातील दर रुपये 5,000/- प्रती नग पेक्षा कमी नसल्याची खात्री करणे आवश्यक होते. या बाबी नस्तीसोबतच्या टिप्पणीत नमूद असून याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आलेले नाही

### 3.73 शालेय विदयार्थ्यांकरिता टॅब खरेदी करणे (1 ली ते 8 वी -OTSP/TSP)

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** शिक्षण विभागाने सन 2016-2017 मध्ये प्र.क्र. 1200 दिनांक 31/03/2017 नूसार रुपये 42,86,267/- ओटीएसपीसाठी व प्र.क्र. 1201 दिनांक

31/03/2017 नूसार रुपये 15,93,739/- टीएसपीसाठी टॅब खरेदीवर खर्च केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टॅब खरेदी हा तांत्रिक विषय असून इयत्तानूसार टॅबचं प्रयोजन व त्यातील content बदलेल तसेच टॅब ही इलेक्ट्रॉनिक वस्तू असल्याने quality maintance हा महत्वपूर्ण विषय आहे. त्यासाठी सक्षम प्राधिकारामार्फत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असतानां याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) ई-निविदा मार्फत सर्वात कमी दराची निविदा सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला मंडळ सावदा यांची रुपये 24,440/- ची प्राप्त झालेली असून सदर दर बाजारभावापेक्षा खूप जास्त असल्याने काही वाटाघाटीअंती रुपये 9,899/- दर अंतिम करण्यात आला. सदर दरास मान्यता देण्यात येवून खरेदी करण्यात आली. याबाबत फेर निविदा मागविणे हा पर्याय असतांना सदर पर्याय न वापरण्याची कारणे नमूद करण्यात आलेली नाहीत. उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्रक्र/82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 व दिनांक 01/12/2016 नूसार प्राप्त दर व प्रत्यक्ष बाजारातील दर याबाबत खात्री केल्याचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

3) तांत्रिक मान्यता आदेशात नमूद केलेप्रमाणे टॅबचे specification प्रमाणे टॅब प्राप्त झाल्याचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाही.

4) तसेच टॅब खरेदीनंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शाळास्तरावरुन प्राप्त करणे आवश्यक असतानां याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच तांत्रिक मान्यता आदेशानूसार देखभाल दुरुस्ती व साहित्याची सुरक्षितता याबाबत मुख्याध्यापकांचे संमत्रीपत्रक घेणे आवश्यक होते. सदरबाबतचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाहीत.

### 3.74 नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत जिल्हा परिषदप्राथमिक शाळांना ई-लर्निग सुविधा पुरविणेबाबत

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** शिक्षण विभागाने सन 2016-2017 मध्ये प्र.क्र. 996 दिनांक 31/03/2017 नूसार रुपये 39,81,348/- शाळानां ई - लर्निगं साहित्य पुरवठा करणेसाठी खर्च करणेत आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेतंर्गत ज्या शाळांना लाभ देण्यात येत आहेत, त्या शाळानी इतर कोणत्याही योजनेतुन सदरच्या योजनेचा लाभ घेतलेला नाही. याबाबत कोणतेही दस्तेऐवज नस्तीत पहावयास मिळाले नाही. त्यामुळे दुबार लाभ मिळाला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर लाभासाठी शाळा निवडीचे निकष कसे लावण्यात आले? सदरबाबत खुलासा करण्यात यावा.

2) गटशिक्षणाधिकारी यांनी दर महा सदर उपक्रमाची गुणवत्ता मुख्याध्यापक बैठकीतुन व क्षेत्रिय अधिकारी भेटीतुन तपासणी केलेबाबतचे दस्त् ऐवज नस्तीत पहावयास मिळाले नाही

3) सदर साहित्य कार्यान्वीत झालेनंतरचा शाळेचा गुणवत्ता अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही याअर्थी शासन मुलांच्या उन्नतीचे उद्देश ठेवून नाविन्यपूर्ण योजना शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने राबवित असून सदर योजनातंर्गत प्राप्त साहित्याच्या उपयोगाबाबत संबधित शाळेने तसेच मुख्याध्यापक / गटशिक्षणधिकारी यांनी जागृत राहणे व त्यासंबधीच्या अडचणी जाणून याबाबत तांत्रिक मार्गदर्शन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन विदयार्थ्यांच्या उन्नतीत बाधा येणार नाही. परंतु, याप्रकारे कोणतीही कार्यवाही झाल्याचे अभिलेख नस्तीसोबत आढळून आलेले नाहीत. यावरुन शासन योजनेचा उद्देश सफल झाल्याचे निष्पन्न होत नाही.

### 3.75 विक्रम साराभाई स्पेस सेंटर, त्रिवेंद्रम येथे शैक्षणिक सहलीसाठी परवानगी घेणेसाठी केलेल्या विमान प्रवासाबाबत.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद, अहमदनगर शिक्षण विभागाच्या सन 2016-2017 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात विक्रम साराभाई स्पेस सेंटर, त्रिवेंद्रम येथे

शैक्षणिक सहलीसाठी परवानगी घेणेसाठी केलेल्या विमान प्रवासाबाबत रक्कम रूपये 45,746/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुबंई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 414(1) व (2) व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास1010/प्र.क्र.2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 नुसार सचिवांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकार्यांना विमानप्रवास अनुज्ञेय असणार नाही. तसेच प्रवास भत्याबाबत नियम 1 ते 15 नमुद असतांना व प्रथम प्रवास करून झालेल्या खर्चाचे प्रवासभत्ता देयक कार्यालयाला सादर करून खर्चाची प्रतीपुर्ती घेता आली असती. श्री.प.दि. यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग व श्री. विकास भास्कर साळुंखे, कनिष्ठ सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग हे दिनांक 28/10/16 ते 30/10/16 पर्यंत पुणे ते त्रिवेंद्रम असा विमान प्रवास केला व त्यासाठी रूपये 45,746/- इतका खर्च चैतन्य टेव्हल, अहमदनगर यांना अदा करण्यात आला. तरी वरील शासन निर्णयाचे पालन न झाल्याने झालेला खर्च अमान्य करण्यात येत आहे.

2) वरील प्रवासासाठी चैतन्य टेव्हल, अहमदनगर याची निवड कोणत्या आधारे केली? त्याचे निविदा, दरपत्रक, करारनामा इत्यादी लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने केलेली निवड नियमबाह्य झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी झालेली निवड नियमाप्रमाणे झाल्याचे खात्री लेखापरीक्षणास पटवावी.

3) चैत्यन्य ट्रेव्हल एजन्सी, अहमदनगर यांनी रक्कम रुपये 45,746/- चे बिल अदा करण्यात आले आहे. परंतु, त्यातुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 क नुसार 2.3 टक्के ने रुपये 1,056/- आयकर कपात केलेला नाही. तरी तो संबधित संस्थेकडून वसुल करून अनुपालन सादर करावे

4) वरील प्रवासासाठी प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी, स्थायी ठराव इत्यादी मंजूरी हे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तरी वरील मंजुरी लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन सादर करावे

**3.76 शालेय ग्रीन बोर्ड खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद सेस सन 2016-2017 अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांना ग्रीन बोर्ड खरेदी प्रमाणक क्रमांक 286, दिनांक 31/03/2017 अन्वये ग्रीन बोर्ड खरेदी रक्कम रूपये 20,95,947/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, अहमदनगरच्या सदर ग्रीन बोर्ड तपासणीच्या पत्र क्रमांक कार्या/17, दिनांक 24/01/2017 नुसार यांत्रिकी उपविभागाने दिनांक 25/01/2017 भौतीक तपासणी केली असता तपासणीमध्ये पुरवठादाराने शासनास सादर केलेल्या दर करारातील R.C. Annexure मधील अनुक्रमांक 3, 6, 7, 8 चे a,b,c, 12 व 16 यामध्ये वरीलप्रमाणे त्रुटी आढळून आलेल्या आहेत. पुरवठादार यांनी जिल्हा परिषदेला करून दिलेला करारनामा दिनांक 16/09/2016 चे करारनाम्यातील मुद्दा क्रमांक 3 तपासणीमध्ये मान्य झालेले ग्रीन बोर्ड स्विकारले जातील, असे स्पष्ट नमूद केलेले असतांना यांत्रिकी उपविभागाने दिनांक 25/01/2017 भौतीक तपासणीमध्ये पुरवठादाराने शासनास सादर केलेल्या दर करारातील R.C. Annexure मधील अनुक्रमांक 3, 6, 7, 8 चे a,b,c, 12 व 16 यामध्ये त्रुटी आढळून आलेल्या असतांना दर करारातील R.C. Annexure प्रमाणे ग्रीन बोर्ड देणे आवश्यक असतांना किंवा तशी मागणी न करता पुरवठादारांस नाममात्र रूपये 50,000/- ची दंड आकारणी करून निकृष्ट दर्जाच्या ग्रीन बोर्डची खरेदी केली आहे. यावरून जिल्हा परिषदेने पुरवठादाराचे हित जोपासल्याचे दिसते.

2) 14 तालुक्यांसाठी आवश्यक ग्रीन बोर्डची संख्या निश्चित न करता अंदाजे खरेदी केल्याने विनाकारण सदोष 39 नग ग्रीन बोर्ड जिल्हा परिषदेच्या साठा नोंदवहीनुसार शिल्लक आहेत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र.56/वित्त-9, दिनांक 09/08/2016 मधील निर्देशानुसार कार्यवाही झालेली नाही.

**3.77 बाल आनंद मेळावा खर्चाच्या उपयोगीतेबाबत**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** जिल्हा परिषद, अहमदनगर, शिक्षण विभागाच्या सन 2016-2017 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2011/प्रक्र

680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 नुसार बाल आनंद मेळावासाठी रुपये 28,000/- प्रमाणे एकुण 13 तालुक्यातील 75 गटात रूपये 21,00,000/- चे वाटप पंचायत समितीमार्फत करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2011/प्रक्र 680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 नुसार तसेच शाळेमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 अन्वये बाल आनंद मेळावे घेणेबाबत तरतूद नाही.

2) बाल आनंद मेळावे घेणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 24/11/2017 अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या अटी, शर्ती व मार्गदर्शक सूचनांची लेखी स्वरुपात मागणी केली असता खर्चाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे लेखापरीक्षणास शिक्षण विभागाकडून उपलब्ध झालेली नाहीत. तसेच सदरच्या खर्चाबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 अन्वये सदरचा खर्च केल्याचे सांगण्यात आले. परंतु, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 अन्वये जी बालके शाळेत जात नाहीत, अशी बालके स्थानिक प्राधिकरण, राज्य शासनाने याबाबतीत अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणाच्या साधनांद्वारे दरवर्षी निश्चित करून वयानुसार वर्गामध्ये प्रवेश देईल, त्यांचे गरजेनुसार विशेष प्रशिक्षण आयोजित करतील. याबाबत सदर अधिनियमात पध्दत नमूद केली आहे.

3) बाल आनंद मेळावे घेण्याबाबत जिल्हा परिषद, अहमदनगरकडील पत्र क्रमांक 94/2016 दिनांक 18/12/2016 नुसार नमुद केलेल्या बाब क्रमांक अ, ब, क मधील बाब क्रमांक 1 ते 15 चा विचार करता शालेय पातळीवर सुद्धा अनुदान न घेता अत्यल्प खर्चात सदरचे कार्यक्रमाचे आयोजन करता आले असते परंतु, पंचायत समिती उदा.दाखल अहमदनगर, कोपरगाव लेख्याचे पडताळणीत बाल आनंद मेळावे साजरे करण्यासाठी रुपये 5,000/-, 8,000/-, 13,000/-, 15,000/- हा खर्च मंडपासाठी एकच बाबीवर केल्याचे दिसुन आले. त्यामुळे झालेला खर्च संयुक्तिक वाटत नाही.

4) अशासकीय संस्थांची मदत घेऊन बाल आनंद मेळावे साजरे करता आले असते. बाल आनंद मेळावासाठी जिल्हा परिषदसेस योजना रूपये 21,00,000/- रक्कमेचा अपव्यय केल्याचे आढळून आले. अशा प्रकारच्या झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे मत आहे

### 3.78 जिल्हा नियोजन समितीकडील जिल्हा परिषद शाळा दुरुस्ती अखर्चित अनुदाना बाबत

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीकरीता रक्कम रुपये 2,75,00,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1310/प्रक्र263/एसेम-1, दिनांक 18/10/2016 अन्वये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा परिषद / शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळांचे इमारत बांधकाम / विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदांना देण्यात येणाऱ्या अनुदाना संदर्भात मार्गदर्शन सुचना क्रमांक 3 अन्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांनी पुढील वर्षात हाती घ्यावयाच्या कामांची यादी आधीच्या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत अंतिम करावी. सदर यादी जिल्हा नियोजन व विकास परिषद आयुक्त (शिक्षण) याना सादर करावी. असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) अट क्रमांक 4 अन्वये जिल्हा परिषद / शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये असलेली विध्यार्थी संख्या व उपलब्ध वर्ग खोल्या विचारात घेऊन, त्याप्रमाणे शाळा इमारत बांधकाम / विशेष दुरुस्ती यासाठी निधी उपलब्ध करणे ही, शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) अट क्रमांक 6 अन्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर निधीमधून कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित अन्य विभागाशी समन्वय साधून ही कामे 3 वर्षात पूर्ण करण्याबाबत आवश्यक ते नियोजन करून कामे पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील. असे असताना शिक्षण विभागाकडून याबाबत उदासीनता दिसून येते. संभावित कामांची यादी शिक्षण विभागाकडे पहावयास मिळाली नाही. सदर निधी जिल्हा आधिका-याकडून

दिनांक 09/01/2017 रोजी प्राप्त होऊनसुद्धा शिक्षण विभागाच्या नियोजना अभावी कोषागारातून निधी दिनांक 31/03/2017 रोजी आहारीत करून संबधित विभागांना वर्ग करता आला नाही व पुढील वर्षात निधी वापरात घेतलेली परवानगी यावरून सदर निधी दिनांक 18/10/2016 च्या शासन निर्णयान्वये संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) जिल्हाधिकारी तथा सदस्य जिल्हा नियोजन समिती, पुणे यांचेकडून दिनांक 09/01/2017 रोजी निधी वितरण आदेशान्वये अट व शर्ती क्रमांक 2 अन्वये वितरीत करणेत आलेला निधी आहारण व संवितरण अधिकारी यांनी कोषागारातून तात्काळ आहारीत करणेविषयी सूचित केलेलं असून निधी तात्काळ आहारीत केलेला नाही याचा लेखापरीक्षणास खुलासा करावा.

**3.79 एल पी जी सिलेंडर अनुदान वाटपा बाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** एल पी जी सिलेंडर अनुदान वाटपाकरीता अखर्चित अनुदान रक्कम रुपये 1,70,47,608/- आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मध्ये शालेय पोषण आहार MIS पोर्टलवरील माहिती व या देयाकानुसार अदा केलेल्या 13 तालुक्याकडील शाळांकडे एल पी जी कनेक्शन असलेल्या शाळांच्या आकडेवारीची तुलना केली असता सन 2015-2016 मध्ये एकूण 504 ‘शाळांकडे जुने एल पी जी GAS कनेक्शन असताना दुबार वाटप केल्याने रक्कम रुपये 16,83,360/- संबंधितांकडून वसूल करून शासन निधीत भरणा केल्याचे दर्शवावे.

2) हवेली तालुक्यात शालेय पोषण आहार अंतर्गत शाळांची एकूण संख्या 284 असताना एकूण 90 शाळांकडे एल पी जी कनेक्शन नाही व 194 शाळांकडे जुने कनेक्शन आहे. देयक अदाई करताना फक्त 90 शाळांना रूपये 3,340/- प्रमाणे रक्कम रुपये 3,00,600/- व 140 शाळांना रक्कम रुपये 1890 प्रमाणे 2,46,600/- असे एकूण रक्कम रुपये 5,65,200/- अदा करणे आवश्यक असताना सर्व 230 शाळांना रक्कम रुपये 3,340/- प्रमाणे रक्कम रुपये 7,68,200/- अदा केल्याने रक्कम रुपये 2,03,000/- नियमबाह्य पणे जादा अदाई झालेली आहे.

3) शालेय पोषण आहार योजना मध्यान्ह भोजन योजना आज्ञावलीतील MIS पोर्टल वरील सन 2015-2016 मध्ये एल पी जी सिलेंडर इंधनाद्वारे शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांची तालुकानिहाय यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन 2016-2017 मध्ये कोणत्या शाळांकडे दुबार कनेक्शन झाले? याबाबत पडताळणी करता आली नाही. आता MIS पोर्टल वरील GAS सिलेंडर AVAILABILITY असलेल्या शाळांची तालुकानिहाय यादी व नवीन कनेक्शनकरीता अदा केलेल्या शाळांची यादीची तुलना आपल्या स्तरावरून करून एकाच शाळांना अनुदान दुबार झाले नसल्याबाबतची कागदोपत्री खात्री पटवावी.

4) सदर एल पी जी सिलेंडर अनुदान हे सन 2014-2015 मध्ये प्राप्त असून सदर अनुदानातून सन 2015-2016 मध्ये सन 18 सप्टेंबर 2012 ते मार्च 2013 या कालावधीकरीता एल पी जी सिलेंडर अनुदान वितरीत करण्यात आलेले होते. सदर अनुदान वाटपाची तालुकानिहाय शाळांची यादी उपलब्ध न झालेने तत्कालीन अनुदान वाटप केलेल्या शाळांची तालुका निहाय यादीची तुलना या देयकाद्वारे अदा केलेल्या तालुकानिहाय अनुदान वाटप केलेल्या शाळांशी करून सन 2012-2013 पासून शाळांकडे एल पी जी कनेक्शन नाही. याबाबत कागदोपत्री खुलासा करून दुबार अदाई झाली नसल्याबाबत खात्री पटवावी.

5) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक 31/03/2005 मधील मुद्दा क्रमांक 3 (ब-2) अन्वये अन्न शिजविण्यासाठी एल पी जी सिलेंडर कनेक्शन संबंधित शाळांचे नावावर असणे आवश्यक असताना सन 2015-2016 मध्ये व 2016-2017 पूर्वी तालुकानिहाय एल पी जी सिलेंडर कनेक्शन संबंधित शाळांचे नावावर असलेल्या शाळांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे जिल्ह्यातील शाळांना दुबार अनुदान वाटप झाल्याबाबत पडताळणी करता येत नाही आता अनुदान वाटप केलेल्या शाळांकडे 2016-2017 पूर्वी एल पी जी सिलेंडर कनेक्शन नाही. याबाबतची पडताळणी करून अनुदान दुबार झाले नसल्याबाबतची खात्री पटवावी.

6) 2014-2015 चे अखर्चित अनुदान रक्कम रुपये 1,70,47,608/- मधून रक्कम रुपये 78,52,670/- खर्च केल्याने कैंद्राकडील अनुदान वापरान्याबाबतचे प्राधिकार व अनुषंग्क्रि अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आले नाही.

7) सन 2015-2016 मध्ये एल पी जी सिलेंडर अनुदान 13 तालुके, 2 महानगरपालिका शिक्षण मंडळे, 3 कटक मंडळे(शिक्षण विभाग) यांना वितरीत केलेल्या अनुदानापैकी 13 तालुके, 2 महानगरपालिका शिक्षण मंडळे, 3 कटक मंडळे यांचेकडील अखर्चित अनुदान रक्कमाची शाळानिहाय यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही तथा शाळांकडील शिल्लक/ अखर्चित अनुदानाबाबत जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध केलेला नाही.

8) सन 2016-2017 चे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करण्यात आलेले नाही.

9) मुख्यालयी असलेली शिल्लक अखर्चित अनुदान रूपये 83,74,928/- रक्कम रुपये शासन सदरी भरणा करून चलने लेखापरीक्षणास दर्शवावी.

**3.80 शालेय पोषण आहार योजना, व्यवस्थापन व मूल्यमापन अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधन अनुदान वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** शालेय पोषण आहार योजना, व्यवस्थापन व मूल्यमापन अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधन अनुदान रक्कम रूपये 18,43,000/- वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रकारचे अनुदान, 13 तालुके कडील महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/प्रक्र91/प्राथ-4, दिनांक 10/02/2010 मधील अट क्रमांक 11 ब नुसार जिल्हा कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देताना निवड झालेल्या डाटा ऑपरेटर यांचे करारनामा करून घेणे अन्वये 2 महानगरपालिका शिक्षण मंडळे, 3 कटक मंडळे (शिक्षण विभाग) यांना अनुदान वाटपाच्या नस्ती व अनुषंगिक अभिलेखे माहिती / अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाहीत.

2) वरील प्रकारचे अनुदान, 13 तालुके कडील महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/प्रक्र91/प्राथ-4, दिनांक 10/02/2010 मधील अट क्रमांक 12 कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देताना निवड झालेल्या डाटा ऑपरेटरशी रक्कम रुपये 100/- चे मुद्रांकावर बंधपत्रावर करारनामा करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/प्रक्र91/प्राथ-4, दिनांक 10/02/2010 मधील 2 अन्वये डाटा ऑपरेटर यांची नियुक्ती करताना नियुक्ती कालावधी 1 वर्षाचा असेल व 1 वर्ष संपल्यानंतर सदर करार आपोआप संपुष्टात येईल असे असताना सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, पुणे यांनी 13 तालुक्याकडील, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ व मुख्यालय अशा एकूण 15 डाटा ऑपरेटर याचे नियुक्तीबाबतचे केलेले करारनामे व नियुक्ती अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाहीत. त्यामुळे सदर कालावधीत वितरीत केलेले अनुदान खर्च रक्कम रुपये 18,43,000/- तात्पुरता अमान्य करणेत येत आहे.

4) प्राथमिक शिक्षण संचालनालय ज्ञापन क्रमांक सी -06 अन्वये कमांक शापोआ/2016/17/तरतूद /प्राशीस-301/3369 दिनांक 24/06/2016 अनुदान प्राप्त झाले असून व शिक्षण अधिकारी प्राथमिक / मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे जाक्र.शिक्षण/प्राथ./शापोआ/388/2016, दिनांक 25/08/2016 अन्वये ज्ञापन 1 नुसार एप्रिल 2016 ते सप्टेबर 2016 या सहा महिने कालावधी करीता 13 तालुक्याकडील एकूण 13 डाटा ऑपरेटरकरीता रक्कम रुपये 7,48,800/- व मुख्यालयाकरीता रक्कम रुपये 1,73,200/- अशा एकूण रूपये 9,22,000/- इतके अनुदान कोषगारातून वितरीत करण्याकरीता काढून वित्त प्रेषण अन्वये वितरीत करण्यात आलेले आहे. वास्तविक पाहता 13 तालुके करीता व 1 मुख्यालय असे एकूण 14 डाटा एन्ट्री ऑपरेटरकरीता एकूण 6 महिन्याकरीता रक्कम रुपये 8,06,400/- एवढीच रक्कम कोषागारातून देयाकान्वये काढणे आवश्यक असताना जादा अनुदान रक्कम

1,15,600/- काढल्याने महाराष्ट्र कोषागार नियम 129 चे पालन न केल्याने व मार्च 2017 अखेर सदर रक्कम जिल्हा परिषदेने 2202 लेखाशीर्षाखाली ठेवल्याने नियमबाह्यता झालेली आहे.

5) मुख्यालयातील निवड समितीद्वारे निवड झालेले 13 तालुक्यातील कार्यरत, 2 मनपा व मुख्यालयातील कार्यरत डाटा एन्ट्री ऑपरेटरचे निवडी विषयक, सन 2016-2017 मधील उपस्थिती अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाहीत.

6) प्राथमिक शिक्षण संचालनालय ज्ञापन क्रमांक सी -10 अन्वये कमांक शापोआ/2016/17/तरतूद /प्राशीस-301/5093 दिनांक 18/10/2016 अन्वये प्राप्त झालेल्या व शिक्षण अधिकारी प्राथमिक / मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे जाक्र.शिक्षण/प्राथ./शापोआ/273/2017 दिनांक 31/03/2017 अन्वये वाटप करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिकाकडील नियुक्त कार्यरत डाटा एन्ट्री ऑपरेटर निवड प्रक्रिया अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आलेले नाहीत.

7) मुख्यालयातील प्रमाणक क्रमांक 496 दिनांक 15/10/2017, 1303 व 1304 दिनांक 31/03/2017 लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत.

8) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/प्रक्र91/प्राथ-4,दिनांक 10/02/2010 अन्वये नियुक्त केलेल्या तालुक्याकडील पंचायत समिती शिक्षण विभागाकडे डाटा एन्ट्री ऑपरेटर सन 2016-2017 मध्ये कार्यरत नसताना वा डाटा एन्ट्री ऑपरेटर नव्याने विहित पद्धतीने नियुक्ती केलेली नाही. हे माहित असताना जाणीवपूर्वक तालुका बारामती, जुन्नर, आंबेगाव, पुरंदर, हवेली, जुन्नर, महानगरपालिका पुणे, महानगरपालिका पिंपरी चिंचवड व मुख्यालय, पुणे या शालेय पोषण आहार डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधनकरीता अदाई केलेले अनुदान रक्कम रुपये 10,36,800/- (9X12X9,600) वसूल करून शासन निधीत भरणा करण्यात यावे.

9) 13 तालुके व मुख्यालय डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधन यांचे सन 2016-2017 अखेरचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात यावे.

## 3.81 शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत मोबाईल van द्वारे इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत मोबाईल van द्वारे इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाकरिता रकक्म रूपये 10,35,227/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या नस्तीला माहे ऑक्टोबर 2015 ते 31/03/2015 या कालावधीतील विद्या प्रतिष्ठान बारामती संस्थेमार्फत ज्या 3 मोबाईल van चा वापर करून देयक अदायगी करावयाचे आहे, त्या वाहनांचा नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे:- 1) MH 12 FC 9852, 2) MH 12 FC 9853, 3) MH 12 FC 9854 परंतु, बिलामध्ये जोडलेल्या प्रमाणपत्रानुसार वाहन क्रमांक

1. MH 12 B 124
2. MH 12 FC 9853
3. MH 12 FC 9854 असे नमूद आहेत. अदा केलेल्या बिलानुसार वाहन क्रमांक MH 12 FC 9852 ऐवजी MH 12 B 124 हि मोबाईल VAN सदर कालावधीत संस्थेने वापरलेली दिसून येते. परंतु, सदर कावाहानास योग्य त्या प्राधिका-याची मान्यता घेतलेचे नस्तीला दिसून आले नाही.

2) योजनेच्या अट व शर्ती 1 नुसार फक्त जिल्हा परिषदेच्या इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणेकरीता तरतूद असून योजनेमध्ये खाजगी शाळांसाठी तरतूद नाही.

3) दरमहा गटविकास अधिकारी यांना अहवाल देणे बंधकारक असताना नस्तीस अहवाल दिसून आला नाही.

4) मोबाईल VAN चे फिरती नोंदवही, आरसी टी सी, ठेवणे आवश्यक असताना नोंदवही निदर्शनास आली नाही.

5) प्रशिक्षण दिल्याबाबत व प्रशिक्षण घेतल्याबाबत संबधित शाळांकडील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) अट व शर्तीनुसार दररोज 2 शाळांना प्रशिक्षण दिलेबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) 1. MH 12 FC 9852

2. MH 12 FC 9853

3. MH 12 FC 9854 या तीन VAN चे सन 2011 या वर्षात मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे नावे प्रादेशिक वाहन निरीक्षक कार्यालय, पुणे यांचेकडील आर सी टी सी नोंदणी (REGISTRATION) असताना सदर VAN करीता संचालक, विद्या प्रतिष्ठान इन्स्टिट्यूट इन्फोरमेशन टेक्नोलॉजी, बारामती यांना माहे ऑक्टोबर 2015 ते 31/03/2015 या कालावधीकरीता वाहन व प्रशिक्षणकरीता थकीत देयकांचे बिल देण्याचे प्रयोजनाचा कागदोपत्री खुलासा करण्यात यावा, अन्यथा रक्कम रुपये 10,35,227/- वसूल करून जिल्हा निधीत भरणा करण्यात यावा.

8) सन 2012-2013 पासून उपरोक्त 3 वाहनाकरीता जिल्हा परिषदेने केलेला खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

9) सन 2013-2014 पासून जिल्हा परिषद मालकीच्या वाहन क्रमांक 1. MH 12 FC 9852, 2. MH 12 FC 9853, 3. MH 12 FC 9854 या मोबाईल VAN प्रशिक्षणाकरिता वाहनाकरीता जिल्हा परिषदेने अदा केलेल्या प्रमाणकांची आपल्या स्तरावरून अवलोकन करून वाहने जिल्हा परिषदेच्या मालकीची असताना त्याकरीता अदा केलेल्या रक्कमा कोणत्या नियमान्वये / प्राधिकारान्वये देणेत आलेल्या आहेत व त्यामध्ये नियमबाह्यता झाली नसल्याचे लेखापरीक्षणास सादर करावे.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 36 नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.82 जिल्हा परिषद शाळांना डस्ट बिन पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** जिल्हा परिषद शाळांना डस्ट बिन पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 37,02,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखास 2014/ प्र.क्र 2/ भाग - III/ उद्योग- 4, दिनांक 01/12/ 2016 मधील परिच्छेद क्रमांक 3.11.2 नुसार चिन्हांकीत नसलेल्या वस्तुची खरेदी करताना उत्पादनाचा दर्जा तपासणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक असताना प्रयोगशाळा अहवाल उपलब्ध नाहीत.

2) परिच्छेद क्रमांक 3.12.1 अन्वये किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा साठी DGS & D कडून खरेदी करण्यापूर्वी इतर फर्मकडून 3 दरपत्रके मागवून खात्री करणे आवश्यक असताना मागविलेली दरपत्रके संगणकीय असल्याने ती लेखापरिक्षकास ग्राह्य धरता येणार नाहीत.

3) नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 4.14 अन्वये सूक्ष्म व लघुउद्योगाकडून खरेदी करण्यासाठी साठून ठेवलेल्या वस्तूंच्या यादीनुसार परिशिष्ट 17 मध्ये एकूण 241 यादींचा समावेश केलेला असून त्यापैकी अनुक्रमांक 48 नुसार डस्टबिन हा राखीव बाब असताना सदरची खरेदी DGS & D कडून खरेदी केल्याबाबत लेखापरीक्षणास खुलासा करावा.

4) प्रत्यक्षात प्राप्त मागणीप्रमाणे तपासली असताना मुळशी, पुरंदर, इंद्रपूर या तालुक्यातील मागणी वगळता इतर तालुक्यातील मागणी वास्तव नसल्याचे दिसून येते खेड व वेल्हा यांनी मागणी नोंदविलेले दिसून आले नाही तरी पुरवठा आदेशात सदर तालुक्यांना पुरवठा झाल्याचे दिसून आले

5) 11 तालुक्यातील गटशिक्षणाधिका-या मार्फत एकूण 9,908 वर्ग खोल्या दर्शवून सदर पुरवठा आदेशानुसार 13 तालुक्यातील एकूण 15,000 वर्ग खोल्यांना डस्ट बिन पुरवठा केल्याचे दिसून आले. पुरवठा व मागणीतील तफावत 5,092 इतक्या डस्टबिनाची एकूण 5,092 X 246.80 प्रमाणे रक्कम रुपये 12,56,705.60

जादा अदाई झाल्याचे दिसून येते. आता जादा अदाई रक्कम रुपये 12,56,705.60 संबधिताकडून वसूल करून जिल्हा निधीत भरणा केल्याचे दर्शवावे.

6) योजनेस मान्यता शिक्षण समितीने दिलेली आहे. परंतु, शिक्षणसमिती प्रोसेडींगला लाभार्थी निवड संख्या याबाबतीत मान्यता घेतलेचे दिसून येत नाही. यावरून शिक्षण समितीच्या मान्यतेशिवाय वर्ग खोल्या जादा दर्शवून खरेदी केलेचे आढळून येते. त्यामुळे जादा खर्च रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही. वसूलपात्र रक्कम रुपये 12,56,705.60

7) तालुक्यांना पुरवठ्या करणाऱ्या वाहनांचा वाहन क्रमांक व वाहनांचा डीलीव्हरी चलनावर संबधित गटशिक्षणाधिकारी यांनी साहित्य प्राप्त झाल्याचे पोहच सह नस्तीला डीलीव्हरी चलन आढळून आले नाही.

**3.83 शालेय पोषण आहार अंतर्गत धान्यादि पुरवठा खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत 6 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,91,75,524/- खर्च करण्यात आला आहे.

शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता 1ली ते 5वी व इयत्ता 6वी ते 8वी मधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यासाठी तांदुळ व्यतिरिक्त डाळी, तेल, मीठ, हळद, मोहरी, कडधान्ये आदि खरेदीसाठी उपरोक्त प्रमाणकान्वये रक्कम रुपये 6,91,75,524/- मे. किरण ट्रेडर्स, फलटण यांना अदा केलेली आहे. सदर धान्यादि मालाचा पुरवठा शिक्षण संचालक, प्राथमिक महाराष्ट्र राज्य व किरण ट्रेडर्स फलटण यांचेबरोबर झालेल्या दिनांक 10/06/2016 चे करारानुसार सदर योजनेअंतर्गत तांदुळ पुरवठा करण्याची रक्कम शिक्षण संचालक कार्यालय, पुणे यांनी अदा करावयाची आहे. त्यानुसार सन 2016-2017 मध्ये धान्यादि मालासाठी वरीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. सदर खर्चासंबंधित कागदपत्रांचे लेखापरीक्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 25 दिनांक 10/10/2017 अन्वये निर्गमित केले. तथापि, संबंधित विभागाने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मागणी व वाटप तक्त्यापेक्षा देयकात माल जादा दाखविलेला आहे. त्यामुळे रक्कम रुपये 39,02,439/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा झालेल्या प्रदानाची रक्कम संबंधित पुरवठादाराकडून वसुलात आणून पुर्तता दाखवावी. तसेच सन 2016-2017 मधील उर्वरीत देयकातून जादा प्रदान झाले नसल्याची खात्री पटवावी.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ2010/प्र.क्र.18/प्रशि4 दिनांक 02/02/2011 मधील बाब क्रमांक 5 मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या नियमित आहाराव्यतिरिक्त पुरक आहार हा अतिरिक्त राहिल, असे असतांना पुरक आहार दिल्याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे पुरक आहार दिला किंवा नाही, हे समजून येत नाही.

3) उपरोक्त प्रमाणकान्वये, धान्यादि मालाच्या रकमा मे. किरण ट्रेडर्स, फलटण यांना प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावती घेणे आवश्यक होते. तथापि, तशा पावत्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रकमा संबंधितांस प्राप्त झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.

4) पुरवठाधारकाने भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून उचल केलेल्या तांदळाची माहिती दरमहा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना दिल्याबाबतचे लेखे सादर केलेले नाहीत. त्यामुळे वर्षात किती तांदुळ उचल केला व किती शिल्लक राहिला? याचा मेळ घेता आला नाही.

5) शिक्षण संचालक, प्राथमिक यांनी दिनांक 10/06/2016 रोजी केलेल्या करारामधील अट क्रमांक 3अ नुसार ग्रामीण भागातील शाळांसाठी आवश्यक धान्यादि मालाचे पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी यांनी द्यावयाचे आहेत. तथापि, त्याप्रमाणे आदेशाची कागदपत्रे नसल्याने तसेच कराररनाम्यातील अट क्रमांक 18 अनुसार विहीत मुदतीत पुरवठा झाला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) दिनांक 10/06/2016 चे कराररनाम्यातील अट क्रमांक 9 नुसार पुरवठादार धान्यादि माल 10 किलो, तेल 1 लिटर, मसाल्याचे पदार्थ 100 ग्रॅम या पटीत पुरवठा करणे आवश्यक आहे. तथापि, बिलामधील आकडेवारी पाहता त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 24 नुसार पुरवठादार यांनी प्रत्यक्ष शाळांना धान्यादि मालाचा किती पुरवठा केला? याचा तालुकानिहाय अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करणे पुरवठाधारकांस बंधनकारक राहील असे असतांना तसे कोणतेही अहवाल पुरवठादार यांनी शिक्षण अधिकारी यांना दरमहा सादर केलेले नाहीत.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 29 नुसार देयकाची अदायगी करतांना उद्गम कपात (TAX DEDUCTION OF SOURCE) करण्यात येईल. तथापि, तशा प्रकारे व्हॅट अथवा आयकर यांची वसुली न करता रकमा अदा केल्या आहेत. (आयकर नियम 194 सी)

9) करारनामा दिनांक 10/06/2016 पहाता मिरची पावडर, हळद, सायाबिन तेल या वस्तु ॲगमार्कच्या पुरवठा करणे आवश्यक होते. तथापि, प्रयोगशाळा चाचणी रिपोर्टमध्ये ॲगमार्कचा उल्लेख नाही. त्यामुळे अदा केलेली रक्कम ही नियमबाहय अदा झालेली आहे.

10) उपयोगिता प्रमाणपत्र सन 2016-2017 तपासले असता अवास्तव मागणी व पुरवठयामुळे दिनांक 31/03/2017 अखेर चवळी 17559.753 किलोग्रॅम शिल्लक राहिल्यामुळे रक्कम रुपये 17559.753 X 65 = 11,41,384/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम संबंधितांकडून वसुलात आणून पुर्तता दाखवावी

11) उपयोगिता प्रमाणपत्र सन 2016-2017 तपासले असता अवास्तव मागणी व पुरवठयामुळे दिनांक 31/03/2017 अखेर हरभरा 915.708 X 65 = 59,521/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे. सदर रक्कम संबंधितांकडून वसुलात आणुन पुर्तता दाखवावी

**3.84 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये डिजीटल/व्हर्च्युअल क्लासरुम तयार करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रककम रुपये 99,55,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये डिजीटल/व्हर्च्युअल क्लासरुम तयार करणे या नाविन्यपुर्ण योजनेकरीता रुपये 1 कोटी रुपयांची प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त खर्चाबाबतच्या नस्तीची तपासणी केली असता सदरची खरेदी ही ई टेंडरिंग अन्वये केल्याचे दिसून येते. शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचा कॉम्प्युटर वर्ल्ड यांना दिलेला पुरवठा आदेश दिनांक 10/01/2017 च्या अटी व शर्ती मधील क्रमांक 1 नुसार पुरवठा आदेश प्राप्त झालेपासून 8 आठवडेंचे आंत प्रोजेक्टर संबंधित शाळेत पोहोच करुन देणे आवश्यक असतांना 2 आठवडे विलंबाने प्रोजेक्टर पोहोच केल्याचे दिनांक 27 व 29/03/2017 नुसार दिसून येते. दिनांक 10/01/2017 चे पुरवठा आदेशामधील अट क्रमांक 8 नुसार रक्कम रुपये 84,70,800/- या रकमेवर प्रती आठवडा रुपये 0.50 टक्के एवढा दंड आकारुन वसुल करणे आवश्यक होते. तथापि, त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केली नाही.

तरी पुरवठा आदेशातील अटींप्रमाणे विलंब दंडाची रक्कम रुपये 84,708/- पुरवठादाराकडून वसुल करुन शासन निधीत जमा करावी.

**3.85 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील कपात रक्कमांबाबत**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अंनियो-1007/सक्र.1152/प्र.क्र.181/आस्था-1, दिनांक 22/09/2007 अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू केली शासन निर्णय क्रमांक अनियो1007/सक्र.1152/प्र.क्र.181/आस्था-11, दिनांक 21/05/2011 नुसार सदर योजनेची कार्यवाही ठरविण्यात आली आहे. त्याप्रमाणे दिनांक 30/11/2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचारी यांना DCPS ही योजना लागू झाल्यामुळे त्यांचे वेतनातून 10 टक्के (मूळ वेतन + महागाई भत्त्याच्या) एवढी रक्कम कपात करून ती त्यांचे खाती जमा करणेसाठी खाते क्रमांक देणे आवश्यक होते. तथापि, अद्याप 63 कर्मचाऱ्यांना खाते क्रमांक दिलेले नाहीत.

2) 1,363 एवढ्या शिक्षकांना खाते क्रमांक दिले आहेत. तथापि, अद्याप EMPLOYER शेअर त्यांचे खात्यावर जमा केलेला नाही. त्यामुळे कर्मचारी यांचे व्याजाचे नुकसान होत आहे त्यामुळे रक्कम प्रदान करतेवेळी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी EMPLOYER शेअर त्यांचे खात्यावर जमा करणेची कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

### 3.86 दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थीनींना 4 महिन्यांकरीता एस.टी.पास सवलत देणेकरीता प्रदान केलेल्या अनुदानाबाबत

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सांगली यांचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात जिल्हाधिकारी यांनी सन 2015-2016 साठी दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेल्या 9 तालुक्यातील 4,443 विद्यार्थिनीं करिता ठेव पावती व व्याज रक्कम अशी 47,51,272/- रक्कमेची सदर योजना सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय मंजुरीने व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तांत्रिक मंजुरीने राबविली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 21/12/2015 च्या शिक्षण विभागाच्या टिपणीप्रमाणे सांगली जिल्ह्यामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी व टंचाई परिस्थितीचा सामना करण्याचे प्रयत्न म्हणून सन 2004-2005 मध्ये जिल्हा परिषदेकडील सन्माननीय पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी तसेच निरनिराळ्या सेवाभावी संस्थेकडून निधी संकलन करून जमा निधी रक्कम रुपये 28,50,000/- ची ठेव पावती करण्यात आली आहे. सदरच्या निधी संकलनाबाबत प्राधिकार लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे तसा प्रधिकार जिल्हा परिषदेला प्राप्त असल्यास सदर निधी शासन लेख्यात जमा करणे आवश्यक होते का? व ठेव पावती क्रमांक 623864 जानेवारी 2007 मध्ये करण्यात आली आहे. तोपर्यंत सदर रक्कम जिल्हा परिषद निधीत ठेवण्यात आली. या गंभीर अनियमिततेबाबत पडताळणी करता आली नाही.

2) सदर ठेवपावती मोडण्याचा प्राधिकार स्थायी समितीला असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) सदर ठेव पावतीतून योजना राबविणेबाबतचा प्रधिकार लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

4) सदर योजना राबविणे संदर्भात शिक्षण समिती ठराव क्रमांक 348 दिनांक 30/11/2015, सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 762 दिनांक 22/06/2017, तांत्रिक मंजुरी आदेश दिनांक 21/06/2017 तसेच वित्त प्रेषण आदेश दिनांक 04/08/2017 मध्ये कुठेही कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालायातील विद्यार्थिनींना लाभ देण्याबाबत नमूदही नसताना अनुदान वर्ग करणेबाबतच्या दिनांक 27/07/2017 च्या शिक्षण विभागाच्या टिपणीमध्ये सदर योजनेचा उद्देश सन 2015-2016 मध्ये दुष्काळग्रस्त भागातील कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना एस टी पास सवलत देणे हा आहे, असे नमूद आहे. त्यामुळे या योजनेचे नेमके लाभार्थी कोण? याची खात्री होत नाही.

5) तांत्रिक मंजुरी आदेशातील अटीनुसार ज्यांनी इतर शासकीय योजेनेतून लाभ घेतला आहे त्यांना दुबार लाभ देय नाही. मात्र गट शिक्षण अधिकारी खानापूर यांचे जावक क्रमांक खापस/शिक्षण/आस्था3/वशी/901/16, दिनांक 19/08/2016 च्या पत्रामधील ‘ या गटाकडून 405 विद्यार्थी संख्येची यादी शिक्षण विभागाकडे सादर करण्यात आली आहे. परंतु, वित्त प्रेषणमध्ये 186 विद्यार्थिनींसाठी अनुदान वितरीत केले आहे. परंतु, सदर योजना कामी विद्यार्थिनींना शासनाकडील अहिल्याबाई होळकर योजना एस टी पास सुविधा सुरु असल्याने त्यांना एस टी पास सवलत अनुदान देता येत नाही.’ या विधानातून नेमका बोध होत नाही. हे खरे असल्यास खानापूर गटाने सादर केलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रानुसार कोणत्या 186 विद्यार्थिनींना लाभ दिला, याची आवश्यक अभिलेख्यांसह लेखापरीक्षणास अनुपालन सादर होणे आवश्यक आहे. याबाबत पंचायत समिती, खानापूर चे सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात परिच्छेद क्रमांक 22 नमूद करण्यात आला आहे.

6) सदरची योजना डिसेंबर 2015- मार्च 2016 या चार महिन्यांकरिता राबविण्यात आली व लाभ सन 2016-2017 मध्ये देण्यात आला. लाभार्थ्यांचे या चार महिन्यांचे एस टी महामंडळाकडून देण्यात आलेले पास घेऊन अथवा लाभार्थी विद्यार्थिनींबाबत एस टी महामंडळाचा दाखला घेउन योजना राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

7) रक्कम लाभार्थी खात्यात वर्ग झाल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर झालेले नाहीत.

8) तालुका स्तरावरील अखर्चित रक्कम कडेगाव रूपये 4,19,832/- जत रूपये 3,79,392/- वाळवा रूपये 11,600/- मिरज रूपये 9,044/- जिल्हा स्तरावर परत करण्यात आली नाही. दुष्काळी तालुक्यात मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहिल्याने योजनेचा हेतु सफल झाला नाही.

योजनेचे नेमके लाभार्थी कोण? यासह वरील आठ मुद्द्यांची आवश्यक अभिलेख्यांसह पूर्तता सादर करावी अन्यथा रक्कम वसूल करण्यात यावी.

**3.87 शालेय पोषण आहार योजनेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** शालेय पोषण आहार योजनेवर रककम रूपये 36,08,95,078/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार योजनेवर धान्यादि माल व इंधन भाजीपाला या बाबीवर केंद्र व राज्य मिळुन एकूण खर्च 36,08,95,078/- इतका खर्च झालेला असून केंद्र शासन 60 टक्के खर्च म्हणजेच रुपये 21,65,37,047/- होणे आवश्यक असताना खर्च अहवालानुसार रक्कम रुपये 21,66,68,711/- एवढा म्हणजे रक्कम रुपये 1,31,664/- इतका जादा झालेला आहे. तसेच राज्य शासन खर्च 40 टक्के म्हणजेच रक्कम रुपये 14,43,58,031/- इतका होणे आवश्यक असताना खर्च अहवालानुसार रक्कम रुपये 14,42,26,367/- इतका म्हणजेच रक्कम रुपये 1,31,664/- इतका कमी खर्च झाला आहे. याबाबत स्पष्टीकरण आवश्यक

2) सन 2016-2017 मध्ये धान्यादि माल 1 ते 5 केंद्र व राज्य तसेच 6 ते 8 केंद्र व राज्य एकत्रित अनुदान रक्कम रुपये 16,76,97,000/- प्राप्त होते. सन 2015-2016 मधील अखर्चित अनुदान रक्कम रुपये 5,81,91,000/- असे एकूण अनुदान रुपये 22,58,88,000/- सन 2016-2017 करिता उपलब्ध असताना खर्च रक्कम रुपये 24,80,48,633/- इतका केला आहे. जादा खर्च रुपये 2,21,60,633/- करिता शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

3) विद्यामंदिर कसबा तारळे तालुका राधानगरी यांना माहे जुन/जुलै 2015 मध्ये प्राप्त तुरडाळीचे नमुने घेवून जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोल्हापूर यांचेकडील तुरडाळ तपासणी अहवाल दिनांक 29/08/2015 अन्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे दिनांक 02/09/2015 चे पत्रान्वये संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सदर तुरडाळ तपासणीचा अहवाल सादर केला होता. दिनांक 08/03/2016 च्या पत्रान्वये संचालक (प्राथमिक), पुणे यांना सदर तुरडाळीचे नमुने खाणेस अयोग्य असलेबाबत व जुन/जुलै 2015 ची तुरडाळीचे बील रक्कम रुपये 57,16,002/- राखून ठेवली होती. त्यास संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक 02/07/2016 च्या पत्रान्वये रक्कम रुपये 10,000/- दंड आकारुन उर्वरित रककम आदा करणेविषयी सुचित केले होते. त्यास अनुसरुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी प्रमाणकान्वये राखुन ठेवलेल्या तुरडाळीची रक्कम अदा केली आहे.

परंतु, सदर देयकातून रक्कम रुपये 10,000/- वसुल केलेली नाही. ती रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

4) संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/कोल्हापूर /307/16-17/ 3240-3, दिनांक 17/06/2016 नुसार तांदुळ उचल करताना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व FCI चे प्रतीनिधी यांनी गोदामातून तांदुळ उचलण्यापुर्वी तांदुळाच्या प्रतीची संयुक्त तपासणी करणे व चांगल्या प्रतीचा तांदुळ निवडणे निश्चित केले असताना तशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

5) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पुरवठादार, FCI, जिल्हाप्रतीनिधी, गट शिक्षणाधिकारी/अधिक्षक (शापोआ) यांची बैठक घेवून पुरवठा नियमित होण्याच्या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करणे आवश्यक असताना तशी बैठक घेतल्याची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

6) जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोल्हापूर यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक 29/08/2015 पाहता जुन/जुलै 2015 मध्ये प्राप्त धान्यादि मालाचे नमुने तपासणी करता उशिराने पाठविण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच सदरच्या तपासणी अहवालावरुन खाण्यास अयोग्य असलेली तुरडाळ नष्ट केली किंवा कसे?

7) सन 2016-2017 मध्ये दि महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन यांना धान्यादि माल पुरवण्यापोटी जिल्हा परिषद स्तरावरुन रक्कम रुपये 22,58,88,000/- अदा करण्यात आलेले आहेत. आयकर अधिनियम 1961 नुसार सदर रकमेवरील 2 टक्के आयकर रुपये 45,17,760/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.88 ग्रामीण भागातील तरुण मंडळांना क्रिडा, व्यायाम साहित्य पुरविणे योजना राबविलेबाबत व त्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** ग्रामीण भागातील तरुण मंडळांना क्रिडा, व्यायाम साहित्य पुरविणे योजनेवर रककम रूपये 32,75,244/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 मधील कलम 100(1)अ पोटकलम (2) अन्वये वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या विषयांपैकी सर्व किंवा कोणत्याही विषयांच्या संबंधात जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करण्यात आलेल्या जिल्हा निधीतून जेथवर तरतूद करता येणे शक्य असेल, तेथवर जिल्ह्यामध्ये वाजवी तरतूद करणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल. परंतु, 'ग्रामीण भागातील तरुण मंडळांना क्रिडा साहित्य पुरविणे' ही योजना पहिल्या अनुसूचीमध्ये 'शिक्षण' संबंधी विषय क्रमांक 24 ते 29 पैकी कोणत्याही विषयाशी संबंधित नाही. तरी सदर योजनेसाठी केलेली तरतूद ही नियमबाह्य आहे.

2) अंदाजपत्रकामध्ये ग्रामीण भागातील तरुण मंडळांना क्रिडा साहित्य पुरविणे या लेखाशिर्षाखाली सदर योजनेची तरतुद केली आहे. तसेच त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यताही घेतली आहे. परंतू, प्रत्यक्षात स्पिकर संच खरेदी केले आहेत. सदर बाब नियमबाह्य आहे.

3) योजनेच्या तांत्रिक मान्यता आदेशामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 मधील कलम 99(अ) नुसार तांत्रिक मान्यता दिल्याचे म्हटले आहे. सदर कलम अ नुसार 'आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभाग प्रमुखास तांत्रिक मंजुरी देता येईल, असे नमूद आहे. मात्र उपरोक्त योजना ही, शिक्षण विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या संबंधित नाही. असे असताना सदर योजनेच्या खरेदीस दिलेली तांत्रिक मान्यता नियमबाह्य आहे.

4) निविदा प्रक्रिया पाहता 3 निविदा पात्र ठरविण्यात आल्या आहेत. यापैकी कमी दराची भालचंद्र स्टोअर्स यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. भालचंद्र स्टोअर्स यांचे लिफाफा क्रमांक1 म्हणजेच तांत्रिक लिफाफा मधील कागदपत्रे पाहता भालचंद्र स्टोअर्स ह्यांच्या कागदपत्रांमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी दिसून येतात.

I) संस्था नोंदणीकृत असलेबाबतचा दाखला पाहता भालचंद्र स्टोअर्स यांचे धंद्याचे स्वरूप बुकसेलर्स, स्टेशनरी, पेपरमर्चंट व शालोपयोगी साहित्य विक्री' असे आहे. परंतु, उपरोक्त योजना ही इलेक्ट्रोनिक वस्तूंशी संबंधित असलेने भालचंद्र स्टोअर्स यांनी या योजनेची निविदा भरणेस पात्र ठरत नाहीत. तरीही त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आली आहे.

II) भालचंद्र स्टोअर्स यांनी केलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 5 नुसार मंडळांना साहित्य देण्यापूर्वी साहित्याचे गुणवत्ता तपासणीचा शासकीय संस्थेचा दाखला सादर करू, असे मान्य केले आहे. परंतु, प्रत्यक्षात गुणवत्ता तपासणी अहवाल हा दिनांक 08/01/2017 चा आहे. सदर खरेदीचे बिल हे दिनांक 08/01/2017 चे आहे. आहे. याचा अर्थ तपासणी अहवाल नसताना देखील साहित्य \ खरेदी करण्यात आले आहे. हे नियमबाह्य आहे. तथापि, एकंदरीत निविदा प्रक्रिया आक्षेपार्ह दिसून येते.

5) 126 स्पिकर संचांचे बिल पुरवठादारास अदा करण्यात आले आहे. परंतु, पुरवठादाराने मंडळांच्या ठिकाणी स्पिकर सेट पुरवठा केलेबाबतचे एकही पुरवठा चलन दिलेले नाही त्यामुळे प्रत्यक्षात पुरवठा झाला किंवा कसे, याबाबत साशंकता निर्माण होते.

6) खालील मंडळांचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना देखील त्यांना स्पिकरसंच पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे नियमबाह्यता झाली आहे.

अ) सुभाष तरूण मंडळ केनवडे

ब) दिग्विजय कला, क्रिडा व सांस्कृतिक मंडळ मळगे बु.

क) ओंकार कला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ करंजफ़ेण

7) महादेव भोसले पाटील युवा फ़ौंडेशन मल्लेवाडी तालुका राधानगरी यांचा प्रस्ताव तपासणी केली असता त्यांचा साहित्य मागणी अर्ज हा व्यायामशाळा साहित्य मिळणेबाबतचा असताना त्यांना कोणत्या आधारे स्पिकरसंच देणेत आले आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) हनुमान तरूण मंडळ फ़ेजीवडे यांचा प्रस्ताव तपासणी केली असता त्यांचा साहित्य मागणी अर्ज हा जेवणाची मोठी भांडी मिळणेबाबतचा असताना त्यांना स्पिकरसंच का देणेत आले? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

9) सदर योजना ग्रामीण भागातील तरुण मंडळांसाठी असताना विकास संस्था, कॉम्प्युटर संस्था, स्पोर्ट्स अकेडमी, चॅरीटेबल ट्रस्ट अशा 13 संस्थांना नियमबाह्यपणे साहित्य वाटप करण्यात आले आहे.

10) मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे एकाच मंडळास दुबार लाभ दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

11) विनियोग दाखले/ उपयोगीता प्रमाणपत्र तपासले असता त्याच्यावर साहित्य कधी प्राप्त झाले? साहित्य ताब्यात घेणा-याची स्वाक्षरी, साठा नोंदवही पान क्रमांक नमूद नाही. तसेच 1) पद्मभुषण जे.पी. नाईक कला, क्रिडा, सांस्कृतिक विचार मंच, बहिरेवाडी 2) संघर्ष कला, क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, हेब्बाळ क. नूल ता. गडहिंग्लज 3)शिवतेज तरूण मंडळ, रेव्याची वाडी, वेसरफ़ ता. गगन बावडा यांचे विनियोग दाखले/ उपयोगीता प्रमाणपत्रे ही सन 2015-2016 मधील आहेत. तसेच त्याच्यावर सदर स्पिकरसंचाही किंमत ही रूपये 24,950/- अशी आहे. जी सन 2015-2016 साठी ठरवलेली होती. म्हणजेच सदर तीन मंडळांना सन 2016-2017 मध्ये दुबार लाभ दिल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर रक्कम रूपये 77,982/- संबंधितांकडून वसूल होणे आवश्यक आहे.

12) सदर बिलातून रक्कम रूपये 65,505/- TDS कपात केला आहे. सदर रक्कम शासन खाती भरणा केल्याची पोच लेखापरिक्षणास सादर होणे आवश्यक आहे.

**3.89 जिल्हा परिषद उपकर योजना इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विदयार्थ्यांचे परीक्षा फी भरणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 मध्ये जिल्हा परिषद उपकर योजना इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विदयार्थ्यांचे परीक्षा फी भरणेवर जिल्हा परिषद उपकरांतून एकूण रक्कम रूपये 11,85,210/- इतका खर्च केलेला आहे. इयत्ता 5 वी व इयत्ता 8 वी शिकणा-या विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षा फी व प्रवेश शुल्क जिल्हा परिषद उपकर मधून भरणेची योजना राबविलेली आहे. प्रमाणक क्रमांक 622 दिनांक 31/03/2017 अन्वये रूपये 11,85,210/- चा भरणा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे यांचेकडे भरणा केले आहे. सदर परीक्षा दिनांक 26/02/2017 रोजी घेण्यात आली असून परीक्षेकरिता आवेदनपत्र भरण्याकरिता दिनांक 01/12/2016 ते 31/12/2016 पर्यंत मुदत होती.

1) इयत्ता 5 वी त शिकणा-या एकूण 11,971 विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती प्रवेश शुल्क व परीक्षा फी चा भरणा केलेला आहे. यांत अ) 8,450 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रूपये 4,59,040/- भरणा केले आहे.

ब) 120 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रुपये 7,260/- + रुपये 6,000/- विलंब शुल्क भरलेले आहे.

क) 3,401 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रुपये 27,080/-, रुपये 1,70,050/- विलंब शुल्क व रुपये 1,65,360/- इतके अतिविलंब शुल्क भरलेले आहे.

शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरणेकरिता पुरेसा कालावधी (01/12/2016 ते 31/12/2016) असतांना वरीलप्रमाणे ब व क मध्ये नमुद केलेल्या विदयार्थ्यांचे आवेदनपत्र मुदतीत भरलेले नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे एकूण 3,41,410/- (6,000+1,65,360+1,70,050) विलंब शुल्क भरणा करावा लागलेला आहे. सदरचा विलंब शुल्क लेखापरिक्षणांत मान्य करता येत नाहीत. तरी आता विलंब आकाराची रक्कम रुपये 3,41,410/- संबंधित जबाबदार व्यक्तिकडून वसुल करुन जिल्हा परिषद उपकरांत भरणा करुन अनुपालन करावे.

2) इयत्ता 8 वी त शिकणा-या एकूण 1,237 विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती प्रवेश शुल्क व परीक्षा फी चा भरणा केलेला आहे. यांत अ) 887 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रूपये 45,520/- भरणा केले आहे

ब) 10 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रुपये 680 + रुपये 500 विलंब शुल्क भरलेले आहे.

क) 340 विदयार्थ्यांचे नियमित शुल्क रुपये 27,200/-, रुपये 17,000/- विलंब शुल्क व रुपये 14,520/- इतके अतिविलंब शुल्क भरलेले आहे.

शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरणेकरिता पुरेसा कालावधी (01/12/2016 ते 31/12/) असतांना वरीलप्रमाणे ब व क मध्ये नमुद केलेल्या विदयार्थ्यांचे आवेदनपत्र मुदतीत भरलेले नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे एकूण रूपये 32,020/- (500+17,000+14,520) विलंब शुल्क भरणा करावा लागलेला आहे. सदरचा विलंब शुल्क लेखापरिक्षणांत मान्य करता येत नाहीत. तरी आाता विलंब आकाराची रक्कम रुपये 32,020/- संबंधित जबाबदार व्यक्तिकडून वसुल करुन जिल्हा परिषद उपकरांत भरणा करुन अनुपालन करावे.

**3.90 शालेय पोषण आहाराबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** शालेय पोषण आहार योजना राष्ट्रीय मध्यान्ह भोजन कार्यक्रम अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या शाळांमध्ये इयत्ता 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण देण्याकरीता अनुक्रमे केंद्र हिस्सा अन्न शिजवून देणेचे मानधन सन 2016-17 मध्ये अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 अखेर अखर्चित रक्कम रूपये 17,68,03,839/- पैकी रुपये 2,68,61,659/- भरणा केले असून रूपये 14,99,42,180/- अदयाप शिक्षण विभागाकडे शिल्लक आहे. संपूर्ण रकमेचा भरणा कां केला नाही? याचा समर्पक खुलासा करावा.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शा.पो.आ. 2004/246/04/प्रा.शि. दिनांक 31/03/2005 अन्वये राज्य शासन व केंद्र शासन अन्न शिजवण्यासाठी पटसंख्येप्रमाणे अनुदान शाळांना दिले जाते. वरील शासन निर्णयाप्रमाणे योजनेचे उद्दीष्ट सफल होणेसाठी त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागांकडील शालेय पोषण आहार नस्तीप्रमाणे इयत्ता 1 ली ते 5 वी च्या लाभार्थी पटसंख्या 2,76,088 आहे. सदर पटसंख्येस वर्षाचे सरासरी 222 दिवस शालेय पोषण आहार मिळणे क्रम:प्राप्त होते. म्हणजेच वर्षाचे लाभार्थी उद्दीष्ट 6,12,91,536 आहेत. प्रत्यक्षात लाभ घेतलेले लाभार्थी 5,42,61,220 (या वर्गासाठी पुरवठा केलेले तांदूळ 5,426.122 मे.टन आहे. प्रती लाभार्थी 100 ग्रॅम ) आहेत. म्हणजेच 70,30,316 लाभार्थी शालेय पोषण आहारापासून वंचीत राहीले आहेत.

3) तसेच इयत्ता 6 वी ते 8 वी ची लाभार्थी पटसंख्या 1,68,882 आहे. सदर पटसंख्येस वर्षाचे 222 सरासरी आहार मिळणे आवश्यक होते. म्हणजेच वर्षाचे लाभार्थी उद्दीष्ट 3,74,91,804 होते. त्याप्रमाणे लाभ दिला नाही. प्रत्यक्षात लाभ घेतलेले लाभार्थी 3,26,23,077 (या वर्गासाठी पुरवठा केलेले तांदूळ 4,893.462 मे.टन आहे. प्रती लाभार्थी 150 ग्रॅम ) आहेत. म्हणजेच 48,68,727 लाभार्थी शालेय पोषण आहारापासून वंचीत राहीले. सदर शाळांना पुरवठादाराकडून वेळेत, मुदतीत मागणी करुनदेखील पुरवठा वेळेत न झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर योजनेचा उद्देश हेतू सफल झाला, असे म्हणता येत नाही.

4) प्राथमिक शिक्षण संचालक यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधावो/प्रशि/303/2011-12/2177(3), दिनांक 01/11/2011 नुसार पुरवठादाराकडून धान्यादी मालाच्या देयकाची 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर अदा करावी व जिल्हयांतील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात तक्रारी असल्यास

उर्वरीत 10 टकके रक्कम शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या मान्यतेने अदा करावी, असे असतांना मालाच्या पुरवठयाची 100 टक्के अदाई एकाच वेळी केली आहे. या अनियमिततेबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र./प्रा.शि-4, दिनांक 26/02/2010 अन्वये ग्रामशिक्षण समितीने स्थानिक पातळीवर अन्न व आहाराचा दर्जा वेळोवेळी तपासणी करुन अहवाल दिलेला नाही.

6) धान्यादी माल प्राप्त झालेबाबत संबधित मुख्याध्यापकाची पोहोच आहे. तथापि, पावतीवर करारातील अटी व शर्तीप्रमाणे वेळ नमुद नाही. तसेच ब-याच पावत्यांवर शाळेच्या माल साठा नोंदवहीचा पृष्ठक्रमांक नमुद नाहीत.

**3.91 सायंस्कोर मैदान नियम बाहय भाडयाने देणे बाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, हायस्कूलचे एस.टी.डेपोला लागुन असलेले सायस्कोर मैदान नियमितरीत्या भाडयाने देवुन उत्पन्न वाढीसंबधी लेखे तपासले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम 1999 चे कलम 11(4)(ब) अन्वये वास्तुशास्त्रज्ञाच्या प्रमाणपत्रात विनिर्दीष्ट केल्यानुसार त्यानी कायदयाप्रमाणे निश्चित केल्यावरुन त्याचे आधारे वसुली योग्य असेल, असे भाडे प्रमाणपत्र प्रथमत: प्राप्त करुन त्या प्रमाणपत्राच्या आधारे भाडयाच्या रक्कमा निश्चित करुन वसुल कराव्या, असे अपेक्षित असतांना जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 25/06/2012 रोजी ठराव क्रमांक 25 नुसार जिल्हा परिषद अध्यक्ष यांना भाडे निश्चित करण्याबाबत अधिकार देणे ही, बाब नियमाशी सुसंगत नाही. त्यामुळे नियमाला अनुसरुन भाडयाच्या रक्कमा नियमानुसार वसुल झाल्या नसुन जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात वाढ न होता नुकसान झाल्याचे दिसुन येत आहे.

2) जिल्हा परिषद, अमरावती यांचे सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 19 दिनांक 20/11/2011 ला झालेल्या सभेत जिल्हा परिषद माध्यमिक मुलांची शाळा सायंस्कोर मैदानाचे भाडे सर्कस, व्यावसायीक स्तरावरील प्रदर्शनी व इतर कार्यासाठी 6,000 चौ.मी जगेचे भाडे प्रतीदीन रुपये 6,000/- आकारण्यात यावे. तसेच सायकल स्टॅन्डकरीता प्रती दिन रुपये 1,000/- रुपये भाडे आकारण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला असुन तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश असतांना भाडे कमी दराने आकारले असुन सायकल स्टॅन्डचे भाडे आकारण्यात आले नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेशात सायकल स्टॅन्डचे वरीलप्रमाणे रक्कमेचा संबधित मुख्यध्यापक, जिल्हा परिषद (माध्यमिक शाळा) मुलांची सायस्कोर, शाळा अमरावती यांना स्पष्ट आदेश असतांना त्यांनी फक्त जागेचे भाडे वसुल करुन रक्कमेचा चलानद्वारे भरणा केला आहे. संबधित मुख्यध्यापकांनी जागेचे भाडे वसुल केले असुन सायकल स्टॅन्डचे भाडे वसुल का केले नाही? तसेच वसुल केले असेल, परंतु जिल्हा निधीत भरणा केल्याचे दर्शविले नाही. तरी सायकल स्टॅन्डचे भाडे वसुल का केले नाही, याबाबत खुलासा करावा अन्यथा संबधित मुख्यध्यापक यांचेकडुन सदर रक्कम वसुलपात्र ठरते.

3) मैदान उपलब्ध करुन दिल्यानंतर सदरचे मैदान वापरानंतर संपुर्णपणे स्वच्छ करुन घेण्याची जबाबदारी शाळा मुख्यध्यापकाची राहील, असे आदेशात नमुद असतांना मैदान भाडे आदेशात तसे नमुद केले नाही. त्यामुळे मैदान स्वच्छ करुन घेतल्याचे दस्तऐवज लेखापरिक्षणात तपासणीस उपलब्ध झाले नाही. याबाबत खुलासा करावा.

4) जिल्हा परिषद, हायस्कुल एसटी डेपोला लागुन असलेले सायन्स्कोर मैदान नियमितरित्या भाडयाने दिले. परंतु, आदेशाला अनुसरुन मैदान संबधितानी ताब्यात कधी घेतले आणि कार्यक्रमाची व्यवस्था करण्याकरीता मैदानावर कोणत्या तारखेपासुन सामानाची जुळवाजुळव केली व कार्यक्रम संपल्यानंतर मैदान कधी खाली केले, मैदान खाली करतेवेळी स्वच्छता करुन दिले काय, मालमत्तेचे काही नुकसान झाले काय, मैदान ताब्यात घेतल्यापासुन मैदान खाली केल्याच्या तारखेपर्यंत भाडे आकारले नसल्यास जादा भाडे किती आकारावयाचे आहे, याकरीता अधिकारी

स्तरावर मैदान भाडयाने दिलेल्या दिनांकासंबधीत समितीने नियमित आढावा घेवुन त्याचे इत्तिवृत्त ठेवल्यास वरील सर्व बाबींमध्ये त्रुटी न राहता व्यवहार पारदर्शक होवु शकतील

5) मैदान भाडयाने देणेबाबत जिल्हा परिषद, शिक्षण विभाग किंवा मुख्यध्यापक यांचे स्तरावर मालमत्ता भाडयाने दिल्याबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवली नाही. मासिक गोषवारे काढुन वार्षिक गोषवारे सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षरीनिशी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

6) वसुल केलेल्या भाडयाच्या रक्कमा वेळीच चलॉनद्वारे भरणा केल्याचे दिसुन आले नाही. तसेच भाडयाच्या रक्कमा वसुल करण्याकरीता नमूना नंबर 10 चे पावती पुस्तकाची मागणी कधी केली, किती पुस्तके प्राप्त झाली, वापर कधी पासुन करण्यात आला, याबाबत नमूना नंबर 01 मध्ये साठा नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

7) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मैदान भाडयाने देण्याचे आदेशानुसार रुपये 5,000/- अनामत रक्कम आणि रुपये 500/- सफाई करीता वसुल केलेल्या रक्कमेचा नमुना 10 च्या पावत्या मुख्यध्यापकाने दिल्या नाहीत. त्यामुळे त्या रक्कमा वसुली व परत फेडीबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस सादर केली नाही.

**3.92 ई वर्ग जमिन ऱ्हासाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 13) -** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत येणा-या 14 पंचायत समिती अंतर्गत असलेल्या ई वर्ग जमिनी हर्रास केल्याबाबत रक्कम रूपये 37,45,287/- गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी 14 पंचायत समिती सतरावर असलेल्या ई वर्ग जमिनीचा हर्रास सन 2016-2017 चा करण्याकरीता गट विकास अधिकारी यांना आदेशीत केले नसतांना वरील प्रमाणे ई वर्ग जमिनीचा हर्रास कशाचे आधारे करण्यात आला, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) वरीलप्रमाणे 2,641.44 हेक्टर ऐवढी जमिन असुन यापैकी 1,117 हेक्टर ऐवढ्या जमिनीचे हर्रास करण्यात आले आहे. उर्वरीत जमिन हर्रास का करण्यात आली नाही? हर्रास न केल्याचे तेवढयाच रक्कमेचे जिल्हा परिषदेचे नुकसान झाल्याचे दिसुन येते. तरी याबाबत खुलासा करावा.

3) जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत 1,602 शाळा आहेत. त्या प्रत्येक शाळा व्यवस्थापन समिती, मुख्यध्यापक, सचिव, ग्रामपंचायत व सरपंच यांना पत्र पाठवुन तलाठयाकडुन गावनिहाय महसुली पुरावे गोळा केल्यास व ज्या गावात ई वर्ग जमिन नाही, तेथील तलाठयाकडुन ई वर्ग जमिन नसल्याचे लेखी घेतल्यास जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनीची संख्या निश्चित होवुन नोंदवहया अद्यावत करता येतील. त्याला अनुसरुन कार्यवाही करणे गरजचे आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपज-2013/प्र.क्र.31/पंरा-9, दिनांक 25/03/2013 नुसार मालमत्ता जिल्हा परिषदेचे नावाने करण्याकरीता सक्षम प्राधिकरणाने कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे हर्रास न झालेल्या 92 जमिनीचे क्षेत्रफळ 1,117 हेक्टर जमिनीबाबत जिल्हा परिषद, अमरावतीचे दप्तरी एकही महसुली पुरावा आढळत नाही. त्यामुळे वरील जमिनीची हर्रासाबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे दिसुन येते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, दिनांक 04/12/2010 अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या ताब्यातील जमिनीचे अतिक्रमणापासुन रक्षण करण्याबाबत सक्षम प्राधिकारी अपयशी ठरत असल्याचे दिसुन येते. तसेच वरील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेची मालमत्ता जिल्हा परिषदेचे नावाने करणेकरीता कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे सक्षम प्राधिकरण मालमत्तेच्या रक्षणाबाबत कोणतेच प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाही.

6) वरील शासन निर्णयातील सुचना क्रमांक 5 नुसार जिल्हा परिषदेने सर्व जमिनींना कुंपण घालुन त्यावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्याकरीता मालमत्ता अधिकारी (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत) यांना कळविणे संबधी शिक्षण विभागाने पत्र व्यवहार केल्याचे आढळत नाही.

**3.93 शालेय पोषण आहार योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 14) -** तांदुळ व धान्याची मालाची शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिक्षण विभागाने रक्कम रूपये 21,53,38,251/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अमरावती विभागाकरीता धान्यादी मालाची वाहतुक व पुरवठा करण्याकरीता जाहीर ई - निविदेद्वारे गंगाबकास बन्सीधर, अमरावती यांचेसोबत शासनाचे वतीने शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सोबत दिनांक 13/06/2016 रोजी केलेल्या करारानुसार सन 2016-2017 या वित्तीय वर्षात पुरवठादाराने अमरावती जिल्हा परिषदेला निवडक महिण्यात रुपये 21,53,38,251/- च्या धान्यादी मालाचा पुरवठा केला आहे. करारातील अट क्रमांक 28 नुसार करारात नमुद केलेले दर हे सर्व करासहीत असुन शासनाचे नियमाप्रमाणे उदगम कर कपात करण्यात येतील. असे असतांना पुरवठा रकमेच्या 2 टक्के आयकर व येणा-या आयकरावर 3 टक्के शिक्षण उपकर एवढी रक्कमाची कपात आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार देयकातुन करावयाची होती. नियमाला अनुसरुन कार्यवाही शिक्षण विभागाने केली नाही. पर्ययाने शासनाचे नुकसान झाले आहे.

2) करारनामा अट क्रमांक 7 अन्वये पुरवठा धारक शाळेने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा शाळेपर्यत करील. तसेच मालाचा पुरवठा प्रत्येक शाळेमध्ये मागणी पत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करील. असे असतांना शाळेने मागणी केलीच नाही. शाळेची मागणी नसतांना तालुका स्तरावरील शालेय पोषण आहार अधिक्षकाने पुरवठादाराला पुरवठा आदेश कशाचे आधारे देण्यात आला? गट शिक्षण अधिकारी / शालेय पोषण आहार अधिक्षक यांचेकडुन पिवळया रंगाची पावतीची तपासणी केली असता त्या पावतीवर निवडक शाळेने माल घेण्यास नकार दिला आहे. कारण सर्व धान्यादी माल 2 महिने पुरेल एवढा साठा शाळेत शिल्लक असतांना शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी पुरवठा आदेश कशाचे आधारे दिला याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) प्रमाणक क्रमांक 1760 दिनांक 18/10/2016 अन्वये मदतनीसच्या मानधनावर रुपये 1,28,84,000/- खर्च करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक 02/02/2011 मध्ये किती पटसंख्येवर मदतनीसचे किती मानधन असावे, याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्या आधारे सदर प्रमाणकाची तपासणी केली असता पटसंख्येनुरुप ज्यादा मदतनीसचे मानधन दिले असल्याचे दिसुन येते.

तरी शाळांच्या पटसंखेची तपासणी करुन पटसंखेनुसार ज्यादा मानधन प्रदान होत नसल्याची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी. ज्यादा मानधन प्रदान होत असल्यास त्याबाबत वसुली करुन पटसंख्यानुसार मानधनाच्या प्रदानात सुधारणा करण्यात यावी.

4) करारनाम्यातील अट क्रमांक 12 अन्वये तांदुळ व धान्याची मालाचा पुरवठा सुरळीत होईल यांचे सनियंत्रण व समन्वयन तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार हे करतील व शाळेकडील तांदुळ व धान्यादी मालाच्या साठयाचा वेळोवेळी आढावा घेवुन शाळेला आवश्यकतेनुसार तांदुळ व धान्यादी माल उपलब्ध करुन देण्याचा प्राधान्यक्रम ठरवतील. असे असतांना शालेय पोषण आहार अधिक्षक यांचे स्तरावरील पिवळया पावत्याची निवडक महिन्याची तपासणी केली असता ब-याच पावत्यावर साहित्य शाळेने घेतले नसुन परत केले आहे आणि जे साहित्य पाहीजे, त्याचा पुरवठा केला नाही. यावरुन शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी शाळानिहाय कोणताच आढावा न घेता मोघम स्वरुपात शाळेने दिलेल्या खर्चाच्या अहवालावरुन पुरवठा आदेश दिल्याचे दिसुन येते. याबाबत खुलासा करावा.

5) करारनामा अट क्रमांक 10 अन्वये भारतीय अन्न महामंडळाच्या गोडाऊनमधून तांदुळाची उचल करतांना भारतीय अन्न महामंडळाचे अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे प्रतिनिधी व पुरवठादाराचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे घेतलेले तांदळाचे नमुन्यांबाबत अहवाल केव्हा व कोणत्या तारखेला घेण्यात आले, याबाबत लेखापरिक्षणात पडताळणीस उपलब्ध करण्यात आले नाही.

6) करारनामा अट क्रमांक 16, 17 व 18 अन्वये तांदुळ आणि धान्यादी मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यापासून 5 दिवसामध्ये पुरवठा सुरु करावा लागेल व जास्तीत जास्त 20 दिवसामध्ये संपुर्ण पुरवठा करणे पुरवठादाराला बंधनकारक आहे. असे असतांना पिवळया पावतीवर मुख्यध्यापक यांनी शिक्यानिशी स्वाक्षरी केली आहे

आणि तारीख दुसऱ्या शाईने एकाच तालुक्यातील सर्व पावत्यावर एकाच अक्षरात टाकण्यात आली आहे. एकंदरीत सर्व पावत्यावर एकाच शाईने एकाच अक्षरात तारीख कशी? मुख्यध्यापकानी तारीख न टाकता पुरवठादाराने आपले सोईने त्या पावत्यांवर तारीख टाकल्याचे दिसुन येते. तरी याबाबत खुलासा करावा.

7) करारातील अट क्रमांक 25 अन्वये धान्यादी मालाच्या देयकाची 90 टक्के रक्कम प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्यानंतर अदा करतील व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात काही तक्रार असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम शिक्षण संचालक यांचे मान्यतेने अदा करावयाची आहे. परंतु, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने एकाच वेळी 100 टक्के देयकाच्या रक्कम अदा केल्याने कंत्राटदाराचे हीत जोपासल्याचे दिसुन येते. याबाबत खुलासा करावा.

8) करारनाम्यातील अट क्रमांक 36 अन्वये निविदा प्रक्रियेमध्ये सादर करण्यात आलेल्या धान्यादी मालाचे नमुने ज्या दर्जाचे होते, त्याच दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. उदा. मीठ आयोडीनयुक्त, मसाला, जिरे व मोहरी इत्यादी मालाचे जे नमुने सादर करण्यात आले होते, त्याच दर्जाचा मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच तेल, हळद, मिरची पावडर इत्यादी ॲगमार्क दर्जाचा मालाचा पुरवठा करणे बंधनकारक असतांना त्याला अनुसरुन पुरवठा धारक पुरवठा पावतीवर कोणताही तपशिल नमुद न करता पुरवठा करीत असुन शिक्षण विभाग सदर वस्तुचा पुरवठा करारातील अटीला अनुसरुन असल्याची खात्री न करता देयकाच्या रक्कमा अदा करत असल्याने शिक्षण विभाग पुरवठा धारकाचे हीत जोपासत असल्याचे दिसुन येते खुलासा करावा.

9) करारनाम्यातील अट क्रमांक 23 नुसार पुरवठादाराने पुरवठा केलेल्या तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठयाचा अहवाल दरमहा 5 तारखेपर्यत गटशिक्षणाधिकारी / शालेय पोषण आहार अधिक्षक यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील. तसेच पुरवठा आदेशानुसार शाळांना किती पुरवठा केला, याबाबत शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी पुरवठादाराचा अहवाल आणि शाळेला केलेला पुरवठा याबाबतची तपासणी करुनच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

10) करारनाम्यातील अट क्रमांक 25 अन्वये पुरवठादाराने धान्यादी मालाचा पुरवठा शाळेवर केल्यानंतर तालुका स्तरावर शालेय पोषण आहार अधिक्षक यांनी शाळा स्तरावरील गुलाबी पावती व पुरवठाधारकाने सादर केलेली पिवळी पावती व देयक हे योग्य असल्याबाबतची खात्री करुनच देयक मंजुरीकरीता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे सादर करतेवेळी गट शिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी तपासणी करणे गरजेचे आहे. त्याला अनुसरुन तपासणी जिल्हा अथवा तालुका स्तरावर केल्याबददल तपासणी संबधीचा लाल शाईच्या खुणा निवडक महिन्यातील एकाही देयकावर आढळल्या नाहीत. त्यामुळे पुरवठा धारकाने पारीत केलेले देयकातील पुरवठा व शाळेवर केलेल्या गुलाबी पावतीवरील पुरवठा यामध्ये तफावत असल्याचे दिसुन येते. उदा. नांदगांव खंडेश्वर येथील जिल्हा परिषद शाळा निंभोरा बोडखे या शाळेत ऑगस्ट व सप्टेंबर 2016 मध्ये धान्यादी मालाचा पुरवठा वर्ग 1 ते 5 मध्ये वाटाणा 75 किलो पैकी 25 किलो वाटाणा मिळाला, असे मुख्याध्यापक यांनी लिहीले असुन 50 किलो वाटाणा कमी मिळाला, असे पावतीवर असुन पुरवठादाराने देयकात 45 किलो दर्शविला आहे. म्हणजेच देयकात पुरवठादाराने 20 किलो वाटाणा जादा दर्शविल्याचे दिसुन येते. तसेच जिल्हा परिषद शाळा तळणी येथे वरील महिन्यात वर्ग 1 ते 5 व 6 ते 8 करीता वाटाणा मिळालाच नाही, असे पावतीवर असतांना पुरवठादारांनी देयकात वाटाणा पुरवठा केल्याचे दर्शविले आहे तसेच गव्हा निपाणी शाळेला वर्ग 6 ते 8 ला मसाला 1 किलो पावतीवर परत केल्याचे मुख्यध्यापक यांनी दाखविले असतांना देयकात पुरवठादाराने दर्शविले आहे. या व अशा सर्व प्रकरणांची विभागाने खात्री करावी व जादा प्रदान झाले असल्यास वसुल करुन अनुपालन सादर करावे.

**3.94 ऑनलाईन ट्रान्सफर मॅनेजमेंट संगणक सॉफ़्ट्वेअर खरेदी करणेबाबत खर्चातील अनियमिततांबाबत**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 16) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सन 2016-2017 मध्ये प्रमाणक क्रमांक 5148 दिनांक 31/03/2017 नुसार दरपत्रके बोलावून मॅस्टीफ सोलुशन प्रा.ली. अमरावती यांचेकडुन रक्कम रूपये 2,87,699/- चे ऑनलाईन ट्रान्सफर मॅनेजमेंट संगणक सॉफ़्ट्वेअर खरेदी केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदीसाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यात आली नाही. दरपत्रके मागवितांना त्यामध्ये दरपत्रके स्विकृतीचा अंतीम दिनांक नमुद करण्यात आलेला नाही. त्यामुळे दरपत्रके विहीत मुदतीत प्राप्त झाल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) दरपत्रके प्राप्त कधी झाली? ती कधी उघडण्यात आली? दर मंजुर कधी केले? तुलनात्मक तक्ता कधी तयार करण्यात आला? कामाचा आदेश कधी देण्यात आला? तसेच सदर सॉफ़्ट्वेअर INSTALL कधी केले, यांचा कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे प्रत्यक्षात दरपत्रके मागविल्याची खात्री होत नाही.

3) शासन वित्त विभाग, परिपत्रक दिनांक 17/01/2017 नुसार सन 2016-2017 या आर्थिक वर्षाकरिता दिनांक 17/01/2017 नंतर कोणत्याही खरेदी प्रस्तावांना मंजुरी देऊ नये, असे आदेश असतांना दिनांक 17/01/2017 नंतर सदर खरेदी करण्यात आली. ही बाब नियमबाहय आहे.

4) सदर सॉफ़्ट्वेअर खरेदीबाबतची आवश्यकता कुठेही नमुद नाही.

5) खालील 3 पुरवठादारांकडुन दरपत्रके मागविण्यात आली आहेत:-

I. मॅस्टीफ सोलुशन प्रा.ली. अमरावती

II. स्वयंसिध्दा अभियंता सेवा सहकारी संस्था अमरावती.

III. ऑप्टीकॅलीप्स सिस्टीम प्रा.ली. अमरावती.

परंतु, उपरोक्त पुरवठादार सदर सॉफ़्ट्वेअर तयार करण्यास सक्षम असल्याचे तसेच त्यांचेकडे त्या क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्याचे तसेच त्यांचेकडे सक्षम तज्ञ असे तांत्रीक मनुष्यबळ असल्याचे कोणतेही अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर सॉफ़्ट्वेअर योग्यरीत्या तयार केल्याचे तसेच सर्व निकषाची पुर्तता करीत असल्याचे स्पष्ट होत नाही.

6) पुरवठादार मॅस्टीफ सोलुशन प्राली. अमरावती यांचेकडुन सदर संगणक सॉफ़्ट्वेअर खरेदी करण्यात आलेले आहे. तसेच त्यांना पुढील 1 वर्षाकरिता सॉफ़्ट्वेअर मेंटेनन्ससाठी रुपये 35,800/- ADVANCE प्रदान करण्यात आलेले आहेत. परंतु, पुरवठादारासोबत करारनामा करण्यात आला नाही. तसेच पुरवठादाराकडुन सुरक्षा अनामत घेण्यात आली नाही. त्यामुळे पुरवठादाराने पुढील सेवा न दिल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही करणे शक्य होत नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

7) सदर सॉफ़्ट्वेअरची तांत्रीक तपासणी करण्यात आली नाही.

8) सदर पुरवठादाराकडुन सुरक्षा अनामत घेण्यात आली नाही

9) सदर सॉफ़्ट्वेअर वापराबाबतचे प्रशिक्षण संबधित संस्थेने देणे बंधनकारक आहे. परंतु, तसे प्रशिक्षण दिल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

10) नस्तीमध्ये डिटेल टेंडर नोटीसची प्रत जोडली आहे. त्यामध्ये निविदा प्रक्रीया राबविणेबाबतच्या सर्व तरतुदी नमुद आहेत. परंतु, असे असतांना निविदा प्रक्रीया वेळेवर रदद करुन घाईने दरपत्रके बोलावण्यात येवुन खरेदी करण्यात आली. त्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास स्पष्ट झाले नाही.

11) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 22/10/2001 नुसार कार्यालयासाठी लागणारे संगणक सॉप्टवेअर थेट खरेदी न करता माहिती तंत्रज्ञान विभागाला मागणी कळवुन त्यांचेमार्फत खरेदी करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाने परस्पर सदर सॉफ़्ट्वेअर खरेदी करणे नियमबाहय आहे.

**3.95 शालेय पोषण आहार धान्यादी माल कमी / जास्त पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11, 17 व 19) -** शिक्षण विभागाने सन 2016-2017 करीता शाळांना धान्यादी माल पुरवठा करणेकरीता खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण संचालनालय (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक शालेय पोषण आहार /सुधायो/अकोला/307/ 2016-17/3173, दिनांक 14/06/2016 अन्वये परि. क्रमांक 3 नुसार तांदुळ व धान्यादी मालाची शाळानिहाय मागणी मुख्याध्यापकांनी केंद्र प्रमुखाकडे व केंद्र प्रमुखाने गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय

पोषण आहार यांचेकडे करावी. गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांनी शाळानिहाय मागणी पुरवठादारास 20 दिवस आधी देऊन त्याची प्रत शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना दयावी. परंतू, त्याप्रमाणे पंचायत समित्यांनी जून ते ऑगस्ट 2016 ची मागणी जून अखेर व जुलै 2016 मध्ये तसेच सप्टेंबर ते नोव्हेंबर 2016 व डिसेंबर 2016 ते जानेवारी 2017, फेब्रुवारी 2017 व मार्च 2017 ची मागणी ही विलंबाने सादर केल्याचे दिसुन येते. त्यामुळे मागणीनुसार विहीत वेळेत पुरवठा करण्यात आल्याचे व विदयार्थ्यांना आवश्यक तेवढे पोषण आहार मिळाल्याचे खात्री होत नाही.

2) वर्ग 1 ते 5 व 6 ते 8 चे धान्यादी माल पुरवठा देयके व एकूण मागणीची तपासणी केली असता पुरवठादारने मागणीपेक्षा कमी / जास्त प्रमाणात पुरवठा केल्याचे दिसुन येते. मागणीपेक्षा जादा पुरवठ्याची रक्कम रूपये 8,77,209/- वसूल करावी.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 22 व शालेय क्रिडा विभाग, शासन परीपत्रक क्रमांक शापोआ2009/प्र.क्र.383/ प्राशि-4, दिनांक 26/02/2010 ड नुसार पुरवठाधारकाने धान्यादी मालाची तपासणी गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक शालेय पोषण आहार यांचे पत्रासह शासकीय प्रयोगशाळेत पाठवून प्रयोगशाळेचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालाच्या देयकासोबत सदरचा तपासणी अहवाल गटशिक्षणाधिकारी /अधिक्षक शालेय पोषण आहार यांच्याकडे सादर करतील. नंतरच देयकाची अदाई केली जाईल. परंतू, तसे केल्याबाबत गटशिक्षणाधिकारी /अधिक्षक शालेय पोषण आहार यांचे पत्र व शासकीय प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे योग्य प्रतीच्या धान्यादी मालाचा पुरवठा केल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) शालेय पोषण आहार संबधी पुरवठादाराने पंचायत समितीनिहाय शाळांना धान्यादी मालाचे पुरवठा मागणीनुसार केल्याबाबत नोंदवहया शाळा स्तरावर ठेवण्यात आल्या नाहीत. त्यामुळे पुरवठादाराकडुन पुरविण्यात आलेला माल योग्य प्राप्त झाल्याबाबत व मुख्याध्यापकांनी स्वत: नोंदवहीत नोंद घेऊन योग्य वापर केल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हातला, अनकवाडी, एकलारा, बादलापूर, शिवापूर, तुकडोजी म.आश्रम शाळा, सावरगाव ऊ, परंडा, सिरसाळा, दाळंबी, रामगाव, नागठाना इत्यादी शाळांची मागणी करण्यात आले. परंतू, पुरवठा करण्यात आले नाही. याबाबत खुलासा करावा.

6) पुरवठादाराकडुन पंचायत समितीनिहाय शाळांना पुरवठा करण्यात आलेल्या धान्यादी मालाचे डिलेव्हरी मेमोची तपासणी केली असता माल पुरवठा दिनांकावरुन विहित वेळेत माल पुरवठा करण्यात आल्याचे प्रमाणित करता येत नाही. करारनामातील अटीप्रमाणे धान्यादी मालाचे पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त 5 दिवसांत पुरवठा करण्यात यावा, अन्यथा अट क्रमांक 20 प्रमाणे 0.5 टक्के प्रती आठवडयाप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असल्यास 10 टक्के व एक लाखापेक्षा जास्त असल्यास असल्यास 5 टक्के किंवा कमीत कमी रूपये 10,000/- दंड आकरण्यात येईल. परंतू, शाळांना माल किती विलंबाने प्राप्त झाला, याविषयी एकत्रित अहवाल पंचायत समित्यांकडून प्राप्त करून दंडाची आकारणी करावयाची असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता विभागाने दंड आकारले, याबाबत खुलासा करून संबधितांवर जबाबदारी निश्चित करून दंड आकारणी करुन रक्कम वसुल करण्यात यावी व शासनखाती भरणा करून दर्शवावे.

**3.96 आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत डेक्स बेंच खरेदी खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत डेक्स बेंच खरेदीकरीता रक्कम रूपये 4,90,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त डेक्स बेंच खरेदीबाबत नस्तीची तपासणी केली असता डेक्स बेंच खरेदीकरीता महाराष्ट्र लघुविकास महामंडळ, अकोला यांना पुरवठा आदेश दिनांक 26/06/2015 दिनांकास देण्यात आले व अटीनुसार 60 दिवसांत पुरवठा करण्यात यावा, असे नमुद असतांना मुळ साठा रजिस्टर उपलब्ध झाले नाही. झेरॉक्स प्रतची

पडताळणी केली असता साठा नोंदवही पान क्रमांक 4 वर खरेदी दिनांक 26/06/2015 नमुद आहे. परंतू, प्राप्त दिनांक नाही.

2) तसेच महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामागार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 च्या परीच्छेद 2.9.3 व 2.9.4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदीदार विभागांनी / कार्यालयांनी तात्काळ खरेदी समिती स्थापन कराव्यात. खरेदी समिती व तांत्रीक समिती स्थापन न केल्यामुळे खरेदीमध्ये पारदर्शकता व वस्तुच्या टिकाऊपणा बद्दल खात्री पटत नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामागार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 परीशिष्ट 20 नुसार महाराष्ट्र लघुविकास महामंडळ यांच्याकडून खरेदी करावयाच्या वस्तुसुची मध्ये टु सीटर डेक्स बेंचचा समावेश नाही. तरी विभागाने वस्तु खरेदीकरीता निविदा मागवून व बाजार भावाशी तुलना करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही का केली नाही, याबाबत खुलासा करावा.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 मधील तरतुदीनुसार खरेदी केलेल्या साहित्याचे पुरवठा स्विकारणाऱ्या अधिका-याने रक्कम अदा करण्यापूर्वी माल सुस्थितीत प्राप्त झाल्याची नोंद संग्रह नोंदवहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी नमुना 33 साठा नोंदवहित नोंदवून कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीने माल सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र नोंदविले नाही व साठा पडताळणी करून साक्षांकित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) गटशिक्षणाधिकारी यांना साहित्य खरेदीची चौकशी करणेबाबत पत्र क्रमांक 279 दिनांक 09/08/2016 रोजी तब्बल 1 वर्षानी विलंबाने देण्यात आले. याबाबत खुलासा करून सप्रमाण दर्शवावे.

7) उपरोक्त शाळेला कोणत्या निकषाच्या आधारे डेक्स बेंच पुरविण्यात आले, याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत एकच शाळेला डेक्स, बेंच पुरविण्याचे प्रयोजन काय, याबाबत खुलासा करून सप्रमाण दर्शवावे. तसेच प्रस्तावित कामाची मागणी व आवश्यकता असलेबाबत सभेचा ठराव व वृत्तांत लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे खरेदी रकमेचा योग्य विनियोग झाल्याची पडताळणी करता आली नाही.

## 3.97 धान्यादी मालाचा पुरवठा न करता देयकाचे प्रदान करण्याबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, वाशिम अधिनस्त सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरिक्षणा दरम्यान शालेय पोषण आहाराचे शाळेवरील स्थळ पावत्याची व प्रदान केलेल्या प्रमाणकाची तपासणी केली असता पुरवठादाराने माल पुरवठा न केल्याचे निदर्शनात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) धान्यादी माल पुरवठा पावत्याची पडताळणी केली असता असे आढळुन आले की, पावतीमध्ये नमुद मालापैकी काही माल शाळेला प्राप्त झाला नाही किंवा शाळेमध्ये माल शिल्लक असल्यामुळे सदर माल शाळेने स्विकारला नाही. तशी नोंद शाळेच्या मुख्याध्यापकांनी केल्याचे दिसुन येते. परंतु, तरी सुध्दा पुरवठादाराने सदर मालाची रक्कम देयकात नमुद केली आहे व त्यानुसार देयके प्रदान करण्यात आली आहे. पुरवठा न केलेल्या मालाची रक्कम रूपये 31,280/- वसूल करावी.

2) धान्यादी मालाचा पुरवठा न करता देयकाची उचल केली आहे. पंचायत समितीने व शिक्षण विभागाने कोणत्याही प्रकारची पडतळणी न करता पुरवठा न केलेल्या मालाचे संबंधीत पुरवठादारास प्रदान केले आहे. पुरवठा न केलेल्या मालाची रक्कम लेखापरीक्षणात प्रमाणित करता येत नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसूल करुन शासन खाती जमा होणे आवश्यक आहे.

3) पुरवठा न केलेबाबत पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करावी.

**3.98 खाजगी माध्यमिक शाळांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** आरोग्य विभाग, जिल्हा परीषद, वाशिम सन 2016-2017 या वित्तिय वर्षामध्ये कार्यालयीन साहित्य खरेदीवर रक्कम रूपये 28,12,850/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 83(2) नुसार प्रत्येक वस्तु व तिचा दर्जा आणि योग्यता यांची पडताळणी केलेबाबतचे प्रमाणपत्र देयकावर नमुद केलेले नसल्याने खरेदी केलेले साहित्य योग्य दर्जाचे प्रात झाल्याबाबत खात्री करता येत नाही.

2) प्राप्त तांत्रिक लिफाफावर लेखाधिकारी, शालेय पोषण आहार व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांच्या स्वाक्षरी घेण्यात आली नाही.

3) पुरवठा आदेशानुसार जलशुध्दीकरण यंत्राचा पुरवठा करण्यापुर्वी V.N.I.T. कॉलेज, नागपुर यांचा तांत्रीक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के रक्कमेचे प्रदान करणे आवश्यक असंताना सम्मती ईजिनियरींग कॉलेज, वाशिम यांचा तपासणी अहवाल घेण्यात आला आहे. याबाबत खुलासा करावा.

4) श्री. लाल बहादुर शास्त्री विदयालय व उच्च माध्यमिक विदयालय, काटा यांची कोरी पावती जोडली आहे. पावतीवर मुद्रांकित स्वाक्षरी केलेली नाही. तसेच प.दी.जैन विदयालय यांची पोच पावती अप्राप्त आहे. त्यामुळे सदर यंत्राचा पुरवठा संबधीत शाळेमध्ये झाला किंवा नाही, याबाबत शहानिशा होऊ शकली नाही. तरी याबाबत खुलासा करावा.

5) निविदा रक्कम रुपये 28,12,850/- वर शासकिय मुद्रांक रुपये 1,900/- चे करारनामे करणे आवश्यक असतांना करण्यात आले नाही. तरी सदरची रक्कम संबधितांकडुन वसुल करुन शासकिय निधीत भरणा करुन अनुपालन सादर करावे.

6) शासन निर्णयामधील 3.2.3 (ड) नुसार निविदाकारांचे खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबध नसल्याबाबतचे निविदाकारांचे हमीपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच साहित्य खेरदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक असतांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7) उक्त शासन निर्णयामधील 4.7 नुसार पुरवठयाच्या ठिकाणी माल पोहोचताच मालाचे त्वरीत निरीक्षण करणे आवश्यक आहे. याची खात्री केल्याशिवाय व माल विनिर्देशाप्रमाणे आहे. याची खात्री केल्याशिवाय प्रदान करु नये, असे असंताना तशी कार्यवाही केली नाही.

**3.99 शालेय पोषण आहार धान यादी माल पुरवठातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** शालेय पोषण आहार धान्यादी माल पूरवठयावर रक्कम रूपये 18,90,54,416/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राज्यामध्ये शालेय पोषण आहार ही योजना इयत्ता 01 ते 08 वी च्या विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजने अंतर्गत इयत्ता 01 ली ते 05 वी या प्राथमिक वर्गातील प्राथमिक विदयार्थ्यांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्राम प्रथिनेयुक्त तसेच इयत्ता 06 वी ते 08 वी या उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थ्यांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्राम प्रथिनेयुक्त आहार देण्याचे आदेश आहेत. तसेच या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून प्रती दिन प्रती विदयार्थी प्राथमिक वर्गासाठी 100 ग्राम व उच्च प्राथमिक वर्गासाठी 150 ग्राम तांदूळ पूरविण्यात येतो. सबब याप्रमाणे तांदूळ पूरविण्यात आला किवां कसे, याबाबत खूलासा झाला नाही.

2) शासन निर्णय दिनांक 02/02/2011 रोजीचे शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 8 नुसार शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस या खर्चासाठी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात रूपये 1,000 ते 10,000 पर्यंत वितरीत करण्याचे आदेश आहेत. त्याला अनुसरून अन्न शिजविण्याचे काम करण्यासाठी स्वयंपाकी तथा मदतनीस या कामासाठी स्वतंत्रपणे महिला बचतगट / स्वयंसेवी संस्था यांचेकडून करून घ्यावयाचे आहे. त्याला अनुसरून प्रत्येक शाळेच्या उपस्थित विद्यार्थ्यांचे आधारे 25 विद्यार्थ्यांकरीता एक याप्रमाणे संख्या निश्चित केली.

त्याला अनुसरून शाळास्तरावर महिला बचतगट / स्वयंसेवी संस्था यांना खिचडी शिजविण्याचे काम नियमाप्रमाणे दिले नसल्याचे शाळा स्तरावरील लेख्यावरून आढळून आले.

3) शासन निर्णय दिनांक 02/02/2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 9 अन्वये महिला बचत गट स्वयंसेवी संस्था याची अन्य शिजविणेकरीता निवड शालेय व्यवस्थापन समितीने केली असल्याबाबत व त्याला ग्रामविकास विभागाचे शासन क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.472/वित्त9 (33), दिनांक 09/02/2009 अन्वये ग्रामसभेच्या संमतीने केल्याबाबत अधिकृत दस्तऐवज नस्तीत उपलब्ध नाहीत. त्यामुळे शाळामध्ये सदरचे काम निकषानुसार करण्यात येत आहे व मान्य संख्येनुसार निवड केल्याची खात्री करता आली नाही.

4) शासन निर्णय दिनांक 02/02/2011 चे शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 9 नुसार अन्न शिजविण्याचे काम करण्यात येत असल्याने निकषानुसार ग्रामीण भागातील शाळामध्ये अन्न शिजविण्याचे काम करण्याच्या यंत्रनेस वरीलप्रमाणे अनुदान अदा करण्यास मान्यता दिली आहे. त्याला अनुसरून इंधन आणि भाजीपाला व पुरक आहार व स्वयंपाकी, मदतनीस या खर्चासाठी प्राप्त अनुदानित रक्कमा शाळेला वितरीत न करता बचत गट किंवा स्वयंसेवी संस्थेस वितरीत करावयाच्या होत्या. तशा प्रकारे कार्यवाही न केल्याने खर्चामध्ये पारदर्शकता राहीली नाही.

5) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पिआरई 2010/प्र.क्र217/प्रशि1, दिनांक 17/06/2010 ला अनुसरुन बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 चे कलम 21 नुसार खाजगी शाळेने शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करुन आपले व्यवहार पारदर्शक असल्याबाबत खर्चास मंजुरी घेतली नाही. त्यामुळे शासकिय अनुदानीत रक्कमेची हानी होण्याची शकयता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पूरवठा व ग्राहक संरक्षक विभागाचे निर्णय क्रमाक शापोअ-1000/ प्र.क्र.134/नापू-17, दिनांक 27/08/2001 तसेच शिक्षण संचालक, पुणे यांचे परीपत्रक क्रमांक शापोआ/सूधायो/307/ 16.17/3186, दिनांक 14/06/2016 अन्वये शिक्षण अधिकारी, प्राथमिक यांनी दर तीन महीन्यांत एकदा पूरवठादाराच्या गोदामाची तपासणी करणे आवश्यक आहे. तशा प्रकारचे तपासणी अहवाल आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे परीपत्रक क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.484/प्राशि-4/ एस.डी.3, दिनांक 14/08/2014 नूसार सदर योजने अंतर्गत साहित्य व सूक्ष्मपोषण इत्यादी बाबीसाठी पुरविण्यासाठी या योजनेमधून निधी खर्च करण्याची मान्यता दिली आहे. परंतू, वर्ग 01 ते 05 च्या विदयार्थ्यांना माध्यान्ह भोजन बरोबर सर्व भागात मायक्रो न्यूट्रीयंट सप्लीमेंटशन आय.एफ.अे सायरप बिगर आदीवासी भागात इंटरल फीड पावडर व आदिवासी भागात मायक्रो न्यूट्रीयंट फॉरम्यूलेशन स्प्रिंकल्स पुरविण्याचे आदेशीत असताना सदर आदेशाचे पालन केल्याचे आढळून आले नाही.

8) करारनाम्यामध्ये धान्यादी मालाचे पूरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त 05 दिवसामध्ये पूरवठा सूरू करणेचे आदेश आहेत. परंतू, तसा पूरवठा सूरू केल्याचे आढळून आले नाही.

9) पोच पावत्यावर माल प्राप्तीचे तारखा व माल पूरवठा करण्याचे आदेश दिनांक नमूद नसल्यामूळे माल विहीत मूदतीत प्राप्त झाला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही..

10) पूरवठादाराने मालाचा पूरवठा केल्यानंतर त्याचे तालूकानिहाय नमूने प्रथम शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात येतील. शासकीय प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालाचे देयके अदा करण्याचे आदेश आहे. परंतु देयकासोबत तशा प्रकारचे चाचणी अहवाल आढळून आले नाही.

### 3.100 ई वर्ग जमिनीचे मालकी व हर्रासा बाबत अनियमितता.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासनाकडुन हस्तांतरीत झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत असलेल्या शेतजमिनीचा हर्रास पध्दतीने एक वर्षाकरीता वहितीस देणेबाबतची कार्यवाही करण्याकरीता आदेशित करण्यात आले किंवा कसे, सदरची शेतजमिन हर्रास करुन रक्कमा जिल्हानिधीत जमा करण्यात आले किंवा कसे, याबाबत खूलासा करावा.

2) सदरचे शेत-जमिन जिल्हा परीषद मालकीचे आहे किंवा कसे, याबाबत 7/12 व 6/2 महसूली विभागाकडून घेण्यात आले. सबब जिल्हा परीषद मालकीचे शेतजमिन किती आहे व कोणत्या ठिकाणी आहे, याबाबत खूलासा झाला नाही.

3) पंचायत समिती अंतर्गत सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, सचिव ग्रामपंचायत व सरपंच यांना पत्र पाठवुन तलाठयाकडुन गावनिहाय व महसुली पुरावे गोळा केल्यास व ज्या गावात इ वर्ग जमिन नाही, तेथील तलाठीकडुन ई वर्ग जमिन नसल्याचे लेखी घेतल्यास पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनीची निश्चिती होवून नोंदवहया अद्यावत करता येतील. अतिक्रमण झालेल्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्याची उपाययोजना करता येईल.

4) ज्या जमिनी सामाजिक वनीकरणामध्ये गेल्या, त्यातील सामाजिक वर्गीकरणाची झाडे पुर्णत: नष्ट झाली असतांना ती शेती करण्यायोग्य करुन नियमित हर्रास करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषद उत्पन्न वाढीसंबंधी ध्येय धोरण ठरविता येईल. तसेच शेतजमिनीचा हर्रास न झाल्याने जिल्हा परिषदेस उत्पन्न मिळू शकले नाही. योग्य ती उपाययोजना न करणे ही बाब आर्थिक नियमास धरुन नाही.

5) जी शेतजमिन जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे, त्यावर अतिक्रमण होवू नये. तिचा योग्य विनियोग करण्याकरीता जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारा कळवून त्या शेतजमिनी जिल्हा परिषदेने स्वत:च्या नावे न केल्याने अनावश्यकरीत्या इतर ग्रामस्त उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांचेकडे जमिनीची मागणी करुन महसुल विभागाचे सक्षम प्राधिकरण ती जमिन सरकारची आहे म्हणून पुर्ण प्रक्रिया पार पाडून जिल्हा परिषदेच्या परवानगीशिवाय मागणी करणाऱ्यास देवून टाकतात. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचा दुरुपयोग होतो. त्यावर आळा घालणे व मत्ता महसूली लेख्यात जिल्हा परिषदेच्या नावे करण्याकरीता आवश्यक ती उपाय योजना करणे अनिवार्य ठरते.

6) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक 04/12/2010 अन्वये जिल्हा परिषद पंचायत समितीच्या ताब्यातील जमिनीचे अतिक्रमणापासुन संरक्षण करण्याबाबत आदेश पारीत केले आहेत. त्यातील सुचना क्रमांक 1 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी जमिनीचे भुसर्वेक्षण व भुलेखापरिक्षण करावे. त्यासाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आदेशित असूनसुध्दा जिल्हा परिषदेने कोणतीही कार्यवाही न केल्याचे आढळून आले. सबब सदरचे जमिनिवर अतिक्रमण होण्याची शकयता नाकारता येत नाही.

**3.101 सुवर्ण महोत्सवी आदीवासी विदयार्थीना शिष्यवृत्ती वाटप योजनाबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** वित्त विभागामधून रक्कम रूपये 4,66,33,100/- रककमा काढल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची खर्चाची नोदंवही ठेवली नाही. सबब प्रत्याक्षात किती रककम खर्च झाली व किती रककम अखर्चीत आहे, याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) वित्त विभागाकडून रककम काढल्यानंतर शिक्षण विभागाचे रोकडवहीवर सदरची रककम जमा म्हणून घेतली आहे. दिनांक 31/03/2017 रोजी शिक्षण विभागाचे रोकडवहीवर अखर्चीत रककम रूपये 52,87,358/- आढळून आली. आवश्यकता पेक्षा जास्त रककम का काढण्यात आली, याबाबत खुलासा झाला नाही.

3) अखर्चीत रककम परत करण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र-20/का-12 दिनाक 31/05/2010 मधील अटी व शर्ती नुसार शिष्यवृत्तीचे प्रस्ताव विहीत वेळेत सादर करणे तसेच वेळेवर शिष्यवृत्ती अदा करणे याची जबाबदारी मुख्याध्यापक व प्रकल्प अधिकारी यांची राहील. यात विलंब झाल्यास जबाबदारी असणा-या अधिकारी व कर्मचा-यावर शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील, असे नमूद आहे. परंतू, सदर शिष्यवृत्ती रककम विहीत वेळेत वाटप केल्याचे आढळून आले नाही. तसेच जिल्हा परीषद स्तरावर रककम अखर्चीत आढळून आली आहे.

5) उपरोकत प्रमाणे नमूद केलेले शासन निर्णयान्वये सदर योजनेची कार्यपध्दतीनुसार विस्तार अधिकारी शिक्षण व उपशिक्षणाधिकारी शाळाना भेटी देण्यासाठी अथवा तपासणीसाठी जातील, तेव्हा त्यांनी विद्यार्थी व त्यांचे आई-वडील / पालक यांच्याशी संपर्क साधून शिष्यवृत्तीची रककम त्यांना मिळाली किंवा कसे, याची अभिलेख्याचे आधारे पाहणी करण्याचे नमूद आहे. विस्तार अधिकारी शिक्षण व उपशिक्षणाधिकारी अशी पाहणी केल्याचे आढळून आले नाही. सबब योगय लाभार्थींना शिष्यवृत्तीची रककम मिळाली किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

6) शिक्षण विभागाने सादर केलेले खर्चाचे अहवालानुसार प्राप्त अनूदानाची रककम खर्च झाल्याचे चूकीचे अहवाल सादर केले आहे. खर्चाचा ताळमेळ करून अखर्चीत रककम परत करून अनूपालन दर्शवावा.

7) लाभार्थीने चूकीचे बँकेचे खाते क्रमांक दिल्यामूळे बँकेने सदरची रककम परत केले आहे. सबब सदरची रककम वित्त विभागात जमा करून दुबार प्रमाणकाव्दारे ही रककम काढणे आवश्यक होते. परंतू, ही रककम वित्त विभागात जमा न करता शिक्षण विभागाचे रोकडवहीवर जमा करून परस्पर वाटप केले आहे. अशा वेळेस रककमेचा गैरवापर होण्याची शकयता नाकारता येत नाही.

**3.102 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत धान्यादी किराणा माल पुरवठा देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, निर्णय क्रमांक शापोआ2009/प्रक्रं.136/प्राशि-4, दिनांक 18/06/2009 नुसार तालुकास्तरीय अधिक्षक यांनी तालुक्यातील शाळांमध्ये वेळोवेळी शालेय पोषण आहाराची तपासणी करणे तसेच आहाराचा दर्जा व गुववत्ता यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रकारचा अहवाल आढळुन आला नाही. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा दर्जा व गुणवत्ताबाबत लेखापरीक्षणास सत्यता पडताळता आली नाही.

2) शालेय क्रिडा व शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 01/06/2009 मधे नमूद केल्याप्रमाणे दक्षता पथक स्थापन करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दक्षता पथक स्थापन केले नाही.

3) तांदुळ तथा धान्यादी मालाची पावतीवर पुरवठयाचा दिनांक, वाहन क्रमांक, मालाची वाहतुक करणा-याचे नाव असणेबाबत सन 2016-2017 चे पुरवठा आदेशातील मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद असतांना पावत्यांवर वाहनाचा क्रमांक, पावत्यांच्या क्रमांकामध्ये खाडाखोड, पुरवठयाचा दिनांक नमूद केल्याचे आढळून आलेले नाही. तसेच पावत्यांवरील क्रमांकामध्ये खाडाखोड आढळून आलेली आहे. शाळास्तरावरुन प्राप्त पोच पावत्यांची पडताळणी केली असता देण्यात आलेल्या पोच पावत्यांवर दिनांक नमुद नसल्याने आढळुन आले. त्यामुळे सदर धान्यादी किराणा माल संबंधीत शाळांना कधी प्राप्त झाला, याबाबत खात्री पटत नाही. त्यामुळे विलंबाने माल पुरवठा झाला असल्याची शक्यता निर्माण होते. विलंब झाला असल्यास मालाची गुणवत्तेबाबत खात्री देता येत नाही.

4) शालेय पोषण आहारासाठी करण्यात आलेल्या करारामध्ये अट क्रमांक 14 मध्ये 1 ली ते 5 वी साठी व 6 वी ते 8 वी साठी स्वतंत्र पावती असणे आवश्यक असतांना एकच पावती काही ठिकाणी वापरून किंवा पावत्यांवर खाडाखोड करण्यात आलेली आहे.

5) स्वयंपाकी व मदतनीस यांचे मानधन अदा करतांना एकच खाते दोन कर्मचाऱ्यांचा असल्याचे आढळून आले.

6) शालेय पोषण आहार संबंधातील तक्रार प्रकरणे, अपहार प्रकरणे याबाबत कोणतेही दस्त लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. वरील सर्व बाबींबाबत खुलासा तथा अनुपालन सादर करावे

**3.103 ई-क्लास जमिनीवरील अतिक्रमणाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद शिक्षण विभाग अंतर्गत ई-क्लास जमिनीबाबतची अदयावत नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. आवश्यकतेनुसार पंचायत समित्यांकडुन माहीती मागविली जातात. त्यामुळे पंचायत समित्यांनी सादर केलेली माहिती अचुक व वास्तविक आहे किंवा नाही, हे समजु शकत नाही.

2) ई क्लास जमिनीवरील शाळा व क्षेत्रनिहाय झालेल्या हर्रासी, हर्रासीमधून प्राप्त रक्कम, अतिक्रमण झालेल्या जमिनीचे क्षेत्र, याबाबत माहिती मागविली असता एकूण ई क्लास जमिनीचे क्षेत्र 1,370 हेक्टर असून त्यापैकी 311 हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याबाबत नमूद केले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हा परिषद, बुलढाणाने तयार केलेल्या जमेच्या अंदाजपत्रकात 800 इतर जमा ई-क्लास जमिनीअंतर्गत एकुण रुपये 12,89,000/- अंदाजीत जमा दर्शवीली आहे. परंतु, प्रत्यक्षात फक्त ई-क्लास जमिनी 2016-2017 करीता हर्रासी करुन एकुण रुपये 5,26,240/- जमा झाल्याचे आढळतात. अंदाजित रकमेपेक्षा रुपये 7,62,760/- कमी जमा झाले आहे. तसेच सन 2015-2016 मधील जमा रकमेपेक्षा रूपये 6,64,211/- एवढी कमी रक्कम जमा झालेली आहे. याचे प्रमुख कारण ई क्लास जमिनीवरील अतिक्रमण आहे. सदर जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडून गंभीर कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हा परीषदेचे उत्पन्न कमी होत आहे व जमिनही ताब्यातून जाण्याची शक्यता आहे. यावर जिल्हा परिषद, शिक्षण विभागाने तातडीने अतिक्रमण हटवण्यासाठी कारवाई करणे आवश्यक आहे. केलेल्या कारवाईचे अनुपालन सादर करावे.

**3.104 शालेय पोषण आहार धान्यादी माल पुरवठ्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 8,41,07,375/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पुरवठादारास माहे जुलै ते ऑगस्ट 2016 पर्यंत धान्याचे मालाचे पुरवठाबाबत देयके अदा करण्यास मंजुरी आहे मात्र नियमबाह्यपणे माहे सप्टेंबर 2016 ते मार्च 2017 पर्यंत कालावधीचे एकुण रक्कम रुपये 6,06,37,231/- ची देयके अदा करण्यात आलेले आहे.

2) शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/नागपूर/307/2016-2017/3186, दिनांक 14/06/2016 मधील सुचना नुसार प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिने व उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त दुपारचे भोजन देण्यासाठी परिशिष्ट अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहाराचा पाककृतीमधुन आहार वाटप करण्याचे निर्देश आहेत तरी याबाबत विद्यार्थ्यांना लाभ मिळाल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांच्या तपासण्या नस्तीबध्द नाहीत.

3) शासन निर्णय क्रमांक शापोआ-1000/प्र.क्र.134/नापू17, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभाग मंत्रालय विस्तार मुंबई, दिनांक 27/08/2001 नुसार तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/नागपूर/307/2016-2017/3186, दिनांक 14/06/2016 मधील सुचना नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दर तीन महिन्यातुन एकदा पुरवठादाराच्या गोदामाची तपासणी करणे आवश्यक असतांना तपासणी अहवाल आढळुन आलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2012/प्र.क्र.484/ प्राशि-4/एस.डी.3, दिनांक 14/08/2014 नुसार सदर योजने अंतर्गत साहित्य व सुक्ष्मपोषण इत्यादी बाबी पुरविण्यासाठी या योजनेमधुन निधी खर्च करण्याची मान्यता दिलेली आहे परंतु वर्ग 1 ते 5 च्या विद्यार्थ्यांना माध्यान्ह भोजनाबरोबर सर्व भागात मायक्रोन्युट्रीयन्ट सप्लीमंटेशन आय.एफ.ए.सिरप,बिगर आदिवासी भगात इंटरल फिड पावडर व आदिवासी भागात मल्टीमायक्रोन्युट्रीयन्ट फॉरम्युलेशन स्प्रिंकल्स पुरविण्याचे आदेशीत असतांना सदर आदेशाचे पालन करण्यात आलेले नाही.

5) पुरवठादार व शिक्षण संचालक यांचा करारनामा दिनांक 30/06/2016 मधील अटी व शर्ती नुसार पुवठादाराने त्याच्या गोदामामध्ये धान्य साठवणुक प्रमाणपत्र व फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्ड ॲक्ट 2006 चे प्रमाणपत्राची प्रमाणितप्रत ठेवणे आवश्यक असतांना सदर प्रत नस्तीबध्द नाही.

**3.105 रायटिंग बोर्ड (ग्रीन बोर्ड) खरेदीवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 49,95,113/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनाम्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची स्वाक्षरी नाही. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 07 नुसार पुरवठादारासोबत करारनामा केल्यानंतर करारनामा करणा-या दोन्ही पक्षाची करारनाम्यावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

2) डिलिव्हरी चालानवर साहित्य प्राप्त झाल्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी आहे परंतु साहित्य कोणत्या तारखेला प्राप्त झाले ती तारीख स्वाक्षरीखाली नमुद नाही. तालुका रामटेक, पारशिवनी व कामठी वगळता इतर 10 तालुक्यांच्या डिलिव्हरी चालानवर साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद नही. त्यामुळे 10 तालुक्यांना साहित्य उशिरा प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खात्री होत नाही. रामटेक तालुक्याला डिलिव्हरी चालाननुसार साहित्य दिनांक 23/01/2017 रोजी म्हणजे उशिराने प्राप्त झाल्याचे दिसून येते, परंतु त्याबाबत दंड वसुल करण्यात आलेला नाही. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 08 नुसार साहित्य मिळाल्याबाबत स्वाक्षरी, पदनाम व दिनांक नमुद करणे आवश्यक आहे आणि जर साहित्य उशिरा प्राप्त झाले असेल तर दरकरारातील नियमानुसार पुरवठादाराकडून दंड वसुल करणे अनिवार्य आहे.

3) प्रमाणकावरील प्रदानाचा आदेश सहीनिशी आहे, परंतु तारीख नमुद केलेली नाही. मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 33 नुसार प्रत्येक प्रमाणकावरील प्रदानाचा आदेश, वितरणास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याच्या सहीनिशी व तारीख नमुद केलेला असणे आवश्यक आहे.

4) देयकाचे प्रदान दोन भागात करावयाचे असतांना एकाच वेळेस करण्यात आलेले आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 09 नुसार साहित्य मिळाल्याची पोच प्राप्त झाल्यानंतर 80 टक्के प्रदान करावयाचे असून उर्वरीत 20 टक्के प्रदान दरकरारातील अटी व शर्तीप्रमाणे करावयाचे असतांना संपूर्ण प्रदान एकाच वेळेस करण्यात आलेले आहे.

**3.106 जिल्हा क्रिडा स्पर्धा 2016-2017 मधील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत रक्कम रूपये 8,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-**III/**उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये साहित्य खरेदी साठी दरपत्रके मागवुन कमी दर असलेल्या पुरवठादाराकडुन खरेदी करणे आवश्यक असतांना शासन निर्देशाचे पालन न करता खरेदी केल्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन**,** ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार जिल्हा परिषदामधील विकास योजना राबवितांना प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी घेणे बंधनकारक आहे तथा त्याशिवाय केलेला खर्च काय्द्या विरुध्द प्रदान आहे.

3) साठा नोदवही उपलब्ध न झाल्याने पुरवठादाराने साहित्य कधी पोहचविले व संबंधीतांना वाटप करुन किती साहित्य शिल्लक आहेत याबाबत शहानिशा करता आले नाही.

4) भोजनाचे खर्चाबाबत दस्ताऐवज लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. चहा**,** नास्ता व भोजनबाबत मुळ प्रमाणकाला 980, 20/02/2017 चे उपप्रमाणक जोडलेले असतांना नस्तीबध्द प्रमाणकाला 974, 20/02/2017 चे उपप्रमाणक जोडण्यात आलेले आहे. सदर उपप्रमाणकात भोजनासाठी उपस्थितांच्या संख्येमध्ये 500 विद्यार्थ्यांचा / उपस्थितांचा फरक आहे.

5) 722 विदयार्थ्यांना जाणे व येणे साठी रक्कम रुपये 1,09,180/- देण्यात आलेले आहे. मात्र संबंधीतांना रक्कम मिळाल्याबाबत पोच घेण्यात आलेले नाही.

**3.107 जिल्हा परिषद प्रा.शाळांचा जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रम राबविणे यावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदर बाबत रक्कम रूपये 6,86,155/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीतील पृष्ठ क्रमांक 5 वर बाबनिहाय संभाव्य खर्चाचे रूपये 5,00,000/- चे अंदाजपत्रक दिले आहे. परंतु, सुधारीत तरतुद रूपये 7,50,000/- च्या संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रक दिले नाही.

2) बंडू कॅटरर्स, वर्धा यांना भोजन व नाश्ताचे त्यांचे दरपत्रक कमी दराचे असल्यामुळे पुरवठा आदेश देण्यात येउन त्यांना 5267 प्लेट जेवण व 3100 प्लेट नाश्ता करीता रूपये 2,99,015/- चे शोधन करण्यात आले. प्रत्यक्षात विभागाने एम.एम.कात्रोजवार, वर्धा यांचेकडून भोजन व नाश्ता करीता फक्त 3100 पासेसची छपाई केली असतांना म्हणजेच 3100 प्लेट नाश्ता वाटप केला असतांना 5276 प्लेट जेवण पासेस शिवाय पुरविण्यात आले किंवा कसे याबाबत अर्धसमास पत्र क्र.05 दिनांक 27.09.2017 देण्यात येउनही लेखापरीक्षणात खुलासा करण्यात आलेला नाही.

3) निमंत्रण पत्रीका प्रती नग रूपये 29/- प्रमाणे छपाई केलेली आहे. क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम हा शालेय विदयार्थ्यांचा असतांना विदयार्थ्यांना याचा जास्तीत जास्त फायदा दयावयाचा असतांना कमी दराच्या पत्रिका न छापता वित्तीय औचित्याच्या सुत्राचा अवलंब केलेला नाही. जिल्हा परिषदेचे स्वत:चे मुद्रणालय असतांना खाजगी फर्मकडुन छपाई करून जिल्हा परिषद निधीचा अपव्यय केलेला आहे.

4) एम.एम.कात्रोजवार, वर्धा यांचेकडून 470 चौ.फुट बॅनर्स @ रूपये 20/- प्रमाणे रूपये 9,400/- व लहान-मोठी फ्रेम 28 नग किंमत रूपये 11,800/- याप्रमाणे एकुण रूपये 21,200/- चा पुरवठादारास आदेश दिलेला नसतांना केलेला खर्च नियमबाहय असुन वसुलपात्र आहे.

5) बंडू कॅटरर्स अँड बिछायत केंद्र, वर्धा यांना मंडप डेकोरेशन व बिछायत करीता रूपये 1,99,616/- शोधन करण्यात आले. प्राप्त तीन दरपत्रकात सर्वात कमी दराचे रूपये 1,11,500/- चे दरपत्रक बंडू कॅटरर्स अँड बिछायत केंद्र, वर्धा यांचे असल्याने ते मंजुर करण्यात आले. पुरवठा आदेश क्रमांक 276 दिनांक 22/12/2016 अन्वये रूपये 1,11,500/- चा असतांना त्यांना रूपये 88,116/- जादा का शोधन केले?

6) एस.के.ट्रॅव्हल्स, वर्धा यांना वाहनाचे भाडे रूपये 15,000/- शोधन करण्यात आले. वर्धा ते वडनेर जाणे व येण्याकरीता सार्वजनीक वाहनाने प्रवास का केला नाही? कार्यक्रम दिनांक 5 ते 7 जानेवारी या दरम्यान असतांना वाहन भाडे 10 दिवसांचे शोधन केले आहे. शासकीय अधिकारी / कर्मच्या-यांना शासन नियमानुसार प्रवास भत्ता अनुज्ञेय असतांना खाजगी वाहन भाडयावरील खर्च नियमबाहय ठरतो.

7) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचे स्वत:चे वाहनात जय जगदंबे सर्वो पेट्रोलीयम यांचे बिल क्रमांक 2609 दिनांक 03/01/2017 अन्वये रूपये 630/- चे डिझेल भरण्यात आले. वैयक्तीक वाहनावरील डिझेलचा खर्च अनुज्ञेय नाही.

8) बंडू कॅटरर्स व बंडू बिछायत केंद्र यांचेकडून 2 टक्के आयकर व 15 टक्के अधिभार कपात केलेला आहे. सेवाकर नियम 1994 (सुधारीत अधिसुचना 2012) नुसार नियम क्रमांक 2(1) अन्वये देयकातुन सेवाकर कपात करणे आवश्यक आहे.

9) क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम हा शालेय विदयार्थ्यांच्या बौध्दीक व शारिरीक सुप्त गुणांना वाव मिळावा. त्यांच्यातील कौशल्य दाखविण्याची संधी त्यांना मिळावी. याकरीता त्यांना बक्षिसे देउन गौरवान्वीत करावयाचे असतांना विभागाने बक्षिसे खरेदीवर अत्यल्प खर्च करून बॅनर, बोर्ड, सत्कार, हार, बुके, वाहनभाडे, स्टेज, बैठक व्यवस्था, वारंवार मिटींग मध्ये चहापान यासारख्या निरर्थक बाबीवर खर्च करून जिल्हा निधीचा अपव्यय केलेला आहे. सबब वरीलप्रमाणे जादाचा खर्च रूपये 1,17,446/- वसुलपात्र आहे.

**3.108 जिल्हा परीषद शाळेतील मुलां-मुलींना गणवेश पुरविणेमधील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद शाळेतील मुलां-मुलींना गणवेश पुरविणेबाबत रक्कम रुपये 20,00,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2013(67/13)/प्राशि-05, दिनांक 31/10/2013 अन्वये राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी इयत्ता 01 ली ते 04 थी मधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप योजना बंद करण्यात आली आहे. असे असतांना सुध्दा शिक्षण विभाग, जिल्हा परीषद, वर्धा ने नियमबाहयपणे योजना राबविली आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 02 दिनांक 26/09/2017 अन्वये विचारणा केली असता विभागाने अद्यापपर्यंत उत्तर देण्यात आलेले नाही.

2) उपरोक्त पंचायत समितीकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेतल्याचे दिसुन येत नाही

**3.109 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणी (मुले) करिता जुनी इमारत व खाली जागा खरेदीवरील नियमबाहय खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत रककम रूपये 6,72,300/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जागा खरेदी बाबतची नस्ती, दिवाणी न्यायालय सेलू येथील प्रकरणाचे निकालपत्र तपासले असता शाळेची जुनी इमारत व खाली जागा ही श्री. भोला साठोणे रा.हिंगणी यांचे वडीलांनी जनपदच्या काळात जिल्हा परिषदेला दान कलेली असल्याचे व दान दिल्याबाबतचा दगड सदर इमारतीच्या भिंतीवर लावलेला असल्याचे जिल्हा परिषदेने न्यायालयीन कागदपत्रात नमुद केले आहे. परंतु, जुनी इमारत व जमिनीचा 7/12 हा जिल्हा परिषदेच्या नावावर असल्याचा पुरावा जिल्हा परिषद न्यायालयात सादर करू शकली नाही. मालमत्ता हस्तांतरण अधिनियम 1882 चे कलम 123 अन्वये स्थावर मालमत्तेचे दान करण्याच्या प्रयोजनार्थ हस्तांतरण दात्याने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरीत आणि किमान दोन साक्षीदारांनी साक्षांकीत केलेल्या अशा नोंदणी झालेल्या संलेखानेच घडवुन आणवे लागते. सदरची तरतुद ही बंधनकारक आहे. असे असतांना जिल्हा परिषदेने सदर मालमत्ता स्वत:च्या नावावर करवुन घेण्याबाबत कोणतेही प्रयत्न केले नाही. या सबबीवर न्यायालयाने निर्णय वादीच्या म्हणजेच श्री. भोला साठोणे यांच्या बाजुने दिला आहे व त्यामुळे श्री. साठोणे यांचेसोबत शेवटी तडजोड करण्यात येऊन इमारत व जागेची रूपये 5,00,000/- ला खरेदी करण्यात आली. दान मिळालेल्या इमारत व जागेची जिल्हा परिषदेने त्याचवेळी नोंदणी केली असती, तर जिल्हा परिषद ला इमारत व जागा खरेदी करीता खर्च करावा लागला नसता व पर्यायाने जिल्हा निधीची बचत झाली असती. सबब निधीच्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक आहे.

2) श्री. विनोद निंबाळकर, अर्जनविस यांना दस्त तयार करणे, सेवा देणे, सेवा शुल्क व इतर खर्चाकरीता रूपये 8,300/- चे शोधन केलेले आहे. खरेदी विक्री प्रकरणात अर्जनविस यांची सेवा घेण्याची जिल्हा परिषदेला आवश्यकता नसतांना तसेच जिल्हा परिषदेकडे न्यायालयीन कामात जिल्हा परिषदची बाजु मांडण्याकरीता पॅनलवर वकीलांची नियुक्ती केलेली असतांना अर्जनविस करीता केलेला खर्च नियमबाहय असुन वसुलपात्र आहे. तसेच अर्जनविस यांनी सादर केलेल्या बिलात दस्त तयार करणे, सेवा देणे, सेवा शुल्क व इतर खर्च याबाबत दर नमुद केले नाही.

3) जागा खरेदी केल्यावर प्राप्त 7/12 वर बँक ऑफ इंडीया सेलू यांचे रूपये 1,50,000/- कर्जाचा बोजा असल्याची नोंद आहे. विक्रीपत्रातील करारानुसार विक्रीपुर्वीचे कर्ज व सर्व देणी विकणा-यांनी दयावयाची असतांना नवीन 7/12 वर जिल्हा परिषदेच्या नावे कर्जाची नोंद कशी आहे?

4) खरेदी केलेली जमीन अकृषक असल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र नाही.

5) जमीन विकत घेण्यापुर्वी वकीलांच्या सल्ल्याने वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन करण्याबाबत नस्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी निर्देशीत केले असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.110 जिल्हा परिषद नुतन विद्‌यालय मुंढरी क डेस्क/ बेंच खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्‌योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्राक्र82/भाग3/ उदयोग 4, दिनांक 1/12/2016 नुसार वर्तमान पत्रात जाहीरात देवून निवीदा मागविण्याची कार्यवाही करावयाची असतांना स्थानिक बाजारातून दरपत्रके मागवून साहीत्य खरेदी करण्यात आले अनियमिततेबाबत खुलासा सादर करावा.

2) जिल्हा परिषद भंडारा यांचे प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी आदेश नस्तीसह आढळून आले नाही.

3) साहीत्य खरेदी करण्यापूर्वी शासकीय औद्‌योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडे मागणी नोंदविणे आवश्यक असतांना किंवा नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते परंतु तयाप्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणास दिसून आले नाही.

4) जिल्हा परिषद नुतन विद्‌यालय मुंढरी क यांनी दरपत्रक बोलविण्याबाबतचे पत्र, प्राप्त दरपत्रकावर आवक क्रमांक, दरपत्रक उघडल्याबाबत निवीदा समिती यांचे स्वाक्षरी तसेच साहीत्य प्राप्त झाल्याबाबत delivery chalan आढळून आले नाही. यावरुन साहित्य प्राप्त झाले किंवा नाही यांची खात्री करता आली नाही.

5) साहित्य खरेदी करण्यापूर्वी शाळेत किती विद्‌यार्थी प्रवेशित आहे, पटसंख्या व शाळेत उपलब्ध डेस्क बेंच किती आहे, याबाबतचा ताळमेळ न घेता खरेदी करण्यात आले.

6) साहित्य प्राप्त झाल्याबाबत जडसंग्रह नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

7) साहित्याचा दर्जा बाबत शासकीय यंत्रणेकडून तपासणी अहवाल प्राप्त केलेला नाही.

8) उपयोगिता प्रमाणपत्र आढळून आलेले नाही.

**3.111 मानव विकास कार्यक्रम 2016-2017 अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत परसबाग लागवड करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदर कामावर रक्कम रूपये 10,05,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजने अंतर्गत शाळेची निवड कोणत्या आधारे करण्यात आली? शाळा निवडीचे निकष काय? याबाबतचे अभिलेखे सादर करण्यात आले नाही.

2) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद भंडारा यांचे पत्र क्रमांक 478, दिनांक 03/02/2017 नुसार दिनांक 04/02/2017 रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.सदर कार्यशाळेस उपस्थितांची यादी नस्तीसह आढळून आली नाही.

3) सदर योजना राबविण्याकरीता निवड केलेल्या शाळेमध्ये 1 गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबतचे तांत्रिक अधिका-यांचा अहवाल दिसून आलेला नाही.

4) शाळेमध्ये परसबाग तयार करण्याकरीता कृषी तंत्रज्ञान यंत्रणा (आत्मा) यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली करावयाचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे नस्तीसह आढळून आले नाही

5) शाळेमध्ये परसबाग तयार करतांना मुबलक पाण्याची सोय असल्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती किंवा संबंधित शासकीय यंत्रणेचा अहवाल प्राप्त नाही.

6) सदर योजना राबविण्यास तयार असल्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती यांचे अहवाल नस्तीसह आढळून आले नाही.

7) शाळा स्तरावर तयार करण्यात आलेल्या परसबाग मधून विद्‌यार्थ्यांना पोषण आहाराकरीता ताजा भाजीपाला मिळावा व विद्‌यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ रहावे या माध्यमातुन तयार होणारा भाजीपाला कोणकोणता तयार करण्यात आला व किती प्रमाणात भाजीपाला तयार झाला व विद्‌यार्थ्यांच्या कितपत उपयोगात आणण्यात आला या बाबतचे अभिलेखे पहावयास मिळाले नाही.

8) अ) जिल्हा परिषद कन्या शाळा मोहाडी - जागेची व पाण्याची समस्या

ब) जिल्हा परिषद बेसीक प्राथ शाळा करडी - जागा उपलब्ध नाही.

वरील शाळेच्या मुख्याध्यापकांनी नमुद कारणास्तव परसबाग तयार करण्यास असंमती दर्शविली आहे. यावरुन योजनेच्या अनुषंगाने निकषाची पूर्तता न करताच शाळेची निवड केल्याचे दिसून येते

9) जिल्हा परिषद उच्च प्राथ शाळा मांडवी पंचायत समिती भंडारा यांचे अभिलेख्याची तपासणी केली असता बँक नोंदीनुसार दिनांक 20/05/2017 रोजी रक्कम रुपये 10,050/- जमा झाले असून रक्कम रुपये 7,690/- खर्च करण्यात आला आहे.

परसबाग तयार करतांना नेमून दिलेल्या बाबीवर खर्च करावयाचा असल्याने वरिल बाबी त्यासबंधीत नसल्याने सदरची रक्कम संबंधीताकडून वसूल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

**3.112 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत इयत्ता 1 ली ते 8 वी चे शाळांना तांदूळ व धान्यादी मालाचा पूरवठा करणेचे याजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदर बाबत रक्कम रूपये 7,03,98,105/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि 4, दिनांक 02/02/2011 मधील प्रस्तावनानुसार शालेय पोषण आहार (Mid day Meal) हि योजना इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असून या योजनेमध्ये केंद्र व राज्याच्या खर्चाचे प्रमाण 75:25 असे असून प्रत्यक्षात इयत्ता 1 ली ते 5 वी करीता राज्यहिस्सा 50.15 टक्के प्रमाणे रूपये 88,56,529/- आणि इयत्ता 6 वी ते 8 वी करीता राज्य हिस्सामधून 37.22 टक्के प्रमाणे रूपये 43,00,351/- असे एकूण रूपये 1,31,56,880/- जादा खर्च केलेले आहे. करीता केंद्राकडून अनुदान प्राप्त करून रूपये 1,31,56,880/- चे समायोजन करणे आवश्यक आहे.

2) पुरवठादाराचे देयकातून आयकर रूपये 14,07,962/- (एकूण देयकांची रक्कम रूपये 7,03,98,105/- चे 2 टक्के) कपात केल्याचे दिसून आले नाही.

3) करारनामातील अट क्रमांक 29 नुसार धान्यादी मालाचे एकूण देयकांची रक्कम रूपये 7,03,98,105/- चे 3 टक्के सुरक्षा अनामत रूपये 21,11,943/- कपात केलेले नाही.

4) करारनामातील अट क्रमांक 25 नुसार शालेय पोषण आहार पुरवठ्याबाबत काही तक्रार असल्यास देयकाचे 10 टक्के रक्कम राखून ठेवावयाची असतांना पुरवठादाराने निकृष्ठ दर्जाचा माल पूरवठा न केलेबाबत सबंधीत शाळांचे प्रमाणपत्र प्राप्त न करता देयकाचे पूर्णता 100 टक्के रूपये 7,03,98,105/- अदा केलेले आहेत.

5) पाककृती प्रमाणे तांदूळ व धान्यादी मालाची मागणी शाळानिहाय केंद्रप्रमूख आणि तालूकानिहाय गट शिक्षणाधिकारी यांनी केल्याचे मागणी पत्रे / अभिलेखे इत्यादी अर्धसमास पत्र क्रमांक 21, दिनांक 26/10/2017 नुसार मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामूळे प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक शापोआ/ता.मा./2016/307/4514, दिनांक 31/08/2016 नुसार विहित वेळापत्रकाचे पालन केल्याचे तसेच सबंधीत शाळांची मागणी किती होती व त्याप्रमाणात प्रमाणात तांदूळ व धान्यादी मालाचा पूरवठा विहित मुदतीतच झालेबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

6) पुरवठाधारक श्री.हरी राईस अॅड अॅग्रो लिमिटेड, गोंदिया यांनी विहित प्रमाणात साहित्य पूरवठा केलेबाबत सबंधीत शाळांचे पिवळ्या रंगाची पोहच पावती मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामूळे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्र.क्र.18/प्राशि 4, दिनांक 02/02/2011 चे सोबत जोडलेल्या परीशिष्ट अ चे पाककृती प्रमाणे पटसंख्येनिहाय सबंधीत शाळांना तांदूळ व धान्यादी माल प्राप्त झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 09 नुसार तांदळाचा पूरवठा हा भारतीय अन्न महामंडळाकडून उचल केल्यानंतर त्याचे सिल न तोडता जसेच्या तसे पोहच केलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र तसेच अट क्रमांक 10 नुसार भारतिय अन्न महामंडळाच्या गोडावून मधून तांदूळ उचल करतांना भारतिय अन्न महामंडळाचे अधिकारी,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), आणि पूरवठादार यांनी सयुक्तपणे नमूने घेतलेबाबतचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

8) पुरवठाधारकाकडून घेतलेल्या बॅक गॅरंटीबाबतचे प्रमाणपत्र / अभिलेखे मागणी करूनही लेखापरीक्षणास सादर न केल्यामूळे करारनामातील अट क्रमांक 29 नुसार तांदूळ हाताळणूकीसाठी रूपये 25,00,000/- चे सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेकडून बॅक गॅरंटीचे स्वरूपात अट क्रमांक 30 नुसार 18 महिण्याकरीता प्राप्त केल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

9) करारनामातील अट क्रमांक 38 नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी पूरवठादाराचे धान्य गोदामाची तीन महिण्यातून एकदा तपासणी केल्याचे आढळून आले नाही.

10) प्रविण प्राथमिक शाळा घानोड / आमगाव (बु) यांनी शालेय पोषण आहार मिळणेबाबत दिनांक 29/06/2016 रोजी अर्ज केले असून सबंधीत शाळेला शालेय पोषण आहार पूरवठा केले किंवा कसे ? याबाबत अभिलेखे अभावी लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

11) शालेय पोषण आहाराची प्रभावी अंमलबजावणी होण्याचे दृष्टिने जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय समीती गठीत केलेबाबत समिती सदस्यांची नावे आणि सदर समितीने घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त वारंवार मौखीक व अर्धसमास पत्र क्रमांक 21, दिनांक 26/10/2017 नुसार मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

12) जिल्हास्तरावर भरारी पथक स्थापित केलेबाबत आणि परिच्छेद क्रमांक 05 नुसार दरमहा किमान 10 शाळांचे तपासणी केलेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

13) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.488/ प्राशि-4, दिनांक 14/06/2013 नुसार इयत्ता 1 ली ते 5 वी ला Other Helth Intervation जसे मायक्रोन्यूट्रीयंट सप्लीमेंटेशन आय.एफ.ए. सिरप, Enteral Feed poweder, मल्टी मायक्रोन्यूट्रीयंट फॉरम्यूलेशन स्प्रिंकल इत्यादी पूरवठा केलेले नाही.

14) शालेय पोषण आहार अंतर्गत मुलांना भोजन दिल्यामुळे त्यांचे उंची / वजनामध्ये (शरीरयष्टी), बौध्दिक क्षमतेत व शाळेतील उपस्थितीवर काय परिणाम झाला याचे सकारात्मक फायदे काय झाले याबाबतचा फलश्रुती अहवाल प्राप्त केल्याचे संचिकेवरून दिसून आले नाही.

**3.113 जिल्हा परीषदेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना डिजीटल क्लासरूम करीता ऑल इन वन प्रोजेक्टर खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदर बाबत रक्कम रूपये 45,75,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागीय व राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित केलेली नाही.

2) रूपये 3,700/- चे मुद्रांक शूल्काचे स्टॅम्प पेपरवर करारनामा करने आवश्यक असतांना रूपये 100/- वर केल्यामूळे रूपये 3,600/- चे शासन महसूलाची हानी झालेली आहे.

3) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती भंडारा यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक जिनिस/भं/का-6/आस्थाविका/प्रमा-निवि/2015-16/स.नो.क्र.76/175, दिनांक 03/02/2016 मधील अट क्रमांक 01 नुसार डिजीटल क्लॉसरूम करीता ऑल इन वन प्राजेक्टर प्राप्त झालेबाबत सबंधीत शाळांचे / शैक्षणिक संस्थांचे जडसंग्रह नोंदवहीत नोंद घेतलेबाबबत पानांची छायांकीत प्रत नस्तीसोबत दिसून आली नाही. त्यामूळे सबंधीत शाळांना / शैक्षणिक संस्थांना सदर साहित्य प्राप्त झालेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4) प्रमाणकासोबत जोडलेल्या delevary cum installation report वर शाळांना पूरविलेले साहित्यांचे कंपनीचे नाव, साहित्यांचे अनुक्रमांक, आणि त्यांचे specification नमूद नाही. तसेच सबंधीत शाळांचे दिनांकीत स्वाक्षरी नमूद नाही. त्यामूळे ई-निविदा सूचना 01/2016 मधील विवरणानुसारच आय.एस.आय. प्रमाणित ऑल इन वन प्रोजेक्टरचा विहित मूदतीत पूरवठा झालेबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

5) साहित्य खरेदीसाठी नियुक्त जिल्हास्तरीय समिती सदस्यांची नावे व सदर समितीने सदर खरेदीसाठी मान्यता दिल्याबाबतचे ठराव/इतिवृत्त इत्यादी अर्धसमास पत्र क्रमांक 22, दिनांक 31/10/2017 नुसार मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाहीत. तसेच निविदा उघडलेबाबतचे प्रपत्रावर सबंधीतांची स्वाक्षरी नाही.

6) निविदादारांनी cover 1 मध्ये सादर केलेली अ.क्र. 1 ते 14 मधील अभिलेखे नस्तीसोबत जोडल्याचे दिसून आले नाही. करीता सदर निविदादार पात्र असलेबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

7) software specification नुसार 3 वर्षापर्यंत मोफत update करावयाचे असून ई-निविदा सूचना 01/2016 मधील अट क्र. 1 नुसार बॅक गॅरंटी 1 वर्षासाठीच मागीतल्याचे दिसून येते. तसेच पूरवठाधारकाने सादर केलेले बॅक गॅरंटीचे प्रमाणपत्र मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) निविदादारांनी सादर केलेले निविदा नस्तीसोबत जोडलेले नसल्यामूळे सबंधीतांनी कोणकोणत्या कंपनीचे साहित्याचे दर सादर केले. सदर कंपनी ISI कडून प्रमाणित आहे किंवा कसे आणि समितीने मंजूर केलेले कंपनीचे नाव इत्यादी नमूद नसल्यामूळे पूरवठादाराने मंजूर केलेल्या कंपनीचेच साहित्यांचा पूरवठा केलेबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

9) सदर खरेदी साहित्याचे राज्य व केंद्र स्तरावर शासनाचे दरकरार उपलब्ध नसलेबाबत खरेदी समितीचे प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध नसून निविदामधील न्युनतम दर बाजार भावाशी सुसंगत असलेबाबत खरेदीसमितीने प्रमाणीत केलेले नाही.

10) सॅम्पलची तपासणीकरीता टिपणी पृष्ट क्रमांक 7 वरील जिल्हाधिकारी भंडारा यांचे अभिप्रायानुसार 1.DIO, 2. ITI (Profesar/lecturer)] 3. Govt engineering collage (computer scince lecturer, 4. Any hardware siecialist यांची समिती गठीत केलेली नाही.

11) टिपणी पृष्ट क्रमांक 06 वरील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक 27/06/2016 चे अभिप्रायानुसार निविदादारांचे साहित्यांचे नमूने (sampal) तपासणी करून पात्र व शिफारस केलेल्या निविदादारांचेच वित्तीय निविदा उघडणेबाबत नमूद केले असून निविदादारांनी sampal सादर केलेबाबतचे पत्र (आवक क्रमांकासह) अर्धसमास पत्र क्रमांक 22, दिनांक 31/10/2017 नुसार मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच मधुकरराव पांडव अभियांत्रिकी महाविदयालय, भिलेवाडा यांचे आस्थापणेवरील प्रोफेसर (श्री. झाडे) यांनी दिनांक 26/07/2016 रोजी नमूण्यांचे स्पेसीफीकेशन वेबसाईट वरून ऑनलाईन तपासल्याचे नमूद केले असून प्रत्यक्षात नमूने प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

12) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थाविका 2011/प्र.क्र.47/का.1482, दिनांक 13/09/2011 मधील परिच्छेद क्रमांक 7(4) नुसार डिजीटल क्लॉसरूमचे साहित्यांचे देखभाल व दुरूस्तीबाबत परिशिष्ट 4 मधील विहित नमुण्यातील हमीपत्र न घेता सदर कामांना मंजूरी दिलेली आहे.

13) डिलेव्हीरी कम इन्सटॉलेशन अहवालावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक 1 दिघोरी / मोठी ला सॉफ्टवेअर पुरविल्याचे दिसून येत नाही.

14) सदर शैक्षणिक सॉफ्टवेअरचे माध्यमाने शिक्षण देण्यात येत असून त्याबातचा विदयार्थ्यांचा प्रतीसाद याबाबत सबंधीतांचा फलनिष्फती अहवाल प्राप्त केलेले नाही.

**3.114 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत एकूण रूपये 3,24,13,266/- खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादार - दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझुमर फेडरेशन, मुंबई यांचे धान्यादी मालाचे छापील INVOICE विभागाला सादर न करता कॉम्पुटराईज बीजक तयार करून तालुकानिहाय देयक विभागाला सादर केलेला आहे व सदर देयकाच्या पाठीमागील भागावर सर्व पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी यांनी कॉम्पुटराईज प्रमाणपत्राव्दारे “ प्रमाणित करण्यात येते की, शालेय पोषण आहार योजना अंतर्गत धान्यादी मालाचा पुरवठा शालेय

स्तरापर्यंत चांगल्या वजनाचा व चांगल्या दर्जाचा सीलबंद पुरवठादाराने पुरवठा केलेला आहे व पुरवठा केलेल्या धान्यादी मालाची कोणतीही तक्रार नाही. " अशा प्रकारे प्रमाणपत्र सर्व पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी यांनी देयकाच्या पाठीमागे कॉम्पुटराईज प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे प्रत्यक्षात मुळ देयक सादर केलेली नसतांना रक्कमेचे प्रदान झालेले आहे.

2) शाळेला धान्यादी माल पुरवठा केल्याचे डिलेव्हरी चलानमध्ये जिल्हा गोंदिया असे नमुद आहे. तेव्हा पुरवठादाराने कोणत्या गोडावूनमधून कोणत्या तारखेला धान्यादी माल उचल केला, याचा तपशिल देयकात नमुद नाही. याबाबत विभागाला अर्धसमास पत्राव्दारे विचारणा केली असता कोणतेही उत्तर / खुलासा प्राप्त झालेला नाही.

3) शालेय पोषण आहार धान्यादी मालाची पोच पावती डिलेव्हरी चालान 471, दिनांक 12/07/2016 अन्वये जनता हायस्कुल चुटीया ता. जि. गोंदिया येथील मुख्याध्यापक यांचा पुरवठा अधिकारी महाराष्ट्र स्टेट को ऑप. कंझुमर फेडरेशन मुंबई अपना भंडार नागपुरमार्फत पुरवठा विभाग गोंदीया यांना दिनांक 11/06/2016 च्या पत्राव्दारे वाटाणा जुलै 2016 महिण्याच्या धान्यादी माल वाटाणा उपलब्ध असल्यामुळे 65 किलो वाटाणा परत करण्यात येत आहे, असे पत्रात नमुद आहे. तेव्हा धान्यादी मालाचा पुरवठा दिनांक व मुख्याध्यापक वाटाणा परत करण्याबाबतचा पत्राचा दिनांक पाहता धान्यादी मालाची मागणी नसतांना त्याबाबत पुरवठा करणेसाठी वाहतुक करणे व त्या नंतर संबंधित शाळेने वाटाणा परत करणे ही बाब गंभीर आहे. याबाबत संयुक्तीक खुलासा होणे आवश्यक आहे.

4) शाळेने धान्यादी माल त्यांचेकडे त्या मालाचा साठा उपलब्ध असल्याने ते परत केलेला आहे. अर्थात विभागाने संबंधीत शाळेची मागणी नसतांना धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात आला किंवा विभागाने पंचायत समिती स्तरावरील संबंधीताकडून पटसंख्या विषयक माहिती व धान्यादी मालाचा साठा उपलब्धते बाबतची माहिती प्राप्त न करताच पुरवठा केलेला आहे. सदरील पंचायत समीती स्तरावरील संबंधीत शाळेने उचल न केलेली एकूण धान्यादी मालाची किंमत रूपये 4,52,566/- आहे.

5) करारनाम्यातील अट क्रमांक - 25 नुसार धान्यादी मालाच्या देयकातील प्रथम 90 टक्के रक्कम प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल समाधान कारक प्राप्त झाल्यानंतरच अदा करतील व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठ्यासंदर्भात काही तक्रारी असल्यास उर्वरीत 10 टक्के रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने अदा करण्यात येतील असे असतांना 100 टक्के रक्कमेचे प्रदान उपरोक्त प्रमाणकान्वये केल्याचे दिसुन आले. त्यामुळे करारनाम्यातील अटीचे उल्लंघन करून नियमबाहय 100 टक्के संबंधीतास प्रदान केलेला आहे. त्यामुळे पुरवठादार तक्रारीबाबत बंधनकारक राहीलेला नाही.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 28 नुसार देयकातुन उद्गम कर कपात (Tax deduction at Source) कपात करून पुरवठाधारकाचे वॅट टिन नंबर व इनकम टॅक्स पॅन नंबर नुसार भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे झालेल्या शासन महसुलाचे नुकसानी बाबत परिगणना करून भरणा करणे आवश्यक आहे.

7) करारनाम्यातील अट क्रमांक 8 नुसार पुरवठा आदेश मिळाल्यापासुन जास्तीत जास्त 20 दिवसाचे शालेय कामकाजाचे दिवस धरून पुरवठा करणे बंधनकारक असताना माहे जुन ते जुलै 2016 या महिण्यातील धान्यादी मालाचा पुरवठा करणे बाबत शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा गोंदीया यांचे पुरवठा आदेश क्रमांक जिपगो/शिविप्रा/शापोआ/1562/2016, दिनांक 27/06/2016 प्रमाणे देण्यात आला. प्रत्यक्ष पुरवठा हा उपरोक्त अटीप्रमाणे करण्यात आल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक 20 नुसार उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5 टक्के प्रति आठवडा प्रमाणे दंड किंवा कमीत कमी रूपये 10,000/- दंड करणे जरुरीचे आहे.

8) अनुदान मागणी योग्य नियोजन न करता अनुदान मागविण्यात आल्याने सन 2016-17 अखेर रुपये 90,66,398/- इतका निधी अखर्चीत असल्याचे दिसुन आले. प्राप्त अनुदान त्याच वर्षात खर्च न करता अखर्चीत ठेवणे म्हणजेच योजनेवर वेळापत्रक न करताच व्यवहार करणे हे स्पष्ट होते.

**3.115 कार्यालयीन झेराक्स पेपर व साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** कार्यालयीन झेराक्स पेपर व साहित्य खरेदीवर रक्कम रूपये 38,759/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त देयकाची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक 4288 मधील उपप्रमानक क्रमांक 6460 हे दोनदा दर्शवून रुपये 1,450/- चे जादा प्रदान केले आहे. तसेच प्रमाणक क्रमांक 4289 अन्वये दुकानदाराचे सुरवातीचे बिजाकानुसार आधि प्रदान करून त्यापुढील दिनांकाचे बीजक रुपये 4,700/- चे प्रदान नंतर केलेले आहे. सदर देयक जादा प्रदान करण्याचे दृष्टीने जोडले असल्याने लेखामान्य करता येत नाही.

2) उपरोक्त साहित्य खरेदीबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8, दिनांक 23/11/2017 अन्वये अभिलेख्याची मागणी केली असता उत्तर देण्यात आले नाही. व साहित्य खरेदी नस्ती, साठा पुस्तक उपलब्ध न केल्याने केलेली खरेदी प्रत्यक्ष झाल्याचे स्पष्ट होत नाही.

**3.116 जिल्हा परिषद शाळेतील वर्ग 2 ते 4 मधील अनुसुचित जाती, जमाती, वि.भ. व इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना नोटबुक पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** प्रमाणक क्रमांक 485 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 4,80,700/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) इयत्ता 2 ते 4 मधील अनुसुचित जाती, जमाती, वि.भ. व इतर मागासवर्ग विदयार्थ्यांना नोटबुक पुरविणेबाबतचा मागणी प्रस्ताव वरोरा, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, मूल, राजूरा, कोरपना, बल्लारपूर गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडून आलेला दिसून येत नाही. तसेच इतर पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी यांचेकडून इयत्ता 2 री, 3 री, 4 थी च्या विदयार्थ्यांसाठी नोटबूकची मागणी असतांना फक्त बल्लारपूर, गोंडपिपरी, मूल, पोंभूर्णा, जिवती पंचायत समीतीना 3 री व 4 थी च्या विदयार्थ्यांना नोटबुक पुरविण्यात आले व राजूरा, कोरपना, नागभिड, भद्रावती, चंद्रपूर, चिमूर, सावली, सिंदेवाही, वरोरा, ब्रम्हपूरी पंचायत समितीना 4 थी च्या विदयार्थ्यांना नोटबुक पुरविण्यात आले. मंजूर तरतूद रूपये 17,00,000/- असतांना इयत्ता 2रीच्या विदयार्थ्यांना नोटबुक पुरविण्यात आले नाही. त्यांमुळे सर्व पंचायत समितीचे इयत्ता 2 रीचे विदयार्थी नोटबूकपासून वंचित राहीले.

2) करारनामा दिनांकीत नाही. ई- निवीदेतील अट क्रमांक 30 व करारनाम्यातील अट क्रमांक 3 व 4 नूसार पुरवठा आदेशापासून 45 दिवसात नोटबुक पुरवठा करणे आवश्यक असताना डिलीव्हरी मेमो वरून सर्व पंचायत समितीला दिनांक 25/03/2017 ते 30/03/2017 च्या दरम्यान पुरवठा केल्याने दंडाची रक्कम रूपये 12,017/- वसूलपात्र ठरते.

3) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांना दिनांक 29/03/2017 ला लिहीलेल्या पत्रानूसार मे. वर्धमान मार्केटींग, चंद्रपूर यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील 15 पंचायत समितीला पुरवठा करण्यात आलेल्या नोटबुकमधून प्रत्येकी एक याप्रमाणे एकुण 15 नोटबुक पुरवठा आदेशातील निकषानुसार व नमुन्याचे दर्जानुसार आहेत किंवा नाहीत, याकरीता तपासणीकरीता दिले. त्याच तारखेत म्हणजेच दिनांक 29/03/2017 ला व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/2017, दिनांक 29/03/2017 अन्वये नोटबुक तपासणी करुन नोटबुकच्या प्रत्येक पानावर सुविचार नाही, असे कळविले असतांना पुरवठादाराकडून दंड वसूल करणे अपेक्षित असतांना दंड वसूल केला नाही. तसेच ही सर्व प्रक्रिया एकाच दिवशी शक्य नाही.

4) सर्व गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेकडून उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही. तसेच इयत्ता 3 ते 4 मधील विदयार्थ्यांना नोटबुकचा पुरवठा डीलीव्हरी मेमोवरून दिनांक 30/03/2017 नंतर झाल्याने सन 2016-2017 मध्ये विदयार्थ्यांना नोटबुकचा लाभ झाला नसल्याने योजनेचा विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढविणेचा उददेश सफल झाला नाही.

5) साठा नोंदवही पान क्रमांक 31 वर प्राप्त दिनांक नमूद नाही. तसेच साठा नोंदवहीवर पंचायत समितीला नोटबुकचे वाटप दर्शविले असून प्राप्त कर्त्यांची दिनांकीत स्वाक्षरी नमूद नाही.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -1010/प्र.क्र.68/कोषाप्र.5, दिनांक 18/04/2011 नूसार प्रदाने फक्त ईसीएस / एनईएफटी प्रणालीदवारे करणे आवश्यक असतांना धनादेशाद्वारे प्रदाने करून शासन निर्णयाचे पालन करण्यात आलेले नाही.

**3.117 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत रक्कम रूपये 3,42,49,085/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2015/प्र.क्र.177/एस डि-3, दिनांक 09/03/2016 चे नियम क्रमांक (3) नूसार ग्रामीण भागात वर्ग 6 ते 8 (उच्च प्राथमिक) साठी धान्यादी माल पुरविण्यासाठीचा खर्च प्रती लाभार्थी रूपये 3.85/- प्रमाणे करणे आवश्यक असतांना शिक्षण विभागाने रूपये 3.86/- प्रमाणे केल्याने पुरवठादारास जादा रक्कम प्रदान झाली. सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

2) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पुरवठया संदर्भात शाळांना पुर्वसूचना देऊन व पुरवठा नियोजन/ वेळापत्रक करणेबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक 2201, दिनांक 26/05/2015 नूसार सूचना क्रमांक 1 ते 10 चे तंतोतंत पालन केलेले नाही. त्यामुळे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन 2015-2016 चा केंद्र हिस्सा रूपये 2,18,77,711/- व राज्य हिस्सा रूपये 2,44,19,382/- अखर्चीत होता. त्यानंतर प्राप्त अनुदान मागणीप्रमाणे योग्य नियोजन करून मागणी न करता मागविण्यात आल्याने सन 2016-2017 अखेर सुध्दा एकूण रूपये 5,46,04,562/- इतका निधी अखर्चीत असल्याचे दिसून आले. प्राप्त अनुदान त्याच वर्षात खर्च न करता अखर्चीत ठेवणे म्हणजेच विभागाचे योजनेवर वेळापत्रकाचे पालन केले नाही, हे स्पष्ट होते.

3) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे पुरवठा आदेशानूसार प्रत्यक्ष पुरवठा हा उपरोक्त अटीप्रमाणे करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामूळे करारनाम्यातील अट क्रमांक 20 नुसार उशीरा पुरवठा झालेल्या मालाच्या किमंतीनूसार दंडाची परीगणणा करून पुरवठादाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

4) करारनाम्यातील अट क्रमांक 39 नूसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी किमान तीन महिन्यातून एकदा पुरवठादाराचे गोदामांना भेट देवून तपासणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचा तपासणी अहवाल नस्तीमध्ये उपलब्ध नसून तो लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -1010/प्र.क्र.68/कोषाप्र.5, दिनांक 18/04/2011 नूसार प्रदाने फक्त ईसीएस / एनईएफटी प्रणालीद्वारे करणे आवश्यक असतांना धनादेशाद्वारे प्रदाने करून शासन निर्णयाचे पालन करण्यात आलेले नाही.

**3.118 मॉडेल स्कुल अंतर्गत भौतिक व शैक्षणिक सुविधा पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** प्रमाणक क्रमांक 137 दिनांक 23/01/2017 अन्वये रक्कम रूपये 31,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, चंद्रपूर, भद्रावती, वरोरा, नागभिड, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, सावली, गोंडपिपरी, कोरपना, बल्लारपूर अंतर्गत शाळांना मॉडेल स्कूल निधी वाटप केला आहे. त्या शाळेचे प्रस्ताव तपासले असता ग्रामीण भागातील गुणवत्ता कार्यक्रम अंतर्गत शाळांची अ किंवा ब श्रेणी प्राप्त शाळा असावी व सन 2016-2017 मध्ये लोकसहभाग निधी उपलब्धतेबाबत अपेक्षित उददीष्टये नमूद करणे आवश्यक असतांना प्रस्तावासोबत वरीलप्रमाणे माहीती सादर करण्यात आली नाही.

2) पंचायत समिती, चिमूर - मेटेपार, सावली बिडकर ; पंचायत समिती, पोंभूर्णा - चेकठाणेवासणा, जूनगाव, फुटाणा, घाटकुळ ; पंचायत समिती, सिंदेवाही - नलेश्वर ; पंचायत समिती मूल - चितेगाव, चिखली ; पंचायत समिती, राजूरा - कोहपरा ; पंचायत समिती, जिवती - राहपल्ली खुर्द अंतर्गत शाळांना मॉडेल स्कूल निधी देण्यात आले. परंतू, सदर शाळेचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) प्रशासकीय मंजूरी आदेशावर आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही.

4) पंचायत समिती, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, सावली, अंतर्गत शाळांना मॉडेल स्कूल निधी वाटप केला आहे. त्या शाळेचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच पंचायत समिती मूल, नागभिड, जिवती, पोंभूर्णा - घाटकूळ अंतर्गत शाळेचे सन 2016-2017 मध्ये निधी अखर्चित असल्यामूळे जिल्हा परीषदेचे त्यांच्या अंतर्गत शाळांना मॉडेल स्कूल तयार करण्याचे उददीष्ट सन 2016-2017 मध्ये पूर्ण होऊ शकले नाही.

5) सन 2013-2014 ला 10 लक्ष, सन 2014-2015 ला 15 लक्ष, सन 2015-2016 ला 15 लक्ष व सन 2016-2017 ला 31 लक्ष मॉडेल स्कूलसाठी खर्च करण्यात आले. जिल्हा परीषदेने मॉडेल स्कुल निधी वितरण कंट्रोल नोंदवही न ठेवल्याने एकाच शाळेवर दुबार खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.119 बालचेतना माहितीपुस्तक छपाईबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** प्रमाणक क्रमांक 573 दिनांक 31/3/2017 अन्वये रक्कम रूपये 240000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 अन्वये सदर बालचेतना माहितीपुस्तक छपाईला प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही. तसेच पुरवठा आदेशापुर्वी पूरवठादारासोबत मुद्रांकीत करारनामा करणे आवश्यक असतांना मुद्रांकीत करारनामा केला नाही.

2) पंचायत समितीच्या शिक्षण विभागाला त्यांच्या अंतर्गत प्राथमिक शाळांना किती माहिती पुस्तिका उपलब्ध करायच्या आहेत. याबाबत सर्व पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून मागणी प्रस्ताव घेण्यात आला नाही. तसेच पुरवठा आदेश दिनांक 11/11/2016 चा असतांना माहिती पुस्तक 2000 नग वाटप ऑक्टोंबर महिन्यात साठा पंजीला दर्शविण्यात आले.

3) मे. अंबिका प्रिंटर्स चंद्रपूर मे. रेणूका कार्ड कलेक्शन, चंद्रपूर व जय अंम्बे प्रिंटर्स चंद्रपूर यांचे दरपत्रक विभागाला केव्हा प्राप्त झाले? याबाबत लिफाफयावर आवक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

4) पुरवठा आदेशानूसारच माहिती पुस्तकाची छपाई (पुस्तकाचा साईज, मुख्य पृष्ठ 250 जी.एस.एम, व आतील चार पाने मल्टीकलर व 42 पेजेस एका रंगात) केल्याबाबत शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याकडून माहिती पुस्तकाची चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

5) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -1010/प्र.क्र.68/कोषाप्र.5, दिनांक 18/04/2011 नूसार प्रदाने फक्त ईसीएस / एनईएफटी प्रणालीदवारे करणे आवश्यक असतांना धनादेशादवारे प्रदाने करून शासन निर्णयाचे पालन करण्यात आलेले नाही.

**3.120 शालेय पोषण आहाराअंतर्गत लॅपटॉप खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** शालेय पोषण आहाराअंतर्गत लॅपटॉप खरेदीकरिता रक्कम रूपये 38,74,400/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लॅपटॉप खरेदी करताना पंचायत समितींकडून लॅपटॉप मिळणेबाबत कोणतेही मागणीपत्र शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी प्राप्त केलेली नाही.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे आदेश क्रमांक जिपग/शापोआ/23/2017, दिनांक 03/03/2017 अन्वये 116 Lenovo Laptop पुरवठा आदेश देण्यात आला. मात्र पुरवठा आदेशानुसार वाटप करावयाच्या व प्रत्यक्षात वाटप केलेल्या लॅपटॉपच्या संख्येत तफावत आहे.

3) उपरोक्तपणे गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, चामोर्शी (15 नग), मुलचेरा (5 नग), अहेरी (13 नग), एटापल्ली (12 नग) या ठिकाणच्या पुरवठा चलानची पडताळणी केली असता डिलेवरी चलान क्रमांक 128 च्या छायाप्रतीवर खोडाखोड करुन चलान क्रमांक 128, 129, 130 व 138 अशा चलान तयार करण्यात आल्या. सदर पुरवठ्याबाबत मुळ डिलेवरी चलान लेखापरिक्षणादरम्यान आढळून आलेल्या नाही अशाप्रकारे एकूण 45 लॅपटॉप प्रत्यक्ष प्राप्त न करता डिलेवरी चलानवर खोडाखाड करुन देयकाची रक्कम उचल करण्यात आली. त्यामुळे सदर 45 लॅपटॉपची रक्कम रुपये 15,03,000/- लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही.

4) शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचे पत्र क्रमांक शापोआ/2016-17/तरतूद/प्राशिस-301/2033, दिनांक 30/03/2016 नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व मुख्य लेखा व वित्त आधिकारी यांनी आवश्यकतेनुसार कोषागारातून रक्कम काढण्याचे निर्देश आहे. लॅपटॉप खरेदीसाठी रुपये 38,74,400/- ची आवश्यकता असताना प्राप्त अनुदान रक्कम रुपये 59,68,200/- संपूर्ण कोषागारातून आहरीत करण्यात आली.

5) साठा नोंदवहीत लॅपटॉप वाटप केल्याचा दिनांक, वाटप करणा-या व प्राप्त करणा-या अधिका-यांची स्वाक्षरी नाही.

6) खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही.

## 3.121 सन 2015-2016 या वर्षातील सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेची तरतूद खर्च न करण्याबाबत.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे सन 2015-2016 या वर्षातील सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठी रक्कम रूपये 4,55,33,500/- तरतूद वाटपासाठी प्राप्त झालेली असून ती वाटप करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र.20/का.2, दिनांक 31/05/2010 मधील मुद्दा क्रमांक 4(8) नुसार प्राप्त सर्व प्रस्तावांवर दरवर्षी ऑगस्ट अखेरपर्यंत छाननी व मंजूरीची कार्यवाही पूर्ण करुन 31 मार्च अखेरपर्यंत शिष्यवृत्तीची देय रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आईवडिलांच्या बँक खात्यावर तीन हप्त्यात जमा करणे आवश्यक आहे. सन 2015-2016 या वर्षातील सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेसाठीच्या तरतूदीतून मार्च, 2016 अखेर पर्यंत शिष्यवृत्तीचे वाटप होणे आवश्यक असताना मार्च, 2017 अखेरही सन 2015-2016 या वर्षातील शिष्यवृत्ती वाटप पुर्ण झालेले नाही. शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी लेखापिरक्षणाच्या वेळी सादर केलेल्या विवरणपत्रानुसार शिल्लक रकम रुपये 1,86,61,000/- चे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती मंजूर यादीचे प्रस्ताव अजूनही अप्राप्त आहे

2) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली व अहेरी यांनी वाटप केलेल्या रुपये 2,68,72,500/- शिष्यवृत्तीपैकी रुपये 18,70,000/- एवढी रक्कम विद्यार्थ्यांचे खाते क्रमांक चुकलेले असल्याने शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचेकडे विनावाटप पडून आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे चुकलेले खाते क्रमांक दुरुस्ती करुन त्यांना शिष्यवृत्ती वाटपाबाबत कोणतीही कार्यवाही शिक्षण विभागाकडून केली असल्याचे लेखापरिक्षाणादरम्यान आढळून आलेले नाही. यावरून सदर योजनेबाबत शिक्षण विभाग गंभीर नसल्याचे निदर्शनास येते.

3) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र.20/का.2, दिनांक 31/05/2010 मधील मुद्दा क्रमांक 4(10) नुसार शिक्षण विस्तार अधिकारी/उप शिक्षणाधिकारी यांचेकडून शाळांना भेटी देवून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली किंवा कसे, याची पहाणी करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पत्र क्रमांक क्रमांक शिष्यवृ-2016/प्र.क्र.78/का12, दिनांक 11/03/2016 नुसार सन 2015-2016 या वर्षातील सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेची रक्कम विद्यार्थ्यांच्या/ त्यांच्या पालकांच्या बँक खात्यात जमा झाल्याची खात्री करुन खर्च रकमेचा प्रकल्प निहाय अहवाल जुन, 2016 अखेर पर्यंत शासनास सादर करण्याचे निर्देश असताना कार्वाही करुन अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

5) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविशि-2009/प्र.क्र.20/का.2, दिनांक 31/05/2010 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार शिष्यवृत्ती अदा करताना विलंब होण्यास जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांचेवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.122 इयत्ता 8 ते 12वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून 5 कि.मी. अंतरापर्यंत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलचे वाटप करणे बाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदर बाबत रक्कम रूपये 1,37,07,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक मा.वि.का. -2012/ प्र.क्र.99/का.1418, दिनांक 03/12/2013 मुद्दा क्रमांक 7 अन्वये सायकल ची खरेदी करताना पुरवठा धारक/ दुकानदाराने TIN NO असलेल्या पावत्या / बिले दिल्याशिवाय बिल स्वीकारू नये, असे असताना संबधित लाभार्थी मुली यांनी सायकल खरेदी करून बिले सादर करणे आवश्यक असताना सदर पावत्या / बिले लेखा तपासणीत उपलब्ध झाले नाही.

2) लाभार्थी मुली यांचेकडून मुख्याध्यापक यांचे मार्फत सायकल खरेदी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून व सादर करणे आवश्यक असताना उपयोगिता प्रमाणपत्र लेखा तपासणीत उपलब्ध झाले नाही.

**3.123 सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यामिक शिष्यवृत्ती योजना बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 1) -** सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यामिक शिष्यवृत्ती योजनेवर रक्कम रूपये 2,08,22,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रक्कम रुपये 2,08,22,500/- जिल्हा परिषदेस सन 2015-16 ची शिष्यवृत्ती इयत्ता 1 ली ते 10 वी च्या विध्यार्थ्यांना वाटपासाठी प्राप्त झाले आहे. यापैकी रुपये 1,72,88,500/- जिल्हा परिषदेने वाटप केलेले आहे व रुपये 35,34,000/- जिल्हा परिषदेकडे शिल्ल्क आहे. शिष्यवृत्ती वाटपाकरीता रक्कम प्राप्त झाली असतांना असंवितरीत राहणे ही बाब गंभीर असुन लाभधारकास लाभापासुन वंचीत ठेवणारी आहे यावर उचित कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

2) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद यांनी सन 2015-16 चा निधी माहे 3/2016 मध्ये निधी वितरीत केला. परंतु प्रत्यक्षात विध्यार्थ्यांना सन 2017-18 मध्ये त्याचा लाभ दिला आहे. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आदिवि-2009/प्र.क्र.20/का-12, दिनांक 31/05/2010 व शासन शुद्धीपत्रक दिनांक 26/08/2010 च्या 4(8) तसेच आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्रमांक 150 दिनांक 07/01/2017 नुसार शिष्यवृत्ती वाटपाचे वेळापत्रक दिले आहे. सदरील शिष्यवृत्ती तीन हप्त्या मध्ये वाटायची असुन सदरची रक्कम विध्यार्थ्यांच्या किंवा पालकाच्या बॅक खात्यावर रक्कम जमा करावयाची आहे. जिल्हा परिषदेने वेळापत्रक तर पाळलेच नाही शिवाय विध्यार्थ्यांच्या किंवा पालकाच्या बॅक खात्यावर रक्कम जमा न करता पंचायत समितींना वाटप केले आहे. उक्त शासन निर्ण्यातील मुद्दा क्रमांक 7 प्रमाणे विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करणेबाबत नमुद आहे. परंतु, अशा प्रकारची कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

3) जिल्हा परिषदेकडे या योजनाचा शिष्यवृत्ती मिळाल्याच्या पोचपावत्या नाहीत किंवा याचे उपयोगीता प्रमाणपत्र नाहीत जे कि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 77(2) पोच घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष त्या लाभधारकास लाभ मिळाल्याची खात्री पटत नाही. यात अपहार/रक्कम अखर्चीत राहणे/रक्कम इतरत्र खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) प्रकल्प अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली मंजुर यादी पत्र क्रमांक 844, दिनांक 18/03/2017 व जिल्हा परिषदेने प्रत्येक्ष वाटप केलेली तालुकानिहाय रक्कम यात विसंगती आहे. तालुका कन्नडला वाटप करणे एवजी सिल्लोडला वाटप केली आहे. या अनियमिततेस जबाबदारावर योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

5) जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त आधिकारी यांनी दिनांक 11/05/2017 रोजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेस पत्र देवुन रक्कम रुपये 51,03,500/- पैकी रुपये 48,88,000/- वर्ग करुन उर्वरीत रक्कम रुपये 2,15,500/- खाते क्रमांक 004210104000274 जमा ठेवावी असे सांगितले. वास्तविक पहाता पुर्ण रक्कम

संबंधीतास अदा करणे आवशय्क होते. रक्कम रूपये 2,15,500/- कोणत्या तालुक्यातुन कपात केली व का केली ? याबाबची माहिती उपलब्ध झाली नाही व असे करण्याबाबत प्रकल्प आधिकारी यांचे कोणतेही पत्र संचिकेत नाही.

6) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आदिवि-2009/प्र.क्र.20/का-12, दिनांक 31/05/2010 मुद्दा क्रमांक 4(10) प्रमाणे एकही अधिकाऱ्याची तपासणी केल्याचे अभिलेख नाही.

7) विद्यार्थ्याने इतर विभाग/योजनाकडून असा लाभ घेतेला नसल्याचे प्रमाणपत्र नाही.

**3.124 प्राथमिक शाळांना कृतीयुक्त अध्ययन संच पुरविणेबाबत**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** प्राथमिक शाळांना कृतीयुक्त अध्ययन संच खरेदीकरीता रक्कम रूपये 24,90,560/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण हक्क कायदयातील कलम 29(2) नूसार सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापन पध्दतीव्दारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यानूसार दिनांक 20/08/2010 च्या शासन निर्णयानूसार राज्यात इयत्ता 1 ली ते 8 वी साठी सात्यतपूर्ण सर्वकष मुल्यमापन पध्दती लागू केली आहे. त्यानूसार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम/ कृती / प्रकल्प स्वाध्याय तोंडी/ लेखी चाचणी इ. व्दारे विद्यार्थ्यांच्या संपादन गुणांची वेळोवेळी शाळास्तरावर करण्यात येते विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी समजून घेवून त्यांना त्या दूर करण्याचे प्रयत्न या कृतीयुक्त अध्ययनमधून होणार आहे. या व अशाबाबतचे मुल्याकंनाबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळून आले नाहीत. त्यामूळे 25 लक्ष खर्च करुन योजनेचा उद्देश सफल झाल्याची खात्री पटत नाही. तरी आत मुल्यमापन अहवाल सादर करून अनूपालन दर्शवावे.

2) कृतीयुक्त अध्ययन संच जिल्हयातील 43 प्राथमिक शाळांना यांना पुरविण्यात आले आहेत. पुरवठा झालेल्या शाळांचे साठा नोंदवहयाची मागणी करण्यात असता एकाही शाळेने साठा नोंदवहया लेखापरिक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत. त्यामूळे शाळांनी नोंदी घेतल्याबाबत खात्री पटू शकली नाही.

3) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नूसार पुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर करारनामा करण्यात येईल करारनाम्याच्या दिनांकापासून दोन आठवडयात सदरील साहित्य शाळांना पोहचविणे बंधनकारक आहे. परंतू, डिलेव्हरी चालान पोहोच पावतीवर साहित्य कोणत्या शाळेस द्यावयाचे आहे व डिलेव्हरी दिनांक सुध्दा दर्शविलेले नसल्याने विहीत मुदतीत साहित्याचा पुरवठा झाला नसल्याची शक्यता नाकारत येत नाही. तरी आता नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे पुरवठा धारकावर दंडात्मक कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे

4) लोकमंगल प्रिंट एन पॅक लि सोलापूर यांचे डिलेव्हरी चालान / पोहच पावतीवर एजन्सी धारकांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. त्यामुळे पुरवठा करण्यात आलेले साहित्य पुरवठा धारकाकडूनच पुरवठा झाल्याबाबत खात्री पटू शकली नाही.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 10 नूसार पुरवठा करण्यात आलेल्या शाळांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी एजन्सी धारकांची असेल. परंतू, असे प्रशिक्षण दिलेबाबत अभिलेखे संचिकेत आढळून आले नाही.

6) मुंबई मुद्रांक अधिनियम 1956 च्या कलम 34 नूसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपीए 2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये सर्व प्रकारच्या सर्व प्रकारच्या कार्यकरारावर जिल्हा परिषदने शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. रूपये 10 लाखापर्यंत रूपये 100/- मुद्रांक शुल्क दहा लाखावरील प्रत्येक एक लाखावरील भागासाठी रूपये 100/- प्रमाणे रूपये 1,600/- मुद्रांक शुल्कावर कार्यकरार करणे आवश्यक होते. परंतू, कार्यकरार रूपये 200/- चे मुद्रांकावर करण्यात आल्याने रूपये 1,400/- संबंधिताकडून वसूल करुन मुद्रांक शुल्क खाती भरणा करुन अनूपालन दर्शवावे

**3.125 प्राथमिक पदवीधर शिक्षकांना दर्जावाढ देणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** शिक्षण विभागाचे सन 2016-17 चे लेखापरीक्षणा दरम्यान प्राथमिक शिक्षकांना दर्जावाढ देण्यातबाबतचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक पीटीआर/1113(01/2013) एसएम-4, दिनांक 13/12/2013 च्या शासन निर्णयामधील सुचनांनुसार शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडुन शैक्षणिक वर्ष 2013-14 ची ऑनलाईन संचमान्यता प्राप्त झाली होती. सदर संचमान्यतेमध्ये प्राथमिक पदवीधर शिक्षक पदांचे एकूण 1472 पदे मंजुर करण्यात आली होती. वास्तविक पाहता शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक पीआरई-2006/4991/2006/प्राशि-1, दिनांक 11/11/2011 अन्वये एकूण मान्य पदांच्या केवळ 25% पदांना प्राथमिक पदवीधर वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

सन 2013-14 मध्ये एकूण 400 प्राथमिक पदवीधर शिक्षक कार्यरत होते उर्वरित 1072 पदे रिक्त होती. सदर रिक्त पदावर जिल्हा परिषदेचे शिक्षण विभागचे आदेश क्रमांक शिवि/प्रावि 1 अ, दिनांक 27/06/2014 अन्वये एकूण 1072 शिक्षकांना प्राथमिक पदवीधर दर्जावाढ देवुन प्राथमिक पदवीधर पदावरील 9300-34800 ग्रेड वेतन 4300 ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

परंतु सदर प्रकरणी उपसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संकिर्ण 2015/प्रक्र 41/शिकाना/टिएनटी-3, दिनांक 19/01/2016 व शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण संचालनालय), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक प्राशिसं / जादा वेतन वसुली /201/483, दिनांक 25/01/2016 व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक वेतन 1216 / प्रक्रमांक123/16/टीएनटी-3, दिनांक 13/10/2016 मधील शासनाचे सुचना नुसार पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांपैकी 25% शिक्षकांना पदवीधरांसाठी देय असलेली वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. परंतु जिल्हा परिषद बीड अंतर्गत प्राथमिक पदवीधर शिक्षकांना दर्जावाढ देत असतांना सेवा जेष्ठतेनुसार / विषय निहाय शैक्षणिक अहर्ता धारण करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांना दर्जावाढ देणे अभिप्रेत होते, परंतु आंतर जिल्हा बदलीने रुजु झालेले व वस्ती शाळा शिक्षकांमधुन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या अस्थापनेवर प्राथमिक शिक्षक म्हणुन रुजु झालेल्या कनिष्ठ प्राथमिक शिक्षकांना दर्जावाढ दिल्याचे निदर्शनास येते. अशी प्राथमिक पदवीधर दर्जाची वेतनश्रेणी दिलेल्या शिक्षकांना जादाचे वेतन अदा झाले आहे. त्यामुळे सरसकट प्राथमिक पदवीधर शिक्षकांना देण्यात आलेली वेतनश्रेणी रद्द करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकरणी उपसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संकिर्ण 2015/प्रक्र 41 / शिकाना / टिएनटी-3, दिनांक 19/01/2016 व शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण संचालनालय), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक प्राशिसं / जादा वेतन वसुली /201/483, दिनांक 25/01/2016 नुसार सदर वित्तीय अनियमितता ज्या स्तरावर झाली आहे, अशा अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव संचालनालयास सादर करण्याबाबत स्पष्ट सुचना देण्यात आलेली आहे. परंतु अशी कारवाई झालेबाबतचा कोणताही तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही.

**3.126 विशेष घटक योजनेतंर्गत 1ली ते 4 थी शाळेतील आदिवासी क्षेत्रातील तसेच आदिवासी क्षेत्राव्यतिरीक्त राज्यातील अन्य भागातील अनुसुचीत जाती/जमाती व दारिद्र रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता बॅक खात्यावर जमा करणेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात शिक्षण विभागात विशेष घटक योजनेतंर्गत 1 ली ते 4 थी शाळेतील आदिवासी क्षेत्रातील तसेच आदिवासी क्षेत्राव्यतिरीक्त राज्यातील अन्य भागातील अनुसुचीत जाती/जमाती व दारिद्र रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता बॅक खात्यावर जमा करणेसाठी प्रमाणक क्रमांक 668, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 60,00,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक 2016-17/उमअक्र/पि/ड-505/ 260 दिनांक 13/01/2017 अन्वये रूपये 60/- ला निधी परभणी जिल्हयासाठी मंजुर करण्यात आला आहे. सदरचा निधीची रक्कम जिल्हा परिषद शाळेतील विशेष घटक योजनेतंर्गत 1 ली ते 4 थी शाळेतील आदिवासी क्षेत्रातील तसेच आदिवासी क्षेत्राव्यतिरीक्त राज्यातील अन्य भागातील अनुसुचीत जाती / जमाती व दारिद्र रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता बॅक खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. परंतु, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद यांचे खात्यावर जमा केला. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) उक्त आदेशान्वये मुलींचा उपस्थिती भत्ता हा संबंधिती मुलींना ग्राम शिक्षण समितीच्या बैठकीत सदस्यांच्या उपस्थितीत देण्यात यावी व वाटप पत्रावर संबंधित उपस्थित अध्यक्ष / सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात, अशा स्पष्ट सुचना असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी खर्च आदेश क्रमांक 1621 दिनांक 31/03/2017 अन्वये विद्यार्थ्यांचे बॅक खात्यावर उपस्थिती भत्ता वर्ग करणेस मान्यता दिली आहे, वास्तविक पहाता मुली हया इयत्ता 1 ली ते 4 थी मधील असल्यामुळे त्यांचे बॅक खाते उघडलेले आहे किंवा नाही, याची खात्री न करताच अशा प्रकारची मंजुरी दिल्याचे आढळुन येते. शिक्षण संचालनालयाचे स्पष्ट सुचना असतांना देखील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना रक्कम नियमबाहय रक्कम वर्ग केली. त्यामुळे पात्र मुलीं उपस्थिती भत्त्यापासुन वंचित राहिल्या आहेत.

3) शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक 05/08/2017 अन्वये आरटीजीएसद्वारे रूपये 59,99,840/- रक्कम गटविकास अधिकारी यांना वितरीत केली. तसेच काढण्यात आलेली रक्कम रूपये 60/- लक्ष पैकी रूपये 59,99,840/- गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग केल्यामुळे उर्वरीत रूपये 160/- शासन लेख्यात जमा करण्यात यावी.

4) वरीलप्रमाणे मुलींचा उपस्थिती भत्ता हा गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग करायचा होता, तर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी थेट वित्त प्रेषणाद्वारे गटविकास अधिकारी यांना वर्ग करणे आवश्यक होते. परंतु, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना निधी वर्ग करुन नंतर गटविकास अधिकाऱ्यांकडे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांनी निधी वर्ग करण्याचे प्रयोजन काय आहे, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

5) सदर प्रमाणकान्वये दिनांक 31/03/2017 रोजी रक्कम काढण्यात आली असुन दिनांक 05/08/2017 पर्यंत मुलींना वाटप झाली नाही. केवळ मार्च अखेर निधी व्यपगत होऊ नये, म्हणुन निव्वळ खर्च टाकण्यासाठी रक्कम काढण्यात आली आहे.

6) उपरोक्त भत्त्याची रक्कम ही कोणत्या वर्षातील 1 ली ते 4 थी मधील मुलींसाठीची आहे? तसेच कोणत्या शाळेतील किती मुलींसाठीचा उपस्थिती भत्ता आहे, याचा बोध होत नाही.

7) रक्कम हि विलंबाने वाटप होणार असल्यामुळे इयत्ता 4 थी मधील मुली हया 4 थी ची परीक्षा उत्तीर्ण झालेवर इयत्ता 5 वी मध्ये गेल्या असणार. तसेच प्राथमिक शाळा हया 4 थी पर्यतच असल्यास 5 वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी इतर शाळेत मुलींनी प्रवेश घेतला असु शकेल. त्यामुळे अशा मुलींचा उपस्थिती भत्ता कोणांस वाटप केला, किंवा उपस्थिती भत्त्याची रक्कम अखर्चित राहिली, याचा शोध घेऊन अशी अखर्चित रक्कम शासन लेख्यात जमा करण्यात यावी.

### 3.127 जिल्हा परिषद स्वनिधीमधुन जलशुध्दिकरण यंत्र खरेदीतील अनियमित्तितेबाबत

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणीचे सन 2016-2017 लेखापरीक्षणात जिल्हा परिषद स्वनिधीमधुन जलशुध्दिकरण यंत्र खरेदीसाठी रक्कम रुपये 69,96,000/- खरेदी करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद अंतर्गत शाळांना उपरोक्त प्रमाणे जलशुध्दिकरण संच पुरविणेसाठी खरेदीस प्रशासकीय मान्यता घेतल्याबाबतचे आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

2) ई-निविदेद्वारे निविदा उघडण्यात आल्या असुन त्यामध्ये (1) बालाजी इंटरप्रायजेस यांचे रूपये 2,13,000/- (2) स्पेस सोलार शाप यांचे रूपये 2,14,000/- व (3) शांता विद्युत कार्पोरेशन यांचे रूपये 2,15,000/- असे दर दिलेले असुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दर स्विकृत करणेसाठी बैठकीचे आयोजन न करता दिनांक 22/11/2016 दुरध्वनीवरुन बालाजी इंटरप्रायाजेस यांचेशी चर्चा केली व त्यांनी रूपये 2,12,000/- दराने जलशुध्दिकरण यंत्र संच पुरविण्याची तयारी दर्शविली अशी वाटाघाटी करण्याची कार्यपध्दती निविदा मंजुर करतांना नियमाशी सुसंगत नाही.

3) नाविन्यपुर्ण योजनंतर्गत जलशुध्दिकरण यंत्र खरेदी करण्यासाठीची ईनिविदा प्रक्रिया राबवुन कार्यारंभ आदेश क्रमांक 6945 दिनांक 08/12/2016 नुसार जलशुध्दीकरण 500 LPH (RO) रूपये 2,11,000/- प्रती नग दराने एकूण 18 संच खरेदी जिल्हा निधीतुन लेखाशिर्ष 34511848 मधुन बालाजी इंटरप्रायजेस यांचेकडुन करण्यात आले आहेत. जिल्हा परिषद स्वनिधीतुन वेगळ्याने ई-निविदा प्रक्रिया राबवुन जलशुध्दीकरण 500 LPH (RO) रूपये 2,12,000/- प्रतिनग दराने एकूण 33 संच बालाजी इंटरप्रायजेस यांचेकडुनच खरेदी करण्यात आले आहेत. दोन्ही योजनेत ठेकेदार हा एकच असुन जलशुध्दिकरणाचे स्पेशिफिकेशन सुध्दा एकच आहे त्यामुळे प्रती संच रूपये 1,000/- प्रमाणे एकूण 33 संचासाठी रूपये 33,000/- जादा प्रदान करण्यात आले आहेत. रूपये 33,000/- वसुल करुन जिल्हा परिषद स्वनिधीत जमा करावे. तसेच खरेदी प्रक्रिया नियमानुसार न राबविल्याबाबत संबंधितावर शिस्त भंग विषयक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) ज्या गावांतील शाळेत जलशुध्दिकरण संच बसवावयाचे आहे, त्या शाळेसाठी पाण्याचा स्त्रोत काय आहे, याची उपलब्धता घेण्यात आली नाही. तसेच पाणी तपासणी प्रयोगशाळेत पाण्यात असलेले क्षारांचे प्रमाणाबाबत तपासणी करुन घेणे व जेथे टीडीएस क्षारांचे प्रमाण जादा असेल तेथे जलशुध्दीकरण यंत्र बसविणेसाठी शाळांची निवड करणे आवश्यक आहे. तथापि, अशी पाण्याची तपासणी प्रयोगशाळेतुन करुन घेण्यात आली नाही.

5) जलशुध्दिकरण यंत्र खरेदी करणेसाठी स्पेसिफिकेशन निश्चित करणेसाठी दिनांक 18/01/2016 ला बैठकीचे आयोजन केलेले असुन पत्रावर क्रमांक व दिनांक नमुद नाही. तसेच बैठकीचा इतिवृत्तांतवर बैठक दिनांक नाही. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे प्रत्यक्षात बैठक झाली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

6) निविदेतील अटीनुसार ज्या शाळेत जलशुध्दिकरण यंत्र बसवावयाचे आहे, तेथे जलशुध्दिकरण बसविण्यासाठीची जागा, विद्युत पुरवठयाबाबत पाहणी करुन मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र पुरवठादाराने दिलेले नाही. तरीसुध्दा निविदा स्विकारुन मंजुरी देण्यात आली

7) जलशुध्दिकरण यंत्र खरेदी करणेसाठी स्पेशिफिकेशन Govt.College of Engineering, Aurangabad यांचेकडुन घेण्यात आले आहे. परंतु, जलशुध्दिकरण यंत्र खरेदी करणेसाठी स्पेशिफिकेशन व तांत्रिक तपासणी NEERI / GSDA यांचेकडुन घेणे आवश्यक आहे. परंतु, अशी तपासणी करुन घेण्यात आली नाही.

8) निविदेतील अटी व शर्ती नुसार जलशुध्दीकरण यंत्र बसविल्यानंतर यशदा, पुणे यांचेकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक असतांना अशी तपासणी केल्याबाबतचा अहवाल उपलब्ध नाही.

9) जिल्हा परिषदेतंर्गत एकूण 33 शाळांना जलशुध्दिकरण यंत्र पुरवठा करण्यात आला असुन शाळेची मागणी उपलब्ध नाही. तसेच पुरवठा केलेल्या या 33 शाळांची निवड कशाचे आधारे करण्यात आली, याबाबतचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाहीत.

**3.128 सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतुन नाविण्यपुर्ण योजनेतंर्गत ईलर्निंग साहित्य खरेदीतील अनियमीततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणीचे सन 2016-2017 लेखापरीक्षणात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतुन नाविण्यपुर्ण योजनेतंर्गत ईलर्निंग साहित्य प्रमाणक क्रमांक 124, दिनांक 27/03/2017 अन्वये रक्कम रुपये 99,60,600/- ची खरेदी करण्यात आली आहेत. याबबात खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय दिनांक 22/06/2015 मधील परि. क्रमांक 4.2.1 नुसार सदर साहित्य लोकसहभागातुन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मात्र जिल्हा नियोजन समितीची दिशाभुल करुन शासनाचे निधीतुन सदर योजना राबविली आहे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) ई-लर्निगसाठी घ्यावयाचे साहित्याची खरेदी पुर्व तपासणी अहवाल श्री गुरु गोविंद सिंग इंजि ॲण्ड टेक्नो. नांदेड यांनी प्रमाणक क्रमांक 182 दिनांक 24/04/2016 नुसार नमुना A,B,C, तपासणी करुन अहवाल दिला आहे. परंतु, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी पुरवठादार (1) व्यंकटेश डिस्ट्रीब्युटर्स, नांदेड (2) कृष्णा इंटरप्रायजेस, नांदेड (3) राहुल सर्जीकल्स यांना अनुक्रमे क्रमांक 1664 दिनांक 28/03/2016, क्रमांक 1662 दिनांक 28/03/2016 व क्रमांक 1663 दिनांक 28/03/2016 अन्वये खरेदीपुर्व System Approval Certificate देउन साहित्य स्विकृती प्रमाणपत्र कोणत्या प्राधिकारान्वये दिले, याचा बोध होत नाही. तरी शिक्षणाधिकारींना संगणकीय साहित्य खरेदी करण्याचे साहित्य खरेदीपुर्वी तपासणी करुन स्विकारण्याचे सक्षम असल्याचे प्राधिकार लेखापरीक्षणास दर्शविले नाही.

3) ई-लर्निग साहित्य खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असुन (1) कृष्णा इंटरप्रायजेस (2) मे.राहुल सर्जिकल्स ॲण्ड फॉर्मा (3) मे.व्यंकटेश डिस्ट्री., नांदेड (4) अनमोल प्रकाशन अशा एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या आहेत. या 4 निविदेपैकी अनुक्रमांक 4 वरील अनमोल प्रकाशन यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. परंतु, अनुक्रमांक 2 वरील मे.राहुल सर्जिकल्स ॲण्ड फॉर्मानांदेड यांचे दुकान परवानानुसार मेडीकल, सर्जिकल वस्तु, उपकरणे व औषधी पुरवठा करण्यासाठीचा परवाना आहे. संगणकीय साहित्य पुरवठा करण्याबाबतचा परवाना नाही. तरीसुध्दा निविदा निवड प्रक्रियेत सदर पुरवठादाराची निविदेचा समावेश करुन 3 निविदा गृहित धरुन तुलनात्मक निविदा मंजुर केली.

4) ई-लर्निग साहित्य खरेदी करणेसाठी स्पेसिफिकेशन निश्चित करणेसाठी दिनांक 11/03/2016 ला बैठकीचे आयोजन केलेले असुन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे त्यांचे मत / सल्ला घेण्यात आला नाही.

5) निविदेतील अटी व शर्ती नुसार ईलर्निगचे साहित्य बसविल्यानंतर तपासणी करुन घेणे आवश्यक असतांना अशी तपासणी केल्याबाबतचा अहवाल उपलब्ध नाही.

6) जिल्हा परिषदेतंर्गत एकूण 78 शाळांना ई-लर्निग साहित्य पुरवठा करण्यात आला असुन शाळेची मागणी उपलब्ध नाही. तसेच पुरवठा केलेल्या या 78 शाळांची निवड कशाचे आधारे करण्यात आली व निवडीबाबतचे निकष काय ठेवण्यात आले होते, याबाबतचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाहीत. ई-लर्निग योजना शाळेत राबविण्यासाठी शाळेत विद्युत पुरवठा, कक्ष, जागा इत्यादी स्थळ पाहणी अहवाल घेण्यात आला नाही.

7) निविदेतील अटी नुसार संच बसविल्यानंतर 90 टक्के रक्कम देय होईल व तांत्रिक तपासणी अहवाल प्राप्तीनंतर 10 टक्के रक्कम देय राहील. परंतु, सदर प्रकरणी एकमुस्त 100 टक्के आहरीत करण्यात आली असुन रूपये 9,96,060/- (10 टक्के) रक्कम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना प्रदान करण्यात आली. एकमुस्त 100 टक्के रक्कम काढण्याचे प्रयोजन काय, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) ई-लर्निग साठीचे साहित्य हे ISI प्रतीचे घेतले किंवा याबाबत उल्लेख नाही. तसेच डिलीव्हरी चलनवर साहित्याचा सिरीज क्रमांक, वर्ष नमुद नाही.

9) ई-लर्निगचे साहित्य शाळांना पोंच झाल्यावर साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणित उतारे उपलब्ध नाहीत.

10) श्री गुरु गोविंद सिंग इंजि ॲण्ड टेक्नो., नांदेड यांनी प्रमाणक क्रमांक 182 दिनांक 24/04/2016 नुसार ई-लर्निग साठीचे साहित्य स्पेसिफिकेशननुसार ई-पेन, स्पीकर, ई-पॉईटंर पुरवठा केल्याबाबत इनव्हाईस क्रमांक 79 दिनांक 10/03/2017 मध्ये उल्लेख नाही. त्या सदरचे साहित्य पुरवठा झाले किंवा नाही, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच स्पेसिफिकेशनमध्ये व्हाईट बोर्डचा समावेश करण्यात आलेला नाही. परंतु, पुरवठादाराने व्हाईट बोर्ड पुरवठा केला आहे. तसेच ई-लर्निग साठी मॉनिटरची आवश्यक नाही. तरी सुध्दा मॉनीटर खरेदी करुन योजनेचा खर्चात वाढ होऊन अनावश्यक बाबीसाठी खर्च करण्यात आला आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.129 शाळेच्या परिसरात धुम्रपान निषेध फलक पुरवठा केले बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017, (परिच्छेद क्रमांक 2) -** शाळेच्या परिसरात धुम्रपान निषेध फलक पुरवठा करणेकरिता रक्कम रूपये 2,49,300/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उपरोक्त निषेध फलक पुरवठा योजनेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांचे आदेश क्रमांक 1048, दिनांक 27/10/2016 अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली आहे. सदर योजनेस एकाच जावक क्रमांकाद्वारे प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता का देण्यात आली याबाबतचे अभिलेखे संचिकेत जोडलेले नाही. प्रशासकीय तद्वतच तांत्रिक मान्यतेसाठी स्वतंत्र आदेश निर्गमित करणे ऐवजी एकाच जावक क्रमांकाद्वारे दोन्ही आदेश निर्गमित केल्याचे स्पष्ट होते.

सदर निषेध फलक गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे स्तरावर पुरवठा केले आहेत मात्र साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवीत घेतली किंवा कसे ? हे साठानोंदवही लेखापरिक्षणास न दर्शविल्याने बोध होत नाही. साठा नोंदवही दर्शवावी. देयकासोबत संबंधित गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे साहित्य प्राप्त झालेबाबतची पोच घेण्यात आली असून, मात्र सदर साहित्य साठा नोंदवहीच्या कोणत्या पानावर घेतला आहे याबाबतचा पान क्रमांक नमूद केलेला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांचे पुरवठा आदेश क्रमांक 1267, दिनांक 29/12/2016 मधील सुचनेप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्यावर साठा नोंदवहीत नोंद केल्याबाबतचे (पान क्रमांकासह) प्रमाणपत्र व पोच पावत्या सादर करणे आवश्यक असतांना देयकासोबत जोडलेल्या पोच पावत्यावर साठा प्राप्त झालेबाबत नोंद आहे. मात्र सदर साहित्याची नोंद साठा नोंदवही मध्ये कोणत्या पानावर घेतली याबाबतचा पान क्रमांकाची नोंद केलेले नाही.

**3.130 शालेय पोषण अहार योजने अंतर्गत (केंद्र व राज्य हिस्सा) ग्रामीण भागातील शाळेला धान्यादी मालपुरवठा करणे वरील खर्चा बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** शालेय पोषण अहार योजने अंतर्गत (केंद्र व राज्य हिस्सा) ग्रामीण भागातील शाळेला धान्यादी मालपुरवठा करणेकरिता रक्कम रूपये 6,17,20,005/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र.क्र./383/प्रा.शि.-4 शोलय शिक्षण व क्रिडा विभाग दिनांक 26/02/2010 मधिल कलम (3) नुसार गट स्तरावरुन पुरवठा आदेशानुसार तांदळाची वाहतुक व इतर धान्यांदी मालाचा पुरवठा येकाच वेळी दयावेत असे असल्याची त्या प्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 09/11/2017 देवुनही पुरवठा आदेशाची संचिका लेखापरिक्षणात उपलब्ध केली नाही. त्यामुळे पुरवठा आदेश केंव्हा दिले आहेत हे समजू शकले नाही गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचे तालुका स्तरावरील धान्यादी मालाची मागणी, अंतर्गत शाळेच्या मुख्याध्यापक यांची मागणी इत्यादीचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध केले नसल्यामुळे झालेला पुरवठा योग्य असल्याची खात्री करता आली नाही

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक व शालेय पोषण अहार 2009/ प्र.क्र.383 प्र.शि.-4/ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दिनांक 26/02/2010 मधील (ड-9) नुसार पुरवठा धारकाने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्यांचे नमुने प्रत्येकी 250 ग्राम प्रमाणे गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक, शालेय पोषण अहार यांनी शासकीय प्रयोग शाळेस पाठवुन तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतु तपासणी अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे योग्य दर्जाचा धान्यादी पुरवठा केल्याची खात्री करता आली नाही

3) प्राथमिक शिक्षण संचालक यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधावो/प्रशिस/303/2011-12/ 7177(3), दिनांक 01/11/2011 नुसार महाराष्ट्र स्टेट को ऑप कंझुममर्स फेड्रेशन लि.औरंगाबाद, यांचे कडुन धान्यादी मालाच्या देयकाची 90% रक्कम प्रयोग शाळेचा तपासणी अहवाल समाधान कारक आल्या नंतरच अदा करावी व जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या पुरवठा संदर्भात तक्रारी असल्यास उर्वरीत 10% रक्कम शिक्षण संचालक (प्रा) यांच्या मान्यतेने आदा करावी परंतु धाल्यादी मालाच्या पुरवठयाची 100% अदाई एकाच वेळी प्रदान करण्यात आले आहे.

4) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.484/प्राशी-4, दिनांक14/06/2013 नुसार शालेय पोषण अहार या कैंद्र शासनाच्या योजने अंतर्गत 1ली ते 5वी प्राथमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांना Other health intervention पुरविण्यास मंजूरी देण्यात आली आहे मायक्रोन्यूट्रयंट सपलीमेंटशन आय.एफ.ए.सिरप व इंटरनल फिडपावडर पुरवठा करण्यात यावा. असे आदेशित आहे. या प्रमाणे कार्यवाही झाल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

5) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ-2012/प्र.क्र.282/प्रशी-4 दिनांक 19/06/2013 नुसार शालेय पोषण आहार या कैंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत इयता 6 ते 8 च्या विदयार्थाना Weekly Iron and folic supplementation योजना राबविण्यासाठी कैंद्र सरकारने मार्गदर्शन सुचना मध्ये विहित केल्या प्रमाणे Iron गोळयाचा पुरवठा करण्यात यावा याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्या बाबत योग्य त्या अभिलेख्या आधारे कळु शकले नाही.

6) देयकाची तपासणी केली असता सर्व पंचायत समितीने गट शिक्षणाधिकारी यांना तुरडाळ, हरबरा, वटाणा, पुरवठा केल्याचे नोंदविले आहे, परंतु महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/ प्रक्र.18 /प्राशी -4 मंत्रालय, मुंबई, दिनांक 02/02/2011 अन्वये परिशिष्ट अ मध्ये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत दयावयाचा पाककृतीचा तपशिल दिलेला आहे. त्यामध्ये डाळतांदळाची खिचडी, मसाले भात,/पुलाव इ.1 ते 5 व 6 ते 8 साठी पाककृतीत तांदुळ मुगडाळ, तेल, हळद, मीठ, जिरे, खोबरे इत्यादी दिलेले आहे. परंतु त्यात तुरदाळ दिलेली नसुन मुग्डाळीचा उल्लेख केला आहे.

7) महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक 5/प्रशा/1095/2134/प्राशी-2, दिनांक 22/11/1995 नुसार इयता 5 वी तील विद्यार्यांना शालेय पोषण आहार योजना लागु करण्यात आलेली आहे. शिक्षण उपसंचालक प्राथमिक यांचे पत्र क्रमांक शालेय पोषण अहार क्रमांक 2007-08 /तरतुद /प्राशी 30119563, दिनांक 31/05/2007 नुसार विदयार्थी संख्येच्या प्रमाणानुसार अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. योजनेची शासन निर्णयानुसार अमलबजावणी झाल्याची खात्री करता आली नाही.

8) करारनाम्यातील अनुक्रमांक 7 पुरवठादार मालाचा पुरवठा शाळेमध्ये शाळेच्या वेळेत करील, इतर कालावधीत पुरवठा केल्यास तो कोणत्याही परिस्थितीत शाळेकडून स्विकारण्यात येणार नाही. हे पुरवठादारास बंधनकारक राहिल. तसेच वाहनात प्रमाणित वजनकाटा ठेवेल व प्रत्यक्ष माल शालेय व्यवस्थापन समिती / सुजान व्यक्ती / पालक / आहार शिजवणारी यंत्रणा / बचत गट यांच्या समोर वजन करुन देतील व तसे केल्याबद्दल मुख्याध्यापकाची पोहोच घेतील. असे असतानाही काही शाळांची तपासणी केली असता मुख्याधिकारी / प्रतिनिधीची पावतीवर स्वाक्षरी दिसून आली नाही.

9) करारनाम्यातील अनुक्रमांक 15 नुसार प्रारंभिक पुरवठा 2 महिन्यांसाठी असेल त्यानंतर तांदळाची व इतर धान्यादी मालाचे 2 महिन्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील. शाळा मध्ये 20 दिवस पुरेल इतका साठा शिल्लक असताना नवीन पुरवठा आदेश देण्यात येतील हे पुरवठादारास मान्य आहे असे नमूद असतानाही तशा प्रकारची कार्यवाही केल्याचे लेखापरीक्षणास दिसून आलेले नाही.

10) करारनाम्यातील अनुक्रमांक 17 नुसार तांदळाचे नियतन आदेश प्राप्त झाल्यापासुन विहीत मुदतीत तांदळाचा पुरवठा न झाल्यास विद्यार्थी पोषण आहारापासुन वंचित राहू नये यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून तांदुळ खुल्या बाजारातून वाजवी दराने खरेदी करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्च पुरवठादाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल व बिलाच्या किंमतीच्या 10 % दंड वसुल करण्यात येईल. असे असतानाही बऱ्याच शाळेमध्ये शालेय पोषण आहार शिजवण्यात आलेला नाही.

11) शासनाच्या परिपत्रक क्रमांक शापोआ 2015/ प्र.क्र. 222/ एसडी-3, दिनांक 02/02/2016 मध्ये नमुद केलेल्या सुचनानुसार पुरवठादाराकडून पुरवठ्यामध्ये खंड पडल्यास व शाळेच्या दिवशी शाळामध्ये मध्यान्ह भोजन न दिल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास अन्नसुरक्षा भत्ता देण्याबाबतची कार्यवाही पुरवठादाराच्या देयकामधून वसुल करण्यात येईल असे नमूद असतानाही तशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. तसेच तांदुळ व धान्यादी मालाच्या पुरवठ्यामध्ये

खंड पडल्यास संबंधित व्यक्ति अथवा संस्थेवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल. असे असतानाही शिक्षण विभागाने कार्यवाही केलेली नाही. दंडात्मक रक्कम वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

**3.131 शालेय पोषण आहार योजने अंतर्गत केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-2017 चे लेखा परिक्षणात शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शिक्षण विभागाने 5 प्रमाणकान्वये धान्यादी माल कंत्राटदारकडुन खरेदी करुन व इंधन, भाजीपाला, मानधन याची रक्कम शाळांना पुरवठा केले बाबत रक्कम रुपये 13,05,98,468/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उस्मानाबाद तालुक्यातर्गत ऑक्टोबर/नोंव्हेंबर 2016 च्या 01 ते 05 च्या मागणीच्या गोषवाऱ्यामध्ये मोहरीची मागणी नाही. परंतु गोषवाऱ्या सोबत जोडलेल्या मागणीच्या विवरणपत्रा मधील मोहरीच्या एकत्रीत मागणीपेक्षा जास्तीची मोहरी पुरवठा केलेली आहे आणि सदरील शासन निर्णयान्वये कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्यामधील अट क्रमांक 7 नुसार मालाचा पुरवठा हा त्या शाळेच्या मागणीपत्रकानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करणे आवश्यक असताना मागणी निहाय पुरवठा न करता जास्तीचा माल पुरवठा केलेला आहे.

मागणी नुसार आवश्यक्ता नसताना जास्तीचा पुरवठा केल्यामुळे धान्यादी माल शिल्लक राहुन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच आठवडयाच्या प्रत्येक दिवसाच्या पाककृतीप्रमाणे अन्न वाटप करणे आवश्यक आहे. परंतु जास्तीचा माल पुरवठा केल्यामुळे पाककृतीप्रमाणे वाटप नकरता जास्तीचा प्राप्त मालानुसार वाटप केले जावू शकते. तसेच संबंधीत शाळांनी मागणीपेक्षा जादाचा पुरवठा करण्यात आलेल्या वस्तु स्विकारल्यामुळे अनावश्यक साठा झाला पर्यायाने शासन निधी नाहक गुंतुण पडला. मागणीपेक्षा जादाचा आहार संबंधीत पुरवठादाराने पुरवठा केलेला असतांना संबंधीत शाळांनी त्या वस्तु नाकारुन मागणी इतक्याच वस्तु स्विकारणे आवश्यक होता. जास्तीचा स्विकारलेला माल खराब न होता शालेय पोषण आहारासाठीच वापर झाला याची अनुपालन दर्शवुन खात्री पटवावी.

2) ऑगस्ट/सप्टेंबर 2016 या महिन्यामधील आठ तालुक्यांपैकी चार तालुक्याची व ऑक्टोंबर/नोव्हेंबर 2016, डिसेंबर 2016/जानेवारी 2017 या सर्व महिन्यामध्ये उस्मानाबाद तालुक्याची चवळीची मागणी असताना व पुरवठा आदेश असताना चवळी पुरवठा न करता जादा दराची मटकी पुरवठा केलेली आहे. तसेच सदरील शासन निर्णया अनव्ये कंत्राटदारासोबत केलेल्या करारनाम्यामधील अट क्रमांक 7 नुसार मालाचा पुरवठा हा त्या शाळेच्या मागणीपत्रकानुसार करणे आवश्यक असताना त्यानुसार पुरवठा केलेला नाही

तालुका निहाय चवळीची मागणी असताना मटकी 01 ते 05 वी च्या शाळांना 22174 किलो ग्रॅम व 06 ते 08 च्या शाळांना 20500 किलो ग्रॅम अशी एकुण मटकी 42674 किलो ग्रॅम पुरवठा केलेला आहे. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या आहार मेनुप्रमाणे सदर मटकीचा वापर झाला आहे याची खात्री पटवावी.

3) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तालुका निहाय शाळांना धान्यादी माल पुरवठा केलेला आहे. पुरवठा केलेल्या मालाच्या वजनानुसार कंत्राटदाराने पावत्या जोडुन देयके सादर केलेली आहेत व त्यानुसार शिक्षण विभागाने देयके मंजुर करुन रक्कम प्रदान केलेली आहे. परंतु लेखापरीक्षणातंर्गत प्रत्येक तालुक्यामधील केंद्र व त्या केंद्रातर्गत शाळा यांना अर्धसमासपत्र क्रमांक 08 दिनांक 13/12/2017 अन्वये शालेय पोषण आहार योजनेचे अभिलेखे तपासणीसाठी अभिलेखे घेवुन लेखापरीक्षण शिबीरामध्ये अभिलेखे दर्शविणे आवश्यक होते. परंतु 46 शाळांनी अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत. त्यामुळे सदरील शाळांना पुरवठा केलेल्या धान्यादी मालानुसार देयके सादर केलेले आहेत का कसे व शाळांमध्ये उपस्थीत विद्यार्थी यांना शालेय पोषण आहार योजनेच्या पाककृती प्रमाणे आहारामध्ये खंड न पडु देता आहार वाटप केल्याबाबत अभिलेखे दर्शविले नसल्यामुळे लेखापरीक्षणात तपासता आलेले नाहीत.

46 शाळांनी अर्धसमासपत्र देवुन सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेखे दर्शविलेले नाहीत तथापि ग्रामविकास विभाग परिपत्रक लेखाप 2013/प्र.क्र.81/वित्त-5, दिनांक 18/02/2014 नुसार लेखापरीक्षणास जाणुन बुजुन अभिलेखे

लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणारे अधिकारी/ कर्मचारी यांचेवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे कलम 7 अन्वये नमुद केलेल्या तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

4) करारनाम्यामधील क्रमांक 18 व्या अटी नुसार धान्यादी मालाचे पुरवठा आदेश मिळाल्या नंतर 5 दिवसामध्ये पुरवठा सुरु करावा लागेल व जास्तीत जास्त 20 दिवसामध्ये संपुर्ण पुरवठा करणे बंधनकारक आहे. परंतु कंत्राटदाराने मुदतीत पुरवठा न केल्यास अट क्रमांक 20 नुसार दंड आकारण्यात यावा. विलंबाने पुरवठा केल्यामुळे संबधीत कत्राटदाराला करारनाम्यानुसार 10% दंड आकारुन दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

5) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 मध्ये मध्यान्ह भोजन योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने शालेय पोषण आहार योजनेच्या नियमावलीतील तरतुदी विचारात घेवुन राज्य शासनाच्या परिपत्रक क्रमांक शापोआ-2015/प्र.क्र.222/एस.डी.3, दिनांक 02/02/2016 नुसार पुरवठा दाराकडुन पुरवठयामध्ये खंड पडल्यास व शाळेच्या दिवशी शाळांमध्ये मध्यान्ह भोजन न दिल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास "अन्न सुरक्षा भत्ता" देण्याबाबतची कार्यवाही पुरवठादाराच्या देयकामधुन वसुल करण्यात येईल. तसेच तांदुळ व धान्यादी मालाच्या पुरवठयामध्ये खंड पडल्यास संबधीत व्यक्ती अथवा संस्थेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी असे नमुद आहे. तथापि 35 शाळांमध्ये वाटप बंद असल्याचे दिसुन आले.

या कालावधीत आहाराचे वाटप केलेले नाही. त्यामुळे शालेय पोषण आहारापासुन विद्यार्थी वंचित राहिल्यामुळे शासनाच्या योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या या योजनेचा लाभ केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार विद्यार्थ्यांना देण्यात आलेला नाही हे स्पष्ट होते.

6) लेखापरीक्षणासाठी बोलवण्यात आलेल्या शाळांकडील आहार पुरवठा केल्याबाबत देण्यात आलेली गुलाबी रंगाच्या पावतीमधील पुरवठा केलेल्या धान्याचे प्रमाण व देकामध्ये नमुद प्रमाण तपासणी केली असता शाळेच्या पावती पेक्षा जास्तीचे प्रमाण दर्शवुन जादाची रक्कम प्रदान केलेली आहे.

जादा प्रदान रक्कम रुपये 1,980/- वसुल करुन शासनखाती भरणा करावी.

7) लेखापरिक्षणात प्रत्येक तालुका स्तरावरुन निवडलेल्या प्राथमिक शाळांचे शालेय पोषण आहाराबाबतचे सर्व अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यात 17 प्राथमिक शाळांच्या अभिलेख्यांमध्ये त्रुटी दिसून आल्या आहेत.

### 3.132 माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेतील रिक्त जागेवर तासिक पद्धतीने शिक्षकांच्या नेमणुका करण्याबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** शिक्षण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद चे सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणा अंतर्गत जिल्हा परिषद उपकरामधुन मान्यता प्राप्त खाजगी व जिल्हा परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील रिक्त जागांवर तासिका पद्धतीने शिक्षकांच्या नेमणुका करुन त्यांचे वेतन 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 7,30,096/- प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणकान्वये तासिका पद्धतीने नेमलेल्या शिक्षकांचे वेतन हे सन 2014-15 व 2015-16 मधील थकीत वेतन प्रदान केलेले आहे. परंतु जिल्हा परिषदेने सन 2016-2017 च्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकात थकीत असलेले वेतन दायित्वामध्ये दर्शविलेले नाही व 2016-17 च्या अंदाजपत्रकातील तरतुद ही चालु आर्थिक वर्षाचे वेतन प्रदान करण्यासाठी केलेली आहे व शिक्षण विषय समितीचा ठराव क्रमांक 02 नुसार सन 2016-17 च्या मानधनासाठी रुपये 7,50,000/- ची तरतुद केलेली असताना ही तरतुद सन 2014-15 व 2015-16 चे थकीत वेतन प्रदान करण्यासाठी खर्च केलेला आहे तसेच सन 2016-17 ची तरतुद सन 2014-15 व 2015-16 च्या थकीत वेतन प्रदान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मंजुरीचे अभिलेखे अर्धसमासपत्र क्रमांक 19 दिनांक 12/01/2018 अन्वये लेखापरीक्षणास मागवुन सुद्धा दर्शविलेले नाहीत. तथापि अंदाजपत्रकाध्ये दायित्व दर्शविलेली नसलेली व सर्वसाधारण सभेची मंजुरी नसलेली व सन 2016-17 ची तरतुद 2014-15 व 2015-16 च्या थकीत वेतनावर खर्च केलेली रक्कम रुपये 7,30,096/- लेखापरीक्षणास अंतिम अमान्य करण्यात येते.

2) सदरील खर्च हा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय एसएसएन-2103(113/03)/माशि-2, दिनांक 27/11/2006 च्या शासन निर्णयानुसार अशासकीय मान्यता प्राप्त खाजगी, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयामधील रिक्म जागांवर तासिका पद्धतीने शिक्षकांची नेमणुक करुन त्यांना प्रति तासाप्रमाणे वेतन प्रदान करावे अशी तरतुद असताना जिल्हा परिषदेने जिल्हा परिषदेच्या शाळांवर शिक्षकांच्या नेमुणका करुन नियमबाहयपणे वेतन प्रदान केलेले आहे. तथापि नियमबाहयपणे केलेला खर्च रक्कम रुपये 7,30,096/- वसुल करुन अनुपालन सादर करावे.

**3.133 जिल्हा परिषद शाळेतील मुलींसाठी किशोरी मेळावा आयोजीत करणे बाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** शिक्षण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद चे सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणा अंतर्गत जिल्हा परिषदेने वित्त प्रेषण नोंदवही तपासली असता जिल्हा परिषद उपकराच्या निधीमधुन जिल्हा परिषद शाळेतील मुलींसाठी किशोरी मेळावा आयोजीत करण्यासाठी रक्कम रुपये 4,00,000/- निधी वितरीत केलेले आहेत.

उपरोक्त निधी वितरण आदेशानुसार तालुकास्तरावर कार्यक्रम घेण्यासाठी निधी वितरीत केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कार्यक्रमाची प्रशासकीय मान्यता शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी रक्कम रुपये 1,00,000/- दिलेली असताना प्रशासकीय मान्यता असलेल्या रक्कमेपेक्षा जास्तीचा निधी वितरीत केलेला आहे. तथापि प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्तीचा निधी वितरीत केलेली रक्कम रुपये 3,00,000/- वसुल करुन जिल्हा परिषद उपकर खाती भरणा करावी.

2) सदरील कार्यक्रमाची निधी वितरीत करुन कार्यक्रम दिनांक 03/01/2017 रोजी करण्याचे आदेश दिलेले आहेत कार्यक्रम आयोजनावर केलेल्या खर्चाची उपयोगीता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास दर्शविलेले नाहीत.

**3.134 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर बाबत रक्कम रुपये 6,52,15,428/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/लातूर/307/16-17/3185, दिनांक 14/06/2016 सन 2016-17 करिता पुरवठा धारकाची निवड करण्यात आलेली आहे. त्यास दिनांक 10 जुन 2016 पत्रान्वये शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन मान्यतेनुसार लातूर जिल्हयाकरिता एम.पी. भुतडा यांची निविदा मंजुर केलेली आहे. करारनाम्यातील व निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कार्यपद्धती हि दिनांक 14/06/2016 पासुन सुरु करावयाची आहे. सन 2016-17 या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी संख्या विचारात घेऊन पहिल्या दोन महिन्यासाठी तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा किमान वीस दिवस अगोदर पुरवठा दारास दोन महिन्याचे तांदुळ व धान्यादी दोन महिन्याच्या कालावधीसाठी पुरेल एवढ्या धान्यादी मालाचा पुरवठा आदेश देण्यात यावेत. निलंगा तालुका अंतर्गत शासन नियमाप्रमाणे मागणी न नोंदविता जादा दराने मागणी नोंदवलेली आहे. त्यामुळे शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जादा माल संबंधित संस्थांना पुरवठा झालेला आहे रुपये 22,28,273/- जादा मागणीबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

2) संबंधित संस्थेस धान्यादी माल सोबत तांदुळही आवश्यकतेपेक्षा जास्त मागणी केलेला आहे त्यामुळे आवश्यकतेपेक्षा ज्यादा पुरवठा केलेला तांदुळ याची परिगणना करून रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दर्शवावे.

3) शासन परिपत्रक क्रमांक शापोआ/2009/प्रक्र-383/प्राशि-4, दिनांक 26/02/2010 व करारनाम्यातील अटीनुसार पुरवठादार शिक्षण अधिकारी (प्रा) यांच्या कार्यालयात पुरवठा करण्यात आलेल्या आहारासंबंधी पावत्या प्राप्त करुन देईल. पिवळ्या रंगाची पावती पुरवठादार देयकासोबत जोडून गट शिक्षण अधिकारी/ अधिक्षक (शालेय

पोषण आहार) याचे कडून तपासणी करून देयके शिक्षण अधिकारी लातूर यांच्याकडे सादर करील असे असताना सदरील देयकांसोबत पिवळया रंगाची पावती जोडलेली नाही. त्यामुळे करारातील अटीचे उल्लंघन झालेले आहे.

4) परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/लातूर/307/16-17/3185, दिनांक 14/06/2016 तांदुळ व इतर धान्यादी मालाची शाळानिहाय मागणी मुख्याध्यापक यांनी केंद्र प्रमुखाकडे, केंद्रप्रमुखानी गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक (शालेय पोषण आहार) यांच्याकडे करावी. तालूका अंतर्गत करण्यात आलेली मागणी व दर्शविण्यात आलेली पटसंख्या यामध्ये तफावत असल्याचे दिसून आले. पटसंख्या व मागणी यांची तपासणी केल्याची दिसुन येत नाही. त्यामुळे जादा मालाचा पुरवठा झालेला आहे.

5) तांदुळ व धान्यादी यांची मागणी नोंदवताना पटसंख्या वेगवेगळी दर्शविली आहे. त्यामुळे अचूक पटसंख्येची पडताळणी करता आली नाही.

6) निलंगा तालुका अंतर्गत धान्यादी मालाची मागणी चुकीची नोंदविल्यामुळे 6 संस्थेकडे दिनांक 31/03/2017 अखेर आवश्यकतेपेक्षा जास्त माल शिल्लक असल्याचे दिसून आले. जादा धान्य शिल्लक असल्यामुळे गैरप्रकार / नुकसान / दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. धान्य सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था असल्याची तपासणी करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग परिपत्रक क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.383/प्रशि-4, दिनांक 26/02/2010 मधील तरतूद क्रमांक 2 तालुकास्तरावर गटस्तरावर गट शिक्षणाधिकारी/अधीक्षक शालेय पोषण आहार निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्यादी मालाच्या प्रमाणानुसार परिगणना करतील व आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विदयार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाची शाळानिहाय मागणी पत्रासह पुरवठा धारकास आदेश देतील, असे असताना पुरवठाधारकांने देयकासोबत मालाच्या मागणीचे आदेश जोडलेले नाहीत. त्यामुळे त्या गटस्तरावरील मागणी अचूक असल्याची पडताळणी करता आली नाही. गट स्तरावरील मागणी घेवून अनुपालन दर्शवावे.

8) करारातील अटी व शर्ती नुसार संस्थेने मागणी केलेला माल पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठाकार यांची आहे. सन 2016-17 मध्ये तुरडाळ बाबत मागणी नोंदवुनही वर्षभर पुरवठा केलेला नाही त्यामुळे करारनामा मधील अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले आहे.

9. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत संबधित मुख्याध्यापक यांनी मागणी नोंदवली नसतानाही गटस्तरावर परस्पर मागणी नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जादा माल पुरवठा झाला आहे. तसेच खालील दर्शविले प्रमाणे मुख्याध्यापक यांनी माल पाठवू नये असे पत्र सादर केलेले आहे.

अ. चन्नबस्वेश्वर मा.विद्यालय सोनखेड अर्ज दिनांक 27/12/2016 (जुन 2017 अखेर पर्यंतचा माल शिल्लक आहे.)

ब. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सीताफळवाडी अर्ज दिनांक 17/12/2016 (मे 2017 अखेर पर्यंतचा माल शिल्लक आहे.) त्यामुळे अनावश्यकरित्या मागणी नोंदविल्याबद्दल संबंधितांची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक शापोआ/सुधायो/लातूर/307/16-17/3185, दिनांक 14/06/2016 नुसार शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी दर तीन महिन्यातून एकदा पुरवठा दाराच्या गोदामाची तपासणी करावी अशी कार्यवाही केलेबाबतचे अभिलेखे संचीकेसोबत संलग्न केलेले नाही.

11) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक शापोआ/2009/प्रक्र-136/प्राशि-4, दिनांक 18 जुन 2009 अन्वये शालेय पोषण आहार योजनेमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. बऱ्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना आहार शिजवून दिला जात नाही किंवा कमी आहाराचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात येते. अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त होत असतात त्याचप्रमाणे काही ठिकाणी शालेय पोषण आहारापासून विद्यार्थ्यांना विषबाधा झालेच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहार योजनेची अमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी योजनेमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने एक अभ्यास गट समिती गठीत केली होती. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु लातूर तालुका अंतर्गत मौजे सलगरा येथे 108 विद्यर्थ्यांना

विषबाधा झालेली होती. त्यानुषंगाने चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती चौकशी समितीचा अहवाल उपलब्ध करून दिलेला नाही त्यामुळे संबंधीतांवर काय कार्यवाही केली याबबतची तपासणी करता आली नाही. तपासणी अहवाल दर्शविणे आवश्यक आहे.

12) संबधित कार्यालयाची मागणी व पटसंख्या यांची तपासणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन 2016-2017 मध्ये शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जादा माल पुरवठा झालेला आहे. सन 2016-2017 मधील सर्व तालुका निहाय मागणी व पुरवठा यांची पडताळणी करून अनुपालन दर्शवावे

**3.135 शिक्षक समायोजन बाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जीपब-511/प्रक्र-54/आ-14, दिनांक 18/05/2011 अन्वये दिनांक 30 सप्टेबर रोजी निश्चित केलेल्या पटसंख्येनुसार अनुज्ञेय असलेल्या संख्येपेक्षा जास्त शिक्षक असलेल्या शाळामधून अनुज्ञेय असलेल्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळावर शिक्षकाचे समायोजन करण्यात यावे. अशी कार्यवाही केलेली नाही.

2) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अतिरिक्त शिक्षक समायोजन क्रमांक 2016-17 जाक्र-2015/2017 दिनांक 11/10/2017 नुसार संच मान्यता दिलेली असून सन 2016-17 मध्ये सहशिक्षक / प्राथमिक पदवीधर चे पद कमी झाल्यामुळे जिल्हा अंतर्गत मराठी माध्यमाचे 111 अतिरिक्त शिक्षक झालेले होते, अतिरिक्त शिक्षकामधुन तीन शिक्षकाचे समायोजन होऊन 109 शिक्षकांचे समायोजन झालेले नाही. तसेच उर्दु माध्यमाचे रिक्त जागा नसल्यामुळे 77 शिक्षक अतिरिक्त आहेत.

एकूण 109+77 = 186 शिक्षक अतिरिक्त होतात. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकाबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी.

3) ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जीपब-511/ प्रक्र-54/आ-14, दिनांक 18/05/2011 नुसार सामायोजनाचा दिनांक 30 सप्टेंबर विचारात घेऊन प्रचलित नियमानुसार पटसंख्या व शिक्षकाची संख्या निश्चित करावी. या अनुषंगाने 20 ऑक्टोबर पर्यंत विभागीय उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करूनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाला 25 ऑक्टोबर पर्यंत कोणताही निर्णय कळविला नाही तर मान्यता गृहीत धरून कोणत्याही परिस्थितीत 31 ऑक्टोबर पर्यंत जिल्हयातील समायोजनाचे काम पुर्ण करणे अनिवार्य आहे

4) विहित कालावधी ठरवुन दिलेला असल्याने ज्या जिल्हयात सदरची कार्यवाही विहित कालावधीत होणार नाही. त्या जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना जबाबदार धरण्यात येईल.

5) अतिरिक्त शिक्षक तालूका अंतर्गत कार्यरत असून त्यांचे सन 2016-17 मध्ये चार महिन्याचे वेतन व भत्ते यांची अदाई झालेली आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 15/12/2017 व अर्धसामास पत्र क्रमांक 3, दिनांक 31/01/2018 अन्वये मागणी करूनही वेतन व भत्ते यांचा खर्च उपलब्ध करून दिलेला नाही. अतिरिक्त शिक्षकांवर झालेला खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येतो.